अनुताई वाघ विशेषांक



# हाकारा

वर्ष : तेरावे ■ अंक तिसरा व चौथा

## अनुताई वाघ -- जीवनपट

१७ मार्च १९१० : एका गरीब कुटुंबात जन्म.

१९२३ : वयाच्या तेराव्या वर्षी बालविवाह आणि सहा महिन्यानंतर बालविधवा.

१९२६ : महिला अध्यापन विद्यालय, पुणे येथे ३ वर्षांचा अभ्यासक्रम व नंतर 'हुजुरपागा' शाळेत अध्यापन १२ वर्षे केले.

१९४५ : ग्राम बाल शिक्षा केंद्राने सुरू केलेल्या नवीन ग्रामीण पूर्व प्राथमिक शाळेत छोटी कार्यकर्ती म्हणून श्रीगणेशा.

१९४५ ते १९७३ : संस्थेचे काम व व्याप्ती वाढविण्याच्या कामात ताराबाईंना सहकार्य.

१९७३ : ग्राम बाल शिक्षा केंद्राच्या संचालिका.

: 'शिक्षणपत्रिका' मासिक सुरू केले.

१९७६ ते १९७९ : NCERT च्या कार्यकारिणीवर नियुक्ती.

१९७२ ते १९७८ : महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेतील अध्यापक प्राशिक्षण विभागात सदस्य.

१९७८ ते १९८१ : अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा.

१९७७ : ठाणे जिल्हा स्त्री-शक्ती जागृती समितीच्या अध्यक्षा म्हणून शेवटपर्यंत काम करीत होत्या. या समितीची स्थापनाही त्यांनीच केली.

जून १९८० : डहाणू येथे मूक, बधिर आणि अपंग बालकांसाठी एका शाळेची स्थापना.

१९८१ : 'सावित्री' नावाचे दुसरे मासिक सुरू केले.

२७ सप्टेंबर १९९२ : वयाच्या ८२व्या वर्षी कोसबाड येथे निधन.

## -: अनुताईंना मिळालेले मानसन्मान :-

१९७२ : 'आदर्श शिक्षिका' म्हणून राज्यपालांच्या हस्ते पारितोषिक.

१९७५ : 'दलित मित्र' पदवी राज्यपालांच्या हस्ते.

१९७८ : महाराष्ट्र विज्ञान परिषदेचे पारितोषिक व मानपट्टिका.

१९७८ : फाय फौंडेशनचा दहा हजाराचा पुरस्कार व मानपट्टिका.

१८-३-१९८० : आंतरराष्ट्रीय बालक वर्षात सर्वोत्तम बालकल्याणाचे वीस हजारांचे पारितोषिक उपराष्ट्रपतींच्या हस्ते.

१९८० : आदिवासी मुलांचे शिक्षण आणि कल्याण याबाबतीत ३५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याबद्दल ७१व्या वाढदिवशी सार्वजनिक सभेत एक लाखाचा निधी अर्पण.

डिसेंबर १९८० : पुण्याच्या मातोश्री माईसाहेब पारखे स्मृतीन्यासाच्यावतीने 'आदर्श माता' सन्मान.

१९८० : मुंबईच्या विवेकानंद क्लासेसच्यावतीने १० हजार रुपये देऊन सत्कार.

१९८० : मुंबई महापालिकेच्या वतीने जाहीर सत्कार.

१९८० : आदिवासी बालके व महिला यांच्यासाठी नेत्रदीपक शैक्षणिक कार्य केल्याबद्दल पुणे येथे अनेक संस्थांतर्फे आणि दिल्ली येथे सत्कार.

जानेवारी १९८१ : मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले स्मृतीप्रीत्यर्थ प्रथम पुरस्कार.

१९८१ : आयुर्विमा कार्पोरेशनच्या ग्राहक संघाच्यावतीने पाच हजार रुपये देऊन सत्कार.

१९८१ : 'सहज शिक्षण' या हस्तलिखिताला एक रुपयांचा राष्ट्रीय पुरस्कार.

२६-१-१९८५ : राष्ट्रपतींनी 'पद्मश्री' किताब दिला.

१९८५ : एक लाख रुपयांचा जमनालाल बजाज राष्ट्रीय पुरस्कार.

१९८५ : डॉ. बेडेकर विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांतर्फे १० हजार ७५ रुपयांचा निधी.

## -: अनुताईंची ग्रंथसंपदा :-

१) बालवाडी कशी चालवावी २) कुरण शाळा ३) प्रौढ शिक्षण माला ४) विकासाच्या मार्गावर ५) शिक्षण चित्रमाला ६) अजब सातभाई ७) आटपाट नगरात ८) सकस आहार गीते ९) सहज शिक्षण १०) बालवाडीतील गोष्टी भाग-१ भाग-२ ११) बालवाडीतील बडबडगीते १२) बालवाडीतील कृती गीते १३) प्रबोधिका १४) गुरुमाऊलीचा संदेश (नाटक) १५) बालसंवाद १६) शब्दांची मजा १७) कोसबाडच्या टेकडीवरून (आत्मकथन).

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


१) संपादकीय ........ २

२) विकासवाडीचे विकसते कमळ : अनुताई वाघ ........ ४

३) ग्राम आरोग्य प्रकल्प-कोसबाड : अनुताई वाघ ........ ८

४) आदिवासी विकास व स्वयंसेवी संस्था : अनुताई वाघ ........ ११

५) प्रिय अनुताईस : रमेश पानसे ........ १५

६) आमची अनुताई : सौ. लीला दंडवते ........ १८

७) आदिवासीनी अनुताई : शांता आठवले ........ २३

८) ताई आणि अनुताई : नीला कृष्ण जोशी ........ २६

९) कोसबाडची कर्मयोगिनी : प्रा. ग. प्र. प्रधान ........ ३०

१०) कोसबाडची टेकडी विराण झाली : आशा कर्दळे ........ ३४

११) तपस्विनी अनुताई : शांता आठवले ........ ३७

१२) अनुताईमधील संशोधक शिक्षक : रमेश पानसे ........ ४०

१३) साधी राहणी उच्च विचारसरणी : डॉ. शीला रसिक शाह ........ ४९

१४) प्रेरणा : सुनिल रामचंद्र पवार ........ ५१

१५) बालगीते लेखनाला स्फूर्ती देणाऱ्या अनुताई : बाळकृष्ण मुबाचल ........ ५३



वर्ष तेरावे : अंक तिसरा व चौथा
जुलै-डिसेंबर १९९२

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७
फोन : ३३७२१९

**आतील छायाचित्रे :**
'कोसबाडच्या टेकडीवरून'
पुस्तकातून साभार.

**संपादक :**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक :**
ग. शां. पंडित
**संपादक सहाय्य :**
सुधीर जोग

मूल्य रु. २०/-

**प्रकाशक :**
रा. के. मुटाटकर,
सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांचेसाठी,
मे. इंप्रेशन्स
३३६०/४, लिंगराज कॉलेज समोर,
गोंधळी गल्ली, क्रॉस रोड,
बेळगाव - ५९० ००२
फोन : २१३०९
येथे छापून प्रसिध्द केले.


2685 1A

# संपादकीय

अनुताईंचा नि आमचा स्नेह तसा फार जुना. डिसेंबर १९६५ मध्ये आचार्य भिसे गुरुजींच्या बोलावण्यावरून आमच्या मानवशास्त्राच्या विद्यार्थ्यांची सहल घेऊन आम्ही कोसबाडला गेलो होतो. त्यावेळेस श्रीमती ताराबाई मोडक व अनुताई दोघींची भेट झाली. कोसबाडच्या वेगवेगळया प्रकल्पांवर (उदा. : बालवाडी, अंगणवाडी, कुरणशाळा, विकासवाडी इ.) आमची चर्चाही झाली. त्यावेळी आमच्या एका विद्यार्थिनीने या प्रकल्पावर एक प्रबंधही लिहिला होता व त्यातला एक पेपर प्रसिद्धही झाला होता. येथपासूनच अनुताईंचा नि आमचा स्नेह वाढत गेला. पुढेही या ना त्या निमित्ताने त्यांची भेट व्हायची. अनेक अनौपचारिक गप्पाही व्हायच्या. १९८० साली 'हाकारा' सुरू झाले. अनुताईंनी दुसऱ्याच अंकात बोर्डीच्या 'विकासवाडी' प्रकल्पाविषयी माहिती देणारा एक लेख लिहिला. अधूनमधून त्या 'हाकारा' साठी लिहीत असत. आतापर्यंत त्यांनी कामाचा व्याप सांभाळून सवडीने 'हाकारा'साठी चार लेख लिहिले. याशिवाय परिषदेने आयोजित केलेल्या काही चर्चासत्रांनाही त्या उपस्थित राहिल्या.

२ ऑक्टोबर १९८३ रोजी प्रा. गं. बा. सरदारांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्ताने परिषदेच्यावतीने १ व २ ऑक्टोबर ८३ असे दोन दिवसांचे एक चर्चासत्र 'महाराष्ट्रातील आदिवासींचे सामाजिक प्रश्न व त्यांचे साहित्यातील प्रतिबिंब' या विषयावर आयोजित केले होते. त्यावेळी सिंधुताई अंबिकेंबरोबर अनुताई आवर्जून उपस्थित राहिल्या. अनुताई व प्रा. सरदार या दोघांनाही एकमेकांबद्दल अत्यंत आदर होता. प्रा. सरदार समाज प्रबोधनाचे काम करत होते. तर अनुताई आदिवासी घडवत होत्या. दोघांच्या कामाचे स्वरूप थोडेसे वेगळे असले तरी कुठेतरी त्याचा धागा जुळत होता.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे; परंतु ते तळागाळापर्यंत पोचलेले नाही. अजूनही बहुसंख्य समाज त्यापासून वंचित राहिलेला आहे व त्यातही आदिवासी समाज मोठा आहे. ही रूखरूख अनुताईंना असावी आणि म्हणूनच त्यांना आदिवासींमध्येच आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली असावी. सरकारने शैक्षणिक क्षेत्रात राखीव जागा ठेवून ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला असला तरी हे प्रयत्न अपुरे आहेत हे ओळखून काही स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी भागात शिक्षणाचे कार्य सुरू केले. यात भिसे गुरुजींसारख्यांनी विशेषत्वाने पुढाकार घेतला व त्यांना बाळासाहेब खेरांचे सहकार्य मिळाले. भिसे गुरुजींच्या पुढाकाराने व ताराबाई मोडकांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने अनुताईंनी कोसबाडच्या टेकडीला नवचैतन्य आणले. आज आदिवासींमध्ये तळमळीने व उत्तमप्रकारे काम करणाऱ्या ज्या काही स्वयंसेवी संस्था आहेत त्यात



02685

अनुताईंच्या ग्राम बाल शिक्षा केंद्र व जनार्दन महाराजांचे सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ यांचा उल्लेख प्राधान्याने करावा लागेल.

खरेतर, आदिवासींना शिक्षण देणे ही गोष्ट म्हणावी तितकी सोपी नाही. कारण या लोकांचा नागरी समाजाशी फारसा संबंध येत नाही. त्यांची भाषा, संस्कृती, राहणीमान, रितीरिवाज सगळंच वेगळं. निसर्ग हेच त्यांचं जग. मग शिक्षणाची गरज त्यांना का असावी? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले व त्यावर अनेक चर्चाही झाल्या. परंतु आदिवासी किंवा वनवासी असले तरी तीही माणसेच आहेत. मग त्यांनाही आधुनिक प्रवाहात सामील करून घेणे हे माणुसकीच्या नात्याने आपले कर्तव्यच आहे या भावनेने त्यांना शिक्षण देण्याचे काम ताराबाई व अनुताईंनी केले. त्या पाड्यापाड्यांवर जाऊन, त्यांच्यामध्ये मिसळून, त्यांना शिक्षणाची गोडी लावून त्यांच्या मनाची तयारी करत. ह्या शिक्षणामुळे त्यांच्या दैनंदिन व्यवहारात अडचणी येऊ नयेत म्हणून त्यांच्या घरी जाऊन, मुलांबरोबर गुरांच्या मागे जाऊन कुरणात सुद्धा शिकवत. मुलांना शाळेच्या चार भिंतीआड डाबून न ठेवता त्यांच्याबरोबर निसर्गाच्या सान्निध्यात राहून व ठराविक पठडीतले शिक्षण न देता त्यांना जीवनोपयोगी शिक्षण कसे देता येईल हे पाहिले. 'शाळा तेथे मुले या ऐवजी मुले तेथे शाळा' हे तत्त्व अनुताईंनी अवलंबिलेले दिसते. शिक्षणाबरोबरच आरोग्याचे, स्वच्छतेचे महत्त्वही सप्रयोग त्यांनी पटवून दिले. अनुताई स्वत: आदिवासी मुलींचे केस विंचरणे, नखे, शेंबूड काढणे इ. कामे करत. आजच्या काळात Personal hygieneला फार महत्त्व आहे. हे काम अनुताईंनी सुरुवातीपासूनचं केलेले आहे. अंगणवाडी, बालवाडी, कुरणशाळा, विकासवाडी, पाळणाघर यासारखे पहिले प्रयोग अनुताईंनीच केले व हे शब्दही शिक्षणशास्त्रात त्यांनीच रूढ केले.

आज पश्चिम महाराष्ट्रात जे सुशिक्षित आदिवासी दिसतात त्याचे श्रेय अनुताई व जनार्दनमहाराजांसारख्या थोर तपस्वींनाच द्यायला हवे. त्यांचे अथक परिश्रम व मनापासून तळमळ ही त्यामागे आहे.

अनुताईंच्यावर अंक काढायचे ठरविल्यावर त्यांच्या भगिनी सौ. लीलाताई दंडवते, मामेबंधू रमेश पानसे व सहकारी शांताबाई आठवले यांनी तातडीने लेख लिहून दिले, त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत. अनुताई व त्यांच्या कार्याविषयी काही लेख वृत्तपत्रांमध्येही प्रसिद्ध झालेत त्यापैकी काही या अंकात पुन:प्रकाशित केले आहेत. याशिवाय स्वत: अनुताईंनी 'हाकारा'साठी लिहिलेल्या लेखांपैकी २ लेख व त्यांचाच एक अप्रकाशित लेख या अंकात पुनर्मुद्रित करीत आहोत.

हाकाराचा हा अंक अनुताईंच्या पवित्र स्मृतीस आमची आदरांजली ठरो!

-- रा. के. मुटाटकर


# विकासवाडीचे विकसते कमळ

-- अनुताई वाघ


श्रीमती ताराबाई मोडक यांनी १९४५ साली ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे प्रथम ग्रामीण बालवाडी सुरू केली. तेव्हापासून मी त्यांच्याबरोबर आहे. बोर्डी हे गाव समुद्रकिनारी आहे. शांत, सुंदर असा परिसर, सुसंस्कृत ग्रामस्थ आणि ऋषितुल्य आचार्य भिसेगुरुजी, चित्रेगुरुजी यांचे सत्प्रवृत्त करणारे कणखर वैचारिक प्रभुत्व, यामुळे बोर्डी गावाची मानसिक भूमी नव्या चांगल्या कामाचे सतत स्वागतच करीत असते.

ताराबाईंच्या बोर्डीच्या बालवाडीसही असेच ग्रामस्थांकडून सहकार्य मिळाले; पण खेडेगावात, कमी खर्चात परिसरातील वस्तूंच्या सहाय्याने बालमंदिर चालविण्याचा हा त्यांचा प्रयोग होता. त्यामध्ये अनेक अपेक्षित व अनपेक्षित अडचणी आल्या. लहानशा गावात हरिजनवाडा पण आहे. तेथे बुरूडकाम चालते. पुरुषमंडळी बहुधा मुंबईस कामाला जातात.

बायकामंडळी चिकुसाठी करंडे, टोपल्या, सुपे वगैरे विणण्याचे काम करतात. बालवाडीला लागूनच ही वस्ती असल्यामुळे हरिजनांची मुले बालवाडीत मोठ्या संख्येने येत होती; म्हणूनच गावातील सवर्णांची मुले येत नव्हती. त्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. प्रत्येक घरी जाऊन समजावले. गावात निरनिराळ्या गल्लीतून एखाद्याच्या प्रशस्त ओटीवर, त्या विभागापुरती



अंगणवाडी



बोर्डीची बालवाडी
झोपडीबाहेरच अंगणात भरलेल्या बालवाडीत स्वच्छता, वेणीफणी, खेळ आणि शिक्षणही !

मुले गोळा करून गाणी-गोष्टी घेतल्या. या आमच्या प्रचारवाड्या. त्यामुळे गावातील मंडळींना बालवाडीचे महत्त्व पटले. मग गावाच्या मध्यवर्ती जागेत एक सात दिवसांचे बालशिक्षण-नगर भरविले. मुलांनी बालवाडीत खेळायचे. पालकांनी लांब उभे राहून पहायचे अशी व्यवस्था होती. गावातील व हरिजनवाड्यातील मुले एकत्र खेळतील, बसतील, खातील, पितील यासाठी वरीलप्रमाणे अनेक प्रयत्न झाले आणि सात आठ वर्षात आम्हाला यश आले.

खेडेगावात बालवाडी कशी चालवावी, हे एक खास काम घेऊन श्रीमती ताराबाई बोर्डीस आल्या; पण तेथे एका कामातून दुसरे काम निघत गेले. एका समस्येतून दुसरी समस्या निघत गेली आणि त्याची पूर्ती करता करता आजची विकासवाडी विकसली आहे. विकसते आहे. म्हणूनच ग्रामीण शिक्षण - सरोवरातील विकासवाडी हे हळूहळू एकेका पाकळीने उमलत जाणारे कमळ आहे असे मी मानते.

बोर्डीला गावातील सर्व जातीजमातींची व समाजातील सर्व थरांतील बालके बालवाडीत येऊ लागली. यशाचा हा पहिला टप्पा होता; पण यात अजून एक उणीव होती. जवळपास आदिवासींची वस्ती होती. आदिवासी गावात निरनिराळ्या कामांसाठी येत असत. त्यांची मुलेही पुष्कळदा गावात येत असत. 'बालवाडीत मुले पाठवा' म्हटले तर 'का नाही, जरूर पाठवू' असे म्हणत. मुले बालवाडीत येतातच असा त्याचा भावार्थ होता; पण प्रत्यक्षात मात्र मुले आली नाहीत. मग आम्ही त्यांच्या वस्तीत जायला सुरुवात केली. ही आमची 'अंगणवाडी' एक पाकळी उमलली. आदिवासींच्या वस्तीत एखाद्या मोठ्या झाडाखाली आम्ही मुले गोळा करीत असू. गाणी, गोष्टी, खेळ, थोडा हस्तव्यवसाय, लहानशा सहली इ. कार्यक्रम तेथे होत असत. स्वच्छता सर्वप्रथम व्हायची. पाण्याची अडचण. मग आम्ही मुलांची अंगे ओल्या रुमालाने पुसून घेत असू. खरजेवर कडुलिंबाचा पाला वाटून लावायचा. कधी कधी त्यातल्या त्यात जवळपासच्या विहिरीवर नेऊन मुलांना आंघोळी पण घालायच्या.

या आमच्या अंगणवाडीमुळे आम्हाला खूप नवे शिकायला मिळाले. आदिवासी मुले

बालवाडीत येत नाहीत. कारण (१) त्यांना त्यांची लहान भावंडे सांभाळण्यासाठी घरी राहावे लागते. (२) त्यांना गुरे चारण्यासाठी जावे लागते. (३) थोड्याशा कमाईसाठी देखील त्यांना कामाच्या पाठीमागे धावावे लागते. ही त्यांची परिस्थिती लक्षात घेऊन योग्य अशी शाळा असायला हवी. यावर श्रीमती ताराबाईंनी चिंतन केले व अशी नवी शाळा – म्हणजेच 'विकासवाडी' स्थापन केली. येथे तान्ह्या बाळांसाठी पाळणाघर, मधल्या मुलांसाठी बालवाडी, मोठ्या मुलांसाठी प्राथमिक शाळा असे तिन्ही विभाग एकत्र चालतात. 'विकासवाडीची' ही आणखी एक पाकळी उमलली. अंगणवाडी चालविताना आणखीही काही गोष्टी आमच्या लक्षात आल्या. आदिवासी लोक कष्टाळू आहेत. प्रामाणिक आहेत. त्यांना संस्कृती आहे. अनेक वर्ष डोंगरकपारीत राहिल्यामुळे ही मंडळी सुधारित जगापासून दूर राहिली आहेत, म्हणून त्यांची अस्मिता निद्रिस्त राहिली आहे.

आदिवासी मुले ही बुद्धिमान, चपळ, काटक आणि प्रसंगास तोंड देणारी आहेत त्यांचे डोळे तीक्ष्ण आहेत. नेम अचूक आहेत. विनोदवृत्ती, नृत्य आणि अभिनयकला त्यांच्यात भरपूर आहे. आदिवासींतील मंदबुद्धी अगर प्रश्नार्थी असे एकही मूल मला या वीस वर्षांत अजून आढळले नाही. खाणीत पडलेल्या या हिऱ्यांना वेचले पाहिजे. पैलू पाडले पाहिजेत. आमच्या भारताची ही चमकणारी रत्ने आहेत.

बोर्डीलाच १९५४ साली आम्ही एक लहानशी प्रयोगात्मक विकासवाडी चालविली. ती लोकांना आवडली. 'सर्व भारतभर आदिवासी बालकांच्या शिक्षणाबाबत हीच समस्या आहे. तरी हा प्रयोग तुम्ही करा' असा श्रीमती ताराबाईंना मंडळी आग्रह करू लागली, म्हणून मग जरा मोठ्या प्रमाणावर 'विकासवाडी' योजना त्यांनी तयार केली. विकासवाडी कमळाची ही आणखी एक पाकळी उमलली.

विकासवाडी योजनेमध्ये पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळा, खालचे वर्ग मिळून एकत्र चालणारी विकासवाडी. हे विकासवाडीचे तंत्र समजून घेऊन त्या यशस्वीपणे चालविण्यासाठी शिक्षण हवे म्हणून प्राथमिक शिक्षक ट्रेनिंग कॉलेज इतक्या गोष्टींचा अंतर्भाव होतो.

विकासवाडी योजनेद्वारा आदिवासी शाळांच्या शिक्षणाची समस्या सोडवावयाची होती म्हणून जेथे आदिवासींची भरपूर वस्ती आहे, अशा ठिकाणी काम करावे असे श्रीमती ताराबाईंनी ठरविले. श्री हरिश्चंद्र पाटील (माजी कुलगुरु, राहुरी कृषी विद्यापीठ) यांनी कोसबाडला आग्रहाने बोलाविले आणि १९५७ साली बोर्डीची संस्था कोसबाडला आली. त्या वेळी समस्या होती – (१) आदिवासी मुले शाळेत नियमितपणे येती कशी होतील? (२) ती शिकती कशी होतील? (३) कोणत्या प्रकारचे शिक्षण त्यांच्या जीवनास उपयोगी पडेल? या तीनही समस्या सोडविताना तेथे विकासवाडी-कमळाच्या आणखी पाकळ्या उमलल्या.

मुलांना गुरे चारायला न्यावे लागते म्हणून तेथे कुरणात शिक्षकांनी जायचे. तेथे भुरभुरत्या पावसात, झाडांच्या छायेखाली शाळा भरवायची. गुरे इकडे तिकडे चरत असतात. मुलांची तिरपी नजर त्यांच्याकडे असते. तेथे या कुरणात गुरुजी मुलांचा गोष्टी, नाटके, अभिनयगीते, गप्पा-गोष्टी इत्यादीद्वारा भाषा, विज्ञान, भूगोल, आरोग्य, नागरिक-शास्त्र इत्यादी विषयांमध्ये प्रवेश करून देतात. पाने, फुले, पिसे, काटक्या, अंडी, शंख, शिंपले आदीद्वारा गणित होते. निसर्गात विपुल शैक्षणिक साधने लपली आहेत. विनामूल्य मिळतात फक्त आमची दृष्टी हवी. तेव्हा अशी

ही 'कुरणशाळा' ही एक नवी पाकळी उमलली.

मुलांना काम करावे लागे म्हणून शाळेस जोडून छोटे छोटे व्यवसाय सुरू करण्यात आले. 'बालउद्योगालय' ही एक आणखी पाकळी उमलली. इतके करूनही कित्येक मुले शाळेत येत नाहीत त्यांच्यासाठी 'रात्रीची शाळा' ही आणखी एक नवी पाकळी उमलली. मुली शाळेत येत नव्हत्या त्यासाठी स्त्रीशिक्षिका नेमल्या. अनेक खटपटी करून मुलांना शाळेत आणले तरी त्यांचे शिकण्याकडे लक्ष लागत नव्हते. त्यासाठी अध्यापनपद्धतीत फरक केले. आदिवासी जीवनातून त्यांच्या परिसरात घडणाऱ्या घटना लक्षात घेऊन निरनिराळ्या विषयांची मांडणी करणे, वाचन, धडे, उदाहरणे, गाणी, गोष्टी, गप्पागोष्टी या सर्वांमध्ये त्यांच्या जीवनाची संगती लावणे याकडे कटाक्ष होता. ही मुले रानात भटकतात तर 'भटका' पण ती वस्तू शाळेत घेऊन या असे सांगितले. एक छान वस्तुसंग्रहालय तयार झाले. या संग्रहालयात मारलेले साप, मुंग्यांचं वारूळ, माणसाची कवटी, माशाचा दात, शेंगा, बिया, घरटी, पिसे अशा अनेक वस्तू आहेत. या वस्तूंवरूनच गप्पागोष्टी, उदाहरणे. चित्रकला, वाचन, धडे, असे अनेक विषय घेतले जातात. स्वाभाविकपणे मुलांचे लक्ष विषयाकडे लागते आता वीस वर्षांनंतर इतकी खटपट करावी लागत नाही. कारण ऐकणे, लक्षात ठेवणे व पुनः प्रकट करणे या गोष्टींची आता मुलांना सवय लागली आहे. वीस वर्षांपूर्वी तशी सवय मुळीच नव्हती. तेव्हा वस्तुसंग्रहालय हाही एक विकासवाडीचा महत्त्वाचा भाग आहे.

पाड्यापाड्यावर जाऊन मुलांचे मनोरंजन करणे, पालकांना वेळोवेळी शाळेत बोलावणे, पावसाळ्याशिवाय इतर वेळी जवळ जवळच्या पाड्यावरून अंगणवाड्या चालविणे वगैरे कार्यक्रमामुळे मनी धरलेला हेतू बराच सिद्ध होत होता. आता २० वर्षांनंतर प्राथमिक शाळेतील इयत्ता १ली मध्ये ५ ते ६ वर्षे वयाची ४०-४५ मुले नेहमी उपस्थित असतात. म्हणून ४थी पर्यंत सरळ जातात. फारच कमी गळती होते. इ. ५वी पासून पुनः गळती होण्यास सुरुवात होते. कारण आता १०-१२ वर्षे वयाची मुले पालकांना घरकामाला अगर थोडी कमाई करायला हवी असतात. शिवाय इयत्ता ७वी पर्यंतचे सध्याचे पुस्तकी शिक्षण घेऊन पुढे मुलांना भवितव्य काय? सगळ्यांना ८वीत जाता यावयाचे नाही आणि हा शाळेत शिकलेला मुलगा शेणात हात घालायचा नाही. पालकांच्या या समस्या काही अंशाने सोडविण्यासाठी प्राथमिक शाळेच्या इ. ५वी ते ७वी इयत्तामधून 'कार्यानुभव प्रकल्प' सुरू केला आहे. विकासवाडीची ही आणखी एक पाकळी उमलली आहे सुतारकाम, लेथवर्क, शिवणकाम व शेतीकाम असे व्यवसाय जोडलेले आहेत. शाळेव्यतिरिक्त रोज दोन तास मुलांनी काम करावयाचे आहे. कच्च्या मालाचा खर्च वजा जाता उरलेली रक्कम शिष्यवृत्ती म्हणून मुलांना मिळते.


या नवीन उपक्रमामुळे (१) तीन वर्षे एक व्यवसाय प्रत्यक्ष हातून गेल्यामुळे मुलांच्या हातात काही कौशल्य येते. (२) आत्मविश्वास वाढतो. (३) श्रमप्रतिष्ठा वाढते. (४) थोड्याशा का होईना, शिष्यवृत्तीमुळे पाट्या पेन्सिली, पुस्तके, वह्या व गणवेश यांचा प्रश्न सुटतो. गेली तीन वर्षे ५ ते ७ इयत्तांमध्ये गळती नाही.

अनेक उपायांनी साक्षर झालेल्या मंडळींची साक्षरता टिकून राहावी म्हणून कित्येक अडचणींना तोंड देत देत संस्थेने एक छापखाना चालवेला आहे. श्रीमती ताराबाईंची ही अंतिम इच्छा होती. या छापखान्यात शिकलेली आदिवासी मुलेच काम करीत आहेत. त्यात तीन मुली आहेत. जुळवणे, छापणे, कापणे,

(पान ५२ वर)

# ग्राम आरोग्य प्रकल्प कोसबाड

-- अनुताई वाघ



कोसबाड टेकडीवरील पाळणाघर

पस्तीस वर्षांपूर्वी आम्ही बोर्डीला आलो, त्या वेळी खेडेगावातील बालवाडी व्यवस्थित, शास्त्रशुद्ध पण कमी खर्चात कशी चालविता येईल ही समस्या डोळयापुढे होती. त्याबाबतीत अनेक प्रकारचे प्रयोग करावे लागले. एक समस्या सुटत असताना तिच्यातून निघालेली दुसरी समस्या पुढे उभी राहावी, ती सोडविण्यासाठी पुन्हा प्रयत्न करणे आणि त्यातून काही नवे काम, नवी योजना सुरू व्हावी, याप्रमाणे कामातून काम, निघता निघता विकासवाडीचा प्रपंच बराच मोठा झाला आहे. विकासवाडीचे हे कमळ असे फुलतच चालले आहे. दर चार-सहा महिन्यांनी एखादी नवी पाकळी उमलते व सगळयांचे लक्ष वेधून घेते. आमचा ग्राम आरोग्य प्रकल्प, ही अशीच एक नुकतीच उमललेली नवी पाकळी आहे.

खेडेगावात बालवाडीची सुरुवात केली तेव्हा प्रथम ही गोष्ट लक्षात आली की, लहान मुलांच्या स्वच्छतेकडे, आरोग्याकडे आणि पोषणाकडे दुर्लक्ष झालेले आहे आणि त्यासाठी बालवाडीत प्रत्यक्ष उपाय करणे आणि पालकांना त्याविषयी अप्रत्यक्षरीत्या देता येईल ते शिक्षण देणे हे बालवाडीच्या कामांपैकीच एक काम आहे. म्हणून बालवाडीच्या सुरुवातीलाच हात-पाय धुणे, केस विंचरणे, नखे काढणे वगैरे काम होते. कधीकधी मुलांना बालवाडीत आंघोळीपण घातल्या जातात. उवा काढणे, खरूज नाहीशी करणे, डोळे आले तर वेळीच योग्य उपाय करणे वगैरे गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष पुरविले जाते. आठवड्यातून एक वेळा दात, नखे, केस, कपडे, त्वचा वगैरे गोष्टींची तपासणी होते. त्याची नोंद ठेवली जाते. स्वच्छ मुलांना +, मध्यम मुलाला D, अस्वच्छ मुलाला ० अशा खुणा ठरवून दिल्या आहेत. आपल्या नावापुढे कोणती खूण, आली आहे ते मुले पाहतात व एक नंबरची खूण मिळविण्याचा



पूर्वप्राथमिक विभागातील आदिवासी बालके आणि त्यांचा चित्रकलेतील मुक्तहस्त

प्रयत्न करतात. पालकांचेही लक्ष या तक्त्याकडे असते, म्हणून आपले मूल घरूनच स्वच्छ करून पाठविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हे एक प्रकारचे पालक-शिक्षण होय.

बालवाडीच्या कार्यक्रमात आम्ही स्वच्छतेकडे लक्ष देत होतो. देवी, पोलिओ, बीसीजी, ट्रिपल, आदींची इंजेक्शन्स दिली जातील याची काळजी घेत होतो. या गोष्टींना पालकांचा सहकार मिळत नव्हता त्यासाठी गृहभेटी देणे, मुलांच्या मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करून पालकांना बोलाविणे व त्या वेळी वरील गोष्टींचे महत्त्व पटवून देणे वगैरे प्रयत्न करावे लागले. वर्षातून एकदा सर्व मुलांची वैद्यकीय तपासणी घेतो. अडचण ही आहे की वैद्यकीय तपासणीमध्ये काही दोष आढळून आले, काही विशेष औषधे देण्याची जरूर भासली अथवा काही सकस आहार देणे अवश्य असले तर त्यासंबंधी संस्थेला पुरेशा पैशाअभावी काहीच करता येत नव्हते. पुढे समाजकल्याण बोर्डातर्फे मुलामागे प्रत्येक दिवशी १५ पैसे खाऊ देण्याची योजना सुरू झाली पुढं १५ ते १८ झाले व आता सध्या मुलामागे दररोज २० पैशांचा खाऊ दिला जातो. आमच्या अकराही बालवाड्यांतून ही योजना चालू आहे. त्यामुळे शरीरवाढीवर बराच चांगला परिणाम होतो. असे दिसते. मर्यादित संख्येत खाऊचे पैसे मिळतात. वाढती महागाई आहे त्यामुळे हा फायदा पुष्कळ अपुरा आहे; पण काहीच नसण्यापेक्षा बरा.

***पाळणाघरे***

गेल्या चार-पाच वर्षांत केंद्रीय समाजकल्याणखात्याकडून, निरनिराळ्या संस्थांमार्फत पाळणाघरे सुरू झाली आहेत. या पाळणाघर-योजनेमध्ये दर आठवड्याला डॉक्टरची एक भेट व मुलामागे दरमहा दोन रुपये औषधासाठी अशी व्यवस्था आहे. त्यामुळे आता मुलांना जरूर ते औषधपाणी करणेही शक्य होऊ लागले. दर आठवड्याला डॉक्टरांची भेट होते त्या वेळी केवळ पाळणाघरांतीलच मुले तपासली जातात असे नाही. दुसरी लहान- मोठी मुले-मुलीही डॉक्टरांकडे येतात आणि मोठी माणसेही येतात. डॉक्टर सगळ्यांना तपासतात; पण औषधोपचार अथवा इंजेक्शने यासाठी त्यांच्याजवळ काही सोय नाही. माणसे गरीब असल्यामुळे स्वत: पैसे देऊ शकत नाहीत. ग्रामीण भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना

स्वत:ची पदरमोड करून औषध देणे परवडत नाही.

आता इतक्या वर्षांच्या कामानंतर आदिवासी मंडळींना डॉक्टरकडून तपासून घेणे व औषधपाणी करणे पटले आहे; पण दवाखाने फार लांब आहेत. तेथपर्यंत पोहोचण्यासाठी वाहनाची सोय नाही. स्वत:ची रोजची मजुरी बुडवून मंडळी दवाखान्यात जातात तर तेथे दिवसच्या दिवस रखडावे लागते आणि तरीही योग्य उपचार अथवा सल्ला त्यांना मिळतोच असे नाही, ही वस्तुस्थिती आहे. कारणांचा शोध घेण्याची आवश्यकता नाही; पण उपाय मात्र शोधले पाहिजेत.

आमच्या संस्थेचे बालसेविका विद्यालय, अंगणवाडी, वर्कर्स ट्रेनिंग प्रोग्रॅम या दोन्ही ठिकाणी डॉ. जैन आरोग्यशिक्षक म्हणून काम करतात. आमच्या सर्व पाळणाघरांना साप्ताहिक भेटी देतात. त्यामुळे वरील परिस्थिती त्यांच्या लक्षात आली आणि जेथे जेथे आपल्या बालवाड्या अगर पाळणाघरे आहेत, तेथे तेथे आपले एक आरोग्यकेंद्र असावे, त्या आरोग्यकेंद्रात सर्वच रुग्ण तपासले जावेत, किरकोळ दुखण्यावर तेथेच उपचार व्हावेत व गंभीर दुखण्याइतक्या माणसांना सरकारी दवाखान्यात आपल्या शिफारसीने पाठविले जावे अशी योजना त्यांनी आखली. योजना खूप चांगली आहे; पण पैशाशिवाय काय करणार? आमच्या आदिवासी बंधु-भगिनींच्या नशिबाने व डॉक्टरांच्या सदिच्छेने पैसे देणारा दाताही मिळाला. पश्चिम जर्मनीच्या तेरे देस होम या संस्थेकडून श्री. आदि पटेल यांच्यामार्फत या प्रकल्पाला भरीव आर्थिक मदत मिळाली. १ जून १९८० पासून कोसबाड परिसरात हा आमचा आरोग्यप्रकल्प सुरू झाला. प्रकल्पाचे मुख्य संचलन डॉ. एच. पी. जैन करतात. आमच्या बालवाडी-शिक्षिका त्यांच्या मदतनीस मुली यांना प्रथम एक आठवड्याचे त्यांनी प्रशिक्षण दिले. साधी दुखणी, त्यांची लक्षणे व त्यावरील सोपे उपाय शिकविले. निरनिराळया बाटल्यांतून गोळया भरल्या. त्यावर चिठ्ठ्या चिकटवल्या, केसपेपर तयार केले आणि १. करबटपाडा, २. मानकरपाडा, ३. डोंगरीपाडा, ४. मुडापाडा, ५. चिंबावे, ६. मुख्य केंद्र आदि सहा ठिकाणी केंद्रे उघडली. मुख्य कार्यालय आणि औषधांचा साठा आमच्या संस्थेतच ठेवला.

***एक हजार रुग्ण***

शिक्षिका बालवाडी संपल्यावर दररोज दीड तास आपला हा दवाखाना चालवितात, साधारण दुखण्यावर औषधे देतात. स्वत:ला कळणार नाही अशा रुग्णांना मुख्य केंद्रामध्ये पाठवितात. डॉ. जैन मुख्य केंद्रामध्ये दररोज सकाळी ९ ते १०-३० पर्यंत असतात आणि मग बाकीच्या केंद्रांवर वेळापत्रकाप्रमाणे आठवड्यातून एकदा भेट देतात. दर शनिवारी सगळ्या आरोग्य प्रकल्प कार्यकर्त्यांची सभा होते. केलेले काम तपासले जाते. अडचणी समजून घेतल्या जातात व नवीन काही विषय पण शिकविले जातात. औषधांचे वाटप; नोंद, केसपेपर्स, कोणत्या दुखण्याने किती रोगी आजारी आहेत वगैरेची नोंद व अशा अनेक प्रकारच्या नोंदी केल्या जातात. डॉक्टर त्या नोंदी बारकाईने तपासतात. त्यामुळे एका वर्षात आमच्या बालवाडी शिक्षिका अर्ध्या डॉक्टर झाल्या आहेत असे म्हटले तरी चालेल. विशेष म्हणजे त्यांच्या मदतनीस आदिवासी मुली पण पटापट गोळया देतात. डोस तयार करतात. चांगल्या कंपाउंडर झाल्या आहेत. नुकतीच गेल्या सबंध वर्षातील रुग्णांची सरासरी काढली तर दरमहा सर्व केंद्रे मिळून एकहजार रुग्ण अशी आहे. ११ मार्च १९८१ रोजी पाळणाघरातील मुलांची वैद्यकीय तपासणी करून १४ सुदृढ बालकांना बक्षिसे देण्यात

(पान ३६ वर)




02685

## एका परिसंवादातील अनुताईंचे विचार

# : आदिवासी विकास व स्वयंसेवी संस्था :

-- श्रीमती अनुताई वाघ



बालकल्याण कार्याचा गौरव उपराष्ट्रपती श्री. हिदायतुल्ला यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना अनुताई : दि. १८/३/८०

भारताच्या निरनिराळ्या भागातील डोंगरदऱ्यामधून आदिवासींची वस्ती विखुरलेली आहे. दळणवळणाच्या सोयी नसणे व सुधारित संस्कृतीपासून शक्य तितके लांबच राहण्याची आदिवासींची वृत्ती, त्यामुळे ही जमात अजून बऱ्याच बाबतीत मागे राहिली आहे. भारतीय प्रणेत्यांनी या गोष्टींचा विचार करून आदिवासींना सर्वसाधारण जनतेच्या बरोबरीने आणण्यासाठी उपायांचे चिंतन केले व बरेचसे उपाय सर्व बाजूंनी योजिण्यात आले.

यात शासकीय प्रयत्न व स्वयंसेवी संस्थांनी केलेले प्रयत्न, असे दोन मुख्य भाग पडतील. आपण येथे स्वयंसेवी संस्था व त्यांच्याद्वारे आदिवासी विकासात कितपत मदत झाली, अजून होऊ शकेल, मागील काय अडचणी आहेत या गोष्टींचा विचार करणार आहोत.

आदिवासींच्या समस्यांकडे सर्वांचे लक्ष वेधून घेण्याचे मुख्य काम स्वयंसेवी संस्थांनी केले आहे. पूज्य ठक्करबाबा, श्री. बाळासाहेब खेर, श्री. द. ना. वांद्रेकर, पूज्य आचार्य भिसे, पूज्य ताराबाई मोडक आदि ऋषितुल्य व्यक्तींनी प्रथम हे कार्य हाती घेतले. श्री. दादासाहेब बिडकर यांच्या सारखे अजूनही हे कार्य जिद्दीने करीत आहेत. महाराष्ट्रातील मला माहीत असलेल्या प्रमुख व्यक्तिंची नावे मी घेतली. पण सर्व भारतभर ठिकठिकाणी अशा मान्यवर व्यक्ती झाल्या आहेत व अजूनही काम करीत आहेत. अशा प्रेरणा देणाऱ्या व्यक्तींनी आपल्या भोवती लहान मोठे कार्यकर्ते जमवले व स्वयंसेवी संस्था निर्माण झाल्या. मला माहित असलेल्या स्वयंसेवी संस्था खालीलप्रमाणे आहेत.

(१) भारतीय आदिम जाती सेवक संघ. (२) आदिवासी सेवा मंडळ (३) डांग सेवा मंडळ (४) चिल सेवा मंडळ (५) जंगल सहकार सोसायटी (६) सर्वोदय मंडळ (७) नूतन बाल शिक्षण संघ (८) गोखले एज्युकेशन

सोसायटी वगैरे. सर्वोदय मंडळाचे काम हे शासनाने पुरस्कृत केलेले पण स्वयंसेवी संस्थांनी चालू केलेले आहे. आश्रम शाळेचे दोन प्रकार आहेत. बऱ्याचशा आश्रम शाळा स्वयंसेवी संस्थांनी चालवावयास घेतल्या आहेत तर काही आश्रम शाळा शासनामार्फतही चालतात.

आदिवासींच्या मध्ये काम करावयाचे हे नक्की केलेले असतेच असे नाही. ज्याला जी योग्य वाटेल ती समस्या हाती घेऊन मंडळी कामाला सुरुवात करतात. अनुभव मात्र असा आहे की सर्व समस्या एकामध्ये एक गुंतल्या असल्यामुळे, कोणतीही एक समस्या घेऊन बसल्याने काम होत नाही. सगळया समस्यांकडे समन्वय दृष्टीनेच पहावे लागते. अर्थात ज्याने जो प्रश्न प्रमुख म्हणून घेतला असेल त्या प्रश्नाभोवतीच बाकीचे प्रश्न येतात. अशा समस्या तरी कोणत्या (१) गरिबी हटविणे, (२) अज्ञान घालविणे. (३) सर्व साधारण समाजामध्ये मिसळता यावे व काही तरी करून दाखवावे, अशी अस्मिता निर्माण करणे. (४) जाचक रूढी व अंधश्रद्धा नाहीशा करणे. ही यादी आणखीही अशीच वाढविता येईल.

पहिली समस्या आर्थिक प्रश्न सोडविणे ही आहे. डोंगर दऱ्यातून वावरणाऱ्या या मंडळींना स्वतःची कमाई कशी करावी व कशी वाढवावी हे आतापर्यंत समजले नव्हते. सर्पण, पान, डिंक, मध, कंदमुळं, फळं, औषधी वनस्पती, हाडं, घरटी, पिसं आदि डोंगरी संपत्ती पुष्कळ आहे. आदिवासी मंडळी या वस्तू शहरामध्ये आणून विकतात सुद्धा, पण त्यांना योग्य भाव काय असावा हे कळत नाही. या वस्तूंची व्यापारी किंमत जाणणारे दलाल डोंगराच्या पायथ्याशी जाऊन पोहोचतात आणि एकदम माल खरेदी करतात. हा माल स्वस्तात गेला की महागात गेला, ते आदिवासी मंडळींना कळत नाही. पैसे हाती आल्याशी गाठ.

डोंगरी संपत्ती गोळा करण्याशिवाय इतर काम म्हणजे जंगल खात्यात व लोकांच्या शेतात मजुरी करणे. श्रम आणि मजुरी यांचे गुणोत्तर प्रमाण काय असावे हे न समजल्याने धूर्त मंडळींना पुष्कळ स्वस्तात मजूर मिळतात. पण मजुरी करणारे मात्र दारिद्र्यातच खितपत पडतात.

आदिवासींना करता येतील असे पुष्कळ उद्योग आहेत. विटा पाडणे, कोळश्याच्या भट्या लावणे, जंगलतोड करणे, सुतारकाम करणे, असे किती तरी उद्योग आहेत. थोडी शास्त्रशुद्ध माहिती मिळाल्यास, आहे त्या परिस्थितीत सुद्धा अधिक चांगली शेती ही मंडळी करतील. थोडीशी शहराची हवा लागली की मोठमोठ्या शहरांकडे धाव घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे. माझ्या माहितीप्रमाणे आदिवासी अजून फार मोठ्या संख्येने शहराकडे जात नाहीत. गेले तरी पुरुष जातात. बायका आपल्या जागीच असतात. तेव्हा आर्थिक समस्या सोडविण्याचे काम हाती घेणाऱ्या मंडळींना प्रथम डोंगरी संपत्तीचा योग्य उपयोग कसा करून घेता येईल, सशास्त्र शेती विषयक ज्ञान कसे देता येईल व आदिवासी भागात उद्योगधंदे कसे वाढतील, याचा विचार करावयाला हवा.

दुसरी समस्या ही सामाजिक समस्या आहे. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जसे अनेक प्रकारचे शिक्षण हवे तसेच सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी पण शिक्षणाची आवश्यकता आहे. पुष्कळदा असे आढळून येते की काही विशिष्ट वेळी पैसे भरपूर मिळतात पण त्यांचा योग्य विनियोग होत नाही. उदा. दुष्काळी भागात विशेष कामे काढली होती. तेव्हा एकेका घरात चार-चार, पाच-पाच माणसे थोडीफार रोजगार मिळवीत होती. सगळ्यांची बेरीज केली तर मध्यम स्थितीतील माणसापेक्षा ही कमाई जास्त होती. तरीही मंडळी अर्धपोटीच रहात होती आणि अंगभर कपडे घेऊ शकत नव्हती. याचे कारण मिळविलेला पैसा व्यसनात जात होता. तेव्हा पैसा मिळविणे व त्याचा उपयोग करणे, या दोन्हीही बाबतीत शिक्षणाची

आवश्यकता आहे. याशिवाय एकमेकांशी सहकाराने वागणे, आपली चांगली संस्कृती टिकविणे, दुष्ट रूढी टाकून देणे, व्यसनमुक्त होणे, वगैरे गोष्टी आदिवासी समाजाने स्वत:च शिकून करायला हव्यात. एकूण आदिवासी कल्याणामध्ये शिक्षणाला फार मोठे महत्व आहे. हे लक्षात घेऊनच आश्रमशाळा, एक शिक्षकी शाळा निघाल्या. पण याबाबतीत एवढे काम पुरेसे नाही. सर्व बाजूंनी सारखा विकास व्हावा म्हणून एखाद्या व्यक्तीने अगर संस्थेने काही विशिष्ट क्षेत्रामध्ये सतत राहिले पाहिजे व थोडाफार फरकाने सर्व समस्यांना हात घातला पाहिजे. आमच्या २१ वर्षाच्या कोसबाड येथील अनुभवावरून पटले आहे की कोसबाड परिसरात गेली २१ वर्षे दोन संस्थांच्या सहकार्याने आर्थिक व शैक्षणिक समस्या सोडविण्याचे काम चांगले चालले आहे. त्यामुळे आमच्या परिसरातील आदिवासी लक्षात येण्यासारखे सुधारले आहेत.

पाळणाघरापासून माध्यमिक शाळा, डी एड् कॉलेज, शेतकी शाळा आदि शिक्षण संस्था येथे आहेत. त्या बरोबरच शेती संशोधन, शेती सुधारणा व शेतीलगत छोटे छोटे उद्योग यांचे शिक्षणही येथे मिळते. आदिवासींच्या शिक्षणाच्या बाबतीत आणखी एक विशेष गोष्ट लक्षात घ्यावयास हवी, ती ही की तेथे पुस्तकी शिक्षण उपयोगाचे नाही. प्रात्यक्षिकाच्या द्वारे अनुभवातून शिक्षण दिले पाहिजे. तसेच सर्व काम प्रत्यक्ष आदिवासींच्यामध्ये चालते. त्याचा स्पष्ट फायदा आम्हाला दिसून येतो. कोसबाडला २१ वर्षापूर्वी आदिवासी मुली अजिबात शाळेत नव्हत्या. शाळेत उपस्थिती अनियमित होती. इयत्ता पहिलीपासूनच गळती होती. ही शिक्षणाची परिस्थिती झाली. खरे म्हणजे गवताने आच्छादिलेल्या लहान लहान झोपड्याच होत्या. मुलांच्या अंगावर बहुतेक कपडा नसायचाच. भगिनींचे कपडे फाटके तुटके असायचे. दारूचे मांडव उघड्यावर पडले होते. दारू पिऊन झिंगलेले मुख्य रस्त्यातून अर्वाच्य बोलताना आढळत. आज २१ वर्षानंतर वरील चित्र चांगलेच बदलले आहे. आता मुलांच्या बरोबरीने मुली शाळेत येतात. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बऱ्याच मुलामुलींनी पूर्ण केले आहे. पालक हौसेने आपली मुले शाळेत आणून बसवितात. कपडे व इतर राहाणी सुधारली आहे. बऱ्याच घरांवर कौले चढली आहेत. स्वत:चा माल पिकवून बाजारात नेऊन, योग्य किमतीला विकण्याचे भान आले आहे. संपूर्ण व्यसनमुक्ति झाली आहे, असे म्हणता येणार नाही. तथापि पुष्कळसा पगडा कमी झालेला आहे. आमच्या भोवती असलेल्या आदिवासी मंडळीतूनच पुढारी बंधुभगिनी तयार झाल्या आहेत. आमच्या प्रौढ शिक्षण वर्गापैकी १२ आदिवासी संघटक आपापल्या पाड्यावर वर्ग चालवित आहेत व फार मोठ्या संख्येने प्रौढ स्त्री पुरुष वर्गाला उपस्थित रहातात. हौसेने गाणी म्हणून दाखवितात, नृत्य करतात. कित्येकांनी बँकेमध्ये खाती पण उघडली आहेत.

हे सर्व सांगण्याचा उद्देश आमचा मोठेपणा दाखवावा असा नाही तर सतत एके ठिकाणी, राहून शैक्षणिक आर्थिक व सामाजिक समस्या एकसमय विच्छेदेन करून सोडविल्यात, तर काही काम झाले असे समाधान मिळते, हे सांगण्यासाठी आहे. हा अनुभव. जेथे जेथे मोठ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्था आहेत त्यापेक्षा कितीतरी अधिक संख्येने पुढे यावयाला हव्या आहेत. पुष्कळ काम पडले आहे, आणि पुष्कळांना काम करण्याची हौस पण आहे, या दोहोंचीही सांगड घालायला हवी.

काही सामाजिक कामे अशी असतात की ती स्वयंसेवी संस्थांनीच हाती घ्यावी. त्या संस्थेला त्या कामासाठी शासनाकडून व समाजाकडून प्रोत्साहन, आर्थिक मदत व अन्य सोयी पुरविल्या जाव्यात. आदिवासी विकासाचे प्रचंड काम यापैकीच एक आहे. म्हणून अनेक स्वयंसेवी संस्थांनी पुढे यावयाला हवे. तशा त्या



85 4A

येतातही पण त्यांच्या मार्गात काही अपेक्षित व काही अनपेक्षित अडचणी. उभ्या रहातात. त्यांचाच आपण येथे विचार करू.

१) सर्वात प्रथम अडचण म्हणजे सेवानिष्ठ कार्यकर्ते मिळणे, पुष्कळ मंडळींना आदिवासी भागात जाऊन काम करण्याची इच्छा आहे. पण अनेक व्यक्तिगत गैरसोयी उभ्या राहतात. टपाल नाही, वृत्तपत्रे नाहीत, वैद्यकीय मदत नाही, राहावयाला नीट घर मिळत नाही, संरक्षण नाही, मुलांच्या शिक्षणाची सोय नाही. अशा अनेक नकारांना कार्यकर्ता घाबरतो. एखादा भावनेच्या भरात पुढे सरसावला तरी थोड्याच दिवसात कंटाळून काम सोडून देतो. वरील कामाला तर वर्षानुवर्षे एकाच जागी जिद्दीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज आहे. स्वयंसेवी संस्थेत असे कमीतकमी दोन तीन कार्यकर्ते तरी हवेत. बाकीचे मग खो खो खेळत राहिलेत तरी चालतील. असे सेवानिष्ठ, त्यागी कार्यकर्त्यांचे पथक तयार व्हावे या साठीच शांती सैनिक योजना आहे. हल्ली विवेकानंद सोसायटी मार्फत असे पथक तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अनुभव असा येतो की मनापासून अंगिकारिलेले हे काम करतानाही बरेचसे सेवक निराश झालेले आढळतात. कारण बिकट परिस्थितीतून वाट काढीत असलेल्या या कार्यकर्त्यांना योग्य मार्गदर्शनाची व प्रोत्साहनाची अत्यंत गरज असते. त्यांचा उत्साहभंग होणार नाही याकडे, कार्यात मुरलेल्यावडील मंडळींनी सतत लक्ष दिले पाहिजे.

(२) जेव्हा कार्यकर्ते एखादे काम निष्ठेने सुरू करतात, त्यावेळी त्यांची एक मनोभूमिका असते की आपण येथील लोकांवर उपकार करण्यासाठी आलो आहोत. त्या भूमिकेमुळे त्यांचे बरेचसे वागणे अहंकारपूर्ण होते. म्हणून जेथे काम करीत असतात तेथील लोकांचा त्यांना नीट सहकार मिळत नाही. सहकार न मिळाल्यानेही कार्यकर्ते निराश होतात व हाती घेतलेले काम सोडून देतात. कुठल्याही कार्याची फळे मिळवायला पुष्कळ वर्षाचे सततचे काम हवे असते, हे कार्यकर्त्यांना पटवून दिले पाहिजे. तसेच आपण जेथे काम करतो तेथे काही शिकण्यासाठी व काही शिकविण्यासाठी जात असतो, हे ही त्यांच्या लक्षात आणून द्यावयाला पाहिजे. कालांतराने अपेक्षेपेक्षाही जास्त स्थानिक सहकार्य मिळते असा अनुभव आहे.

(३) कार्यकर्त्यांच्या बाबतीत आणखीही एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते, ती ही की ज्या तऱ्हेने काम ते करू इच्छितात, त्या कामाविषयी तांत्रिक व व्यावहारिक संपूर्ण माहिती त्यांना हवी. उदाहरण द्यावयाचे झाले तर माझ्या डोळयासमोर एक मोठे थोरले माळरान आहे. ही जमीन मला काम करण्यासाठी मिळण्याचा संभव आहे. काम शुन्यातून उभे करावयाचे आहे. अशा वेळी चार पाच निष्ठावंत बंधुभगिनींनी एकजुटीने तेथे काम करावयाला हवे. कार्यकर्त्यांपैकी एखादा शेती तज्ञ असेल, एखादा शिक्षण तज्ञ असेल, एखाद्याला थोडी फार वैद्यकीय माहिती असेल, एखादा रंजन कलाकार असेल. पण सगळयांना मिळून एक गुण अवश्य हवा, तो म्हणजे काम करावयाचे त्या समाजाशी संपूर्ण मिसळून जाणे.

तेव्हा स्वयंसेवी संस्थांच्या पुढे सेवानिष्ठ कार्यकर्ते मिळविणे ही फार मोठी समस्या आहे.

दुसरी समस्या म्हणजे आर्थिक मदत. स्वयंसेवी संस्था काम करतात त्या अडीअडचणींच्या जागीच सुरू करतात. स्थानिक, आर्थिक पाठबळ त्यांना जवळ जवळ नसतेच. अशा वेळी शासकीय अनुदानाकडे त्यांचे लक्ष असते. शासनाजवळ कितीही सहानुभूती असली तरी काही नियम असतात, बंधनं असतात, त्या सर्वांना सांभाळून देता येईल तेवढीच आर्थिक मदत शासन देते. ती फारच तुटपुंजी असते. म्हणून संस्थांना फंडामागे धावावे लागते. महत्वाच्या व्यक्तींचा फंड गोळा करण्याच्या कामात खूप वेळ जातो. त्याचा परिणाम संस्थेच्या कामावर होतो. *(पान ५४ वर)*

# प्रिय अनुताईस.....

-- रमेश पानसे



ताई तुम्ही गेलात! गेले काही दिवस तुम्ही जायचं म्हणत होता; पण तरीही तुम्ही आणखी काही काळ आमच्यात आहात असेच मी मानून होतो. ३१ ऑगस्टला (१९७३) तुमच्या गुरू ताराबाई गेल्या. त्यामुळे या ऑगस्ट महिन्यात तशा तुम्ही अस्वस्थच होता. 'आपणही ऑगस्टमध्येच इहलोकीची यात्रा संपविणार' असंच कुठेतरी तुमच्या मनात फार पूर्वीपासून रूजलं होतं. पण तसं घडायचं नव्हतं. तुम्ही निदान ताराबाईंचा जन्मशताब्दी महोत्सव पूर्णपणे पाहून जाणार होता. असे किती दिवस राहिले होते १९ एप्रिलला ?

पण तुम्हाला धीर धरवला नाही.

ताई, मे महिन्यात मी आजारी पडलो ठाण्यात, आणि तिकडे तुम्ही अस्वस्थ झालात कोसबाडमध्ये. तुम्ही मला म्हणाला होतात. 'तू मला वचन दिलं आहेस, माझ्या अखेरपर्यंत माझ्याबरोबर राहायचं' मला ते मान्य होतं.

अगदी काल संध्याकाळपर्यंत मी तुमच्याजवळ होतो. आय्.आय्.टी.चे विद्यार्थी आले होते कोसबाडला. त्यांना घेऊन मी तुमच्याजवळ आलो. आपल्या थोड्याशाच पण छान गप्पा झाल्या. मी म्हटले, 'ही मुले ग्रामीण विकास कार्यात उतरणार आहेत. त्यासाठी तुमचा आशीर्वाद मागताहेत.'

तुम्ही थरथरत्या हाताने त्यांना नमस्कार केलात; नि म्हणालात; 'माझा नमस्कार हाच माझा त्यांना आशीर्वाद आहे.' बस, मी तुमचे ऐकलेले हे शेवटचे शब्द. नंतर तुम्ही प्रसन्न हासलात. बस, मी अनुभवलेले हे तुमचे शेवटचे प्रसन्न हास्य. आणि तुमची प्रकृती उत्तम आहे हे पाहून संध्याकाळी मी ठाण्याला परतलो. निघताना मी सिंधुताईंजवळ एवढेच म्हणालो, की मी आज आता ठाण्याला जातोय्. आता ताईंना मात्र परत सांगत नाही, मी जातोय् म्हणून. ताई, मी तुम्हाला निघताना सांगितलं नाही. तुमचा निरोप घेतला नाही, म्हणून का तुम्ही मला न सांगता, माझा निरोप न घेता अनंताच्या प्रवासाला निघून गेलात ?

ताई, मी तर दोन दिवसांनी परत येणार होतो. पण तुम्ही ? तुम्ही तर आता परत न येण्यासाठीच निघून गेलात ! ते कायमच्या.

अनुताई, तुम्ही उभं आयुष्य कष्टात घालवलंत. अगदी मृत्यूच्या क्षणापर्यंत कष्ट तुम्हाला चुकले नाहीत. आयुष्यभर तुम्ही सोसत आलात; शेवटी वर्षभर आजारपणही सोसतच होता. आयुष्यभर न थकता भ्रमंती केलीत; नि शेवटी शरीर थकून आंथरुणाला खिळल्यावरही तुमची मनाची भ्रमंती चालूच राहिली. क्षणात ते

वर्तमानकाळात यायचे आणि लीलूला विचारायचे, माझ्या पाठीच्या जखमेचे ड्रेसींग केले का? क्षणात ते भूतकाळात शिरायचे आणि ताराताईंची एखादी आठवण सांगायचे. पुन्हा वर्तमानात अकस्मात येऊन 'पोथी वाचून झाली का? म्हणून विचारायचे.

ताई, सारं जग तुम्हाला बालवाड्यांच्या कार्यातील प्रयोगांसाठी ओळखतं. ग्रामीण भागातल्या, आदिवासी भागातल्या बालवाड्या चालवतांना, अस्वच्छ असलेल्या मुलांच्या स्वच्छतेपासून बालवाडीतील रोजच्या शिक्षणाची सुरुवात व्हायची. मुलांना आंघोळी घालण्याचा नमुनेदार कार्यक्रम तुम्ही मोठ्या कल्पकतेने बाल शाळांतून सुरू केलात.

आता, तो प्रयोगावस्थेतील काळ संपला. आपल्या शाळांतील छोटी छोटी मुले स्वच्छ होऊन आंघोळ करून बालवाडीत येऊ लागली. पण ही स्वच्छता आणि आंघोळ मात्र तुमच्या मनात खोलवर रुजून राहिली होती; याचा प्रत्यय अलीकडे रोज येत होता.

तुमच्या अखेरच्या आजारपणातही रोज आंघोळ केल्याशिवाय तुम्ही राहिला नाही. नुसते ओल्या फडक्याने अंग पुसणे, स्पंजिंग करणे, तुम्ही एक दिवसही मान्य केले नाहीत.

रोज अंथरूणावरही यथासांग आंघोळ हवीच. एकदा आंघोळ झाली तरी पुन्हा दुपारी म्हणायचात; "माझी अजून आंघोळ व्हायची आहे. मला करायची आहे." मला वाटते, तुमचे वेळेचे भान नाहीसे झाले होते. सकाळ-संध्याकाळ यामधील फरक विरला होता.

ताई, गेल्याच आठवड्यातील गोष्ट. तुमचे बरे नसणे जरा अधिक तीव्र झाले आणि आम्ही डहाणूहून मोठ्या डॉक्टरांना आणले. मुंबईला डॉक्टर मनोहरांनाही निरोप दिला. तुमच्या खोलीच्या बाहेर आमची कुजबूज चालली होती. तशी तुमची श्रवणशक्ती चांगली तिखटच. हा आमचा नेहमीचा अनुभव तेव्हाही आला. तुम्हाला हॉस्पिटलला हलवण्याची कुजबूज तुमच्या कानांपर्यंत पोहोचली, आणि तुम्ही मला आत बोलावून या गोष्टीला साफ नकार दिलात. मागील वर्षी सुद्धा तुम्हाला आजारपणात मुंबईत हॉस्पिटलला ठेवले, तेव्हा, सतत घरी परतण्याचा धोशा लावला होतात.

अगदी कालही, मी म्हटले, "मुंबईला ही मुले जाताहेत कुणाला काही कळवायचे आहे का?"

तुम्ही लगेच म्हणालात, "डॉ. मनोहरांना सांगा मला दवाखान्यात हलवू नका."

अखेरीस तुमची इच्छा पूर्ण झाली. तुम्हाला तुमच्या कोसबाडच्या राहत्या घरातच मरण आले. गेली पस्तीस वर्षे ज्या घरात तुम्ही राहिलात; ज्या घरात तुम्हाला, पंधरा-सोळा वर्षे ताराबाई मोडकांचा, तुमच्या गुरूचा, सहवास लाभला. ज्या घरात राहून तुम्ही संस्थेचा व्याप सांभाळलात, ज्या घराने तुमचे कर्तृत्व पाहिले. तुम्हाला अनेक राज्य-राष्ट्र-लोक मानसन्मान मिळालेले पाहिले. त्या घरानेच तुमच्या अखेरच्या क्षणाला तुम्हाला मांडी दिली.

ताई, कोसबाडच्या या घराचे मोठेपण काही वेगळेच. देशातील बालशिक्षणाला वळण लावणाऱ्या, महत्त्व प्राप्त करून देणाऱ्या आणि पुढच्या पिढ्यांनी ऋणी राहावे असे बालशिक्षणाचे मंत्र देणाऱ्या, त्याचे व्यावहारिक तंत्र प्रयोगांतून विकसित करणाऱ्या दोन महान विदुषींच्या वास्तव्याने निर्माण झालेले पावित्र्य या घराने अनुभवले. ताराबाईंना हे घर कायमचे सोडून वीस वर्षे होत आली, पण तरीही, हे घर ताराबाईंचेच आहे असे सांगणारी पाटी आणि ताराबाईंच्या काही मोजक्या वस्तू सांभाळून ठेवणारे कपाट या दोन्ही गोष्टी, या घराने आपल्या भिंतींवर अभिमानाने राखून ठेवल्या आहेत. ताई, जेवढ्या तुमच्या मनात तेवढ्याच या घरात ताराबाई अजूनही वावरताहेत.

आता हे कोसबाडचे घर, ताराबाईंबरोबरच अनुताईंच्याही आठवणींच जपत जगणार. कारण हे घर आता पोरके झाले आहे. या घरातील अत्यंत साध्यासुध्या पण दीर्घकाळ जपलेल्या वस्तू पोरक्या झाल्या आहेत. या घरात सदैव मुक्तपणे वावरणारी मांजरी आणि कुत्री पोरकी झाली आहेत. या घरातली एकमेव आरामखुर्ची पोरकी झाली आहे; पत्त्यांचे जोड पोरके झाले आहेत. या घरातील वेडसर मुकी-बहिरी गंगा आता पोरकी झाली आहे. या घरात, सदैव आमच्या चपला बाहेर काढूनच आत प्रवेश करणारे आम्ही सारेच अनुताईंचे अनुयायी पोरके झालो आहोत. एकूण साठ वर्षे अखंड चालणारी शिक्षणपत्रिका पोरकी झाली आहे.

ताई, संस्थेच्या तुम्ही आधारवड होता. संस्थेच्या प्रवेशाशी दक्षिणेला आणि संस्थेच्या टोकाला उत्तरेला दोन डेरेदार वटवृक्ष संस्थेवर छाया धरून आहेत. त्या दोन्हींच्या मध्यभागी सदैव असणारा हा तुमचा आधारवड मात्र कोसळलेला आहे. त्याची छाया आता आम्हाला मिळणार नाही. त्याची छाया आता ताया-सुंदर-लिलू-गंगा यांना मिळणार नाही. त्याची छाया असंख्य, वेदना सोसणाऱ्या पीडितांना मिळणार नाही आणि आजुबाजूच्या पाड्यांवरील असंख्य गरीब आदिवासी बालकांना मिळणार नाही.


ताई, तुमच्याबरोबरच बालशिक्षणातील प्रयोगांचे एक युग संपले आहे. बालवाडी, अंगणवाडी, कुरणशाळा, विकासवाडी, बालशिक्षणातील या नित्यनूतन संकल्पना मात्र या भारतभूमीवर तुमची आठवण सांगत सदैव टिकून राहतील.

ताई, या देशात जन्माला येताना तुम्ही काय घेऊन आला होता ते माहीत नाही. असलेच तर, वैयक्तिक आयुष्यात सामान्य माणसाचे जीवनही प्राप्त होऊ नये असे दुर्भाग्य घेऊन तुम्ही जन्माला आला होता; पण जाताना मात्र तुम्ही आम्हा पुढल्या पिढ्यांसाठी केवढी मोठी शिदोरी ठेवून चालला आहात!

बालशिक्षणाचेच बाळकडू प्यालेली ग्रामबाल शिक्षाकेंद्र ही संस्था तुम्ही आमच्यासाठी उभारून चालला आहात; ग्राममंगलसारखी विकाससंस्था निर्माण करून, नावा-रूपाला आणून तुम्ही चालला आहात; मूक-बधीर विद्यालयाची पालक 'ठाणे जिल्हा स्त्री-शक्ती जागृती' ही संस्था तुम्ही, पुढीलांसाठी ठेऊन चालला आहात. तुम्ही 'सावित्री' आणि 'शिक्षणपत्रिका' आमच्या हाती देऊन चालला आहात.

याचबरोबर कष्टांचे ब्रीद तुम्ही आम्हाला देऊन गेला आहात, कार्यनिष्ठा आम्हाला पटवून तुम्ही अनंतात विलीन झाला आहात. मनुष्य-प्राणी-निसर्ग साऱ्यांवर सातत्याने प्रेम करण्याचा आदर्श ठेवून तुम्ही परमेश्वरात विलीन झाला आहात.


ताई, तुमच्या सहवासात आयुष्याची काही वर्षे घालवायला मिळाली हेच आमचे चिरंतन भाग्य!



# आमची अनुताई

**-- सौ. लीला दंडवते**





अनुताईंचे वडील कै. बाळकृष्ण धुंडिराज वाघ आणि आई कै. यमुनाबाई बाळकृष्ण वाघ

समर्थ रामदास स्वामींनी एके ठिकाणी म्हटले आहे "देह त्यागिता कीर्ती मागे उरावी" यात कीर्ती म्हणजे सुकिर्ती हाच समर्थांच्या मनात आशय असावा.

प्रत्येक माणूस हा केव्हातरी मरणारच, पण त्याने जर जीवनात एखादा विज्ञानातील शोध, देशाकरिता त्याग, समाजसेवा, पीडित दलित यांच्या विकासाकरिता शर्थीचे प्रयत्न असे एखादे अलौकिक काम केले असेल तर तो केवळ देहाने मृत्यू पावतो व जनतेच्या, देशाच्या भविष्यकालीन लोकांच्या मनात चिरंजीवच होतो. अशा तऱ्हेने चिरंजीव झालेल्या ज्या काही व्यक्ती आपल्याला दिसतात त्यात माझ्या भगिनीचा म्हणजे कै. श्रीमती अनुताई वाघ यांचा अंतर्भाव करणे योग्य होईल असे मला वाटते. तिने आपले जवळ जवळ सर्व आयुष्यच आदिवासी बालके, स्त्रिया व बंधु यांचे शिक्षण व सामाजिक विकासाकरिता वाहिले.

खरं तर एका सामान्य कारकुनाची श्री. बाळकृष्ण धुंडिराज वाघ यांची अनुताई ही प्रथम कन्या, जन्म १७ मार्च १९१०. पाठच्या तीन बहिणी अन एक भाऊ. कसाबसा कुटुंबाचा गाडा वडील ओढत होते. त्याकाळी मुलींच्या शिक्षणाकडे कोणी लक्ष देत नव्हते. तशात नोकरी निमित्त वडील वेगवेगळया गावी हिंडत, त्यामुळे अनुताईंच्या शिक्षणाची आबाळच. कधी भुसावळ तर कधी मोरगाव, तर कधी इगतपुरी. पण इगतपुरी (जि. नाशिक) येथे असता थोडी शाळेची व्यवस्था झाली पण ताईंना १३ वे वर्ष लागले त्या काळी एवढी मोठी मुलगी लग्ना शिवाय ठेवणार कशी? त्यादृष्टीने "स्थळ" शोधण्यास सुरुवात झाली व १३ व्या वर्षी अनुताईंचे लग्न झाले. पण सहा महिन्यातच तिच्या यजमानांचे अपघाती निधन झाले, व संसार योग संपला.

त्यावेळच्या प्रथेप्रमाणे विधवा म्हणजे

पोळपाट लाटणे हातात घेणे व काबाडकष्ट करणे याशिवाय दुसरा मार्ग दिसतच नव्हता. शिक्षणाला पूर्ण विराम मिळण्याचा प्रसंग आला पण परमेश्वराच्या मनात ताईंच्या हातून समाज सेवा घडवावयाची होती. त्यांनी देवदूता प्रमाणे सौ. दुर्गाताई नेने (खरे) यांना पाठविले. या आमच्या आईच्या मैत्रिण, त्या काळातही त्या इंटर पर्यंत शिकल्या होत्या. शिक्षणाचे महत्व त्यांना कळले होते. ताईचे आयुष्य नुसत्या काबाडकष्टात जाऊ नये असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांनी आमच्या आईला ताईचे शिक्षण चालू ठेवण्याचा सल्ला दिला. इतकेच नव्हे तर त्या ताईला आपल्या बरोबर अकोला येथे घेऊन गेल्या. तेथे त्या एका राष्ट्रीय शाळेत शिकवित असत. या त्यांच्या कृतीने ताईचे जीवनच बदलले.

ताईचे नुसते शिक्षण चालूच राहिले, इतकेच नव्हे, तर त्यांनी ताईवर फार चांगले संस्कार केले. त्या रोज तिला कुठल्या तरी विषयावर लिहावयास सांगत. त्यामुळे तिला लेखनाची गोडी लागली, ती उत्तम लिहू लागली, इतकेच नव्हे तर ट्रेनिंग कॉलेजमध्ये तिच्या निबंधांची पुढे वाहवा होऊ लागली, ही सवय शेवटपर्यंत कायम होती. ती रोज पहाटे ४ नंतर लिखाण करीत असे. दुसरे म्हणजे त्या तिला रोज एका विषयावर बोलावयास लावीत. याचाही उपयोग सभांतून भाषणे करतांना तिला पुढे छान झाला. नंतर काही दिवसांनी आईने तिला (ताईला) परत इगतपुरीला आणले व फायनल परीक्षेचा अभ्यास तिने कसाबसा केला व ना.जि.लो.बोर्ड तर्फे होणाऱ्या फायनल परीक्षेला ताई बसली.

पती निधन - सलग शिक्षणाचा अभाव - घरातील शोकाचे वातावरण या सर्वांमुळे ताई पास होणे कठीण होते हे सर्वजण धरूनच चालले होते.

परीक्षेचा रिझल्ट पहाण्याची कोणी तसदी घेतली नाही. नंतर काही दिवसांनी वडील नाशिकला गेल्यावर ताईच्या रिझल्टची चौकशी करण्यासाठी जि.लो.बो. ऑफीसमध्ये गेले. त्यांनी नाव सांगितल्यावर सर्व जण अभिनंदन करावयास लागले. आबांना (वडिलांना) कळेना कशा करिता ते अभिनंदन करीत आहेत नंतर त्यांनी विचारल्यावर त्यांना कळले की, अनुताई परीक्षेत "पहिली" आली होती. त्यांचा आनंद गगनात मावेना.



परकरी अनुताई : वय वर्षे ५

नंतर ताई पुण्याच्या सरकारी महिला ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणासाठी पुण्यास गेली.

इथली तीन वर्षे म्हणजे ताईंच्या गुणांचा विकास करणारा काळ होता. तिन्ही वर्षे ती परिक्षेत तर पहिली आलीच पण सांस्कृतिक कार्यक्रमात ती भाग घेत असे, कविता करीत असे, निबंध तर उत्तम लिहीतच असे. शिक्षणा नंतर तिने काही वर्षे नाशिक जिल्ह्यात चांदवड, पिंपळगाव (वसवंत) येथे नोकरी केली आणि संधी मिळताच ती पुण्याला हुजूरपागेत नोकरीसाठी आली.

या शाळेत तिने १३ वर्षे नोकरी केली व चांगली शिक्षिका म्हणून नांवही मिळविले.

आपल्याला इंग्रजी येत नाही याची तिला खंत वाटत असे. पण ती अडून राहिली नाही.

सरस्वती मंदिर संस्थेच्या रात्र शाळेत तिने नाव घातले, येथे येणारे विद्यार्थी आपले व्यवसाय सांभाळून थकून भागून शिक्षण घेणारे असतात त्यांना अभ्यासाला जास्त वेळ मिळणे कठीण असते, त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात मॅट्रिक परीक्षा पास होणे कठीणच होते. पण अनुताईने यातही आपले कर्तृत्व दाखवले १९३८ साली चांगल्या मार्कांनी पहिल्याच प्रयत्नात ती मॅट्रीक परीक्षा पास झाली.

या सगळ्या शैक्षणिक प्रगति बरोबर ती घराला विसरली नव्हती. तिने आपली जबाबदारी झटकून टाकली नाही. ती मोठी मिळवती मुलगी होती. वडील थकले होते, दोन मधल्या बहिणींची लग्ने झाली होती पण धाकटी बहीण व भाऊ दोघेही मॅट्रिक होऊन पुढील शिक्षणाची वाट पहात होते. ताईने त्यांना पुण्याला आणले व त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली. वडिलांची आत्यंतिक इच्छा होती की त्यांच्या मुलाने इंजिनियर व्हावे, मुलगी पदवीधर व्हावी, ताईने दोन्ही आव्हाने स्वीकारली. वास्तविक तिला तेव्हा पगार तुटपुंजा होता पण त्यातही ती तिघांचे भागवित होती.

आणि १९४२ साल आले. स्वातंत्र्याच्या विचाराने सर्व भारतच भारला होता. आमचे कुटुंबीय तर मुळातच स्वातंत्र्यप्रिय, सर्वांचीच या संग्रामात भाग घेण्याची इच्छा होती. ताईलाही सत्याग्रहात भाग घेण्याची फार इच्छा होती. पण भाऊ इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला होता. ताईचे तुरूंगात जाणे म्हणजे त्याच्या शिक्षणाची इतिश्री झाली असती अन् आबा मधूच्या (भावाच्या) परीक्षेकडे डोळे लावून बसले होते, त्यांची निराशा करणे, होते म्हणून सर्वांच्या पाठिंब्याने बहीण लीला हिने संग्रामात उडी घेतली. सर्वांचा परिणाम तिला तुरुंगवास शिक्षा होण्यात झाला. हे ताईला फार लागले. त्यामुळे तिने निश्चय केला की भाऊ बहिणीची जबाबदारी संपली की देशसेवेत झोकून द्यायचे ते तिने अक्षरश: खरे केले.

सुटून आल्यानंतर लीलाचे (बहिणीचे) लग्न झाले. भाऊ इंजिनियर होऊन नोकरीस लागला अन् अनुताईंनी कशाचाही विचार न करता खेड्यात जाऊन लोकसेवा करण्यासाठी आपल्या हुजूर पागेतील नोकरीचा राजीनामा दिला. अर्थात नातेवाईक ओळखीच्या लोकांनी तिला 'असा नोकरी सोडण्याचा वेडेपणा करू नकोस' म्हणून परोपरीने सांगितले. पण तिचा निश्चय ठाम होता. कस्तुरबा ट्रस्टतर्फे झालेल्या कांदिवलीच्या शिबिरात तिने भाग घेतला, तिथे तीची गाठ श्रीमती ताराबाई मोडक यांच्याशी पडली. मं. गांधीनी त्यांना (ताराबाईंना) खेड्यात बाल शिक्षणाचे कार्य करण्यासंबंधी सुचवले होते. त्यांना खेड्यात काम करण्यासाठी सहकारी पाहिजे होते, त्यांना शिबिरार्थींना खेड्यात कोण यावयास तयार आहे? असे विचारले. अनुताईंना तेच हवे होते. त्या ताबडतोब तयार झाल्या व श्रीमती ताराबाईंच्या बरोबर बोर्डी येथे गेल्या. त्यावेळी पूर्व प्राथमिक शिक्षण ही कल्पना शहरातही नवी होती. ती खेड्यात लोकांना पटवून देणे अवघड होते. त्यात भेदाभेद न मानता सर्वांना सारख्या पातळीवर शिकविणे आणखीच अवघड होते. अनुताईंनी त्याकरिता अनेक तऱ्हेचे प्रयत्न केले. झांजा वाजवित गावातून हिंडून मुले गोळा केली. नंतर तेथे थोडे व्यवस्थित स्वरूप आल्यावर ताराबाई व ती कोसबाड येथे आणखी दुर्गम भागात आदिवासी वस्तीत काम करण्यासाठी गेल्या. त्या पहिल्या काही वर्षात लोकांचा विश्वास संपादून त्यांनी, मुलांना शिकविण्यास तयार करतांना, अथक कष्ट घेतले, त्यांच्या अंगणात अनुताई 'शिकवणी' हे नाव न घेता शिकवित असत. गुरांच्या मागे मुलांबरोबर जाऊन खेळ खेळतांना शिकवित असत. अशा या "अंगणवाड्या व कुरणशाळा"

तयार झाल्या, हळूहळू लोकांचा विश्वास बसला. मग छोटी मुले शाळेत येऊ लागली, पण मोठी येईनात म्हणून शाळेला कार्यानुभव जोडून घेतला.

या सगळ्या प्रयत्नात ताराबाई व अनुताई एकमेकींच्या सल्ल्याने काम करीत असत. याचवेळी हे पूर्व प्राथमिक शिक्षण आहे तेव्हां त्याचा पद्धतशीर शिक्षणक्रम माहिती असणे आवश्यक आहे, याची जाणीव झाली म्हणून अनुताईंनी मॉंटेसरी अभ्यासक्रम दादर शिशू विहारात अर्थातच उत्तम तऱ्हेने पुरा केला.

या ग्रामीण भागात शिक्षणाकरिता येणारे प्रश्न हे शहरांपेक्षा वेगळे असतात म्हणून अशा तऱ्हेचे शिक्षण असणारे शिक्षक तयार करण्यासाठी शिक्षक वर्ग कोसबाडला सुरू झाले. प्रा. शाळा, बालवाडी चालू होतीच, आता याच्या व्यवस्थापनात भाग घ्यायचा म्हणजे आपल्याला पदवी पाहिजे अशी रूखरूख अनुताईंना लागली म्हणून एस.एन.डी.टी. च्या पदवी परीक्षेला बसण्याचे अनुताईंनी ठरविले. पण देव त्यांचे सत्वच दरवेळी पहात असावा. या परीक्षेच्या आधी काही महिने त्यांच्या दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू आले. काही वाचावयास दिसेना. आता परीक्षा जाणार म्हणून त्या खट्टू झाल्या. पण ताराबाई, श्री. आप्पा कोसके वगैरे मंडळींनी जोर धरला. त्यांनी आळीपाळीने वाचून दाखविले. प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी डोळ्यात औषध घालून त्या जात. अनुताईला काय लिहिले ते त्यांचे त्यांनाही वाचता येत नसे. तेव्हा बहुतेक अनुताई नापास होणार असे सर्व धरून चालले होते. पण येथेही अनुताईंनी आपल्या मोतीबिंदूवर मात केली. त्या सेंकडक्लासमध्ये पास झाल्या. या वाटचालीत त्यांना ताराबाईंची साथ होती. या काळात अनेक शैक्षणिक प्रश्न निर्माण झाले पण या दोघी डगमगल्या नाहीत. तर त्यांनी नवीन नवीन प्रयोग ग्रामीण शिक्षण भागात केले. मोठी मुले शाळेत कमी येत. कारण त्यांना भावंडे सांभाळावी लागत. त्याकरिता प्रा. शाळा, बालवाडी व पाळणाघर म्हणजे विकासवाडी असा नवा प्रयोग या दोघींनी शोधला व त्याला सरकारी मान्यताही मिळाली.

ग्रामीण भागातील शैक्षणिक साधनेही वेगळी हवीत हे ओळखून झाडे, पाने, बिया यांची शैक्षणिक साधने अनुताईंनी बनविली.

या काळापर्यंत ताराबाईंचा सल्ला अनुताईंना मिळत असे. पण दुर्दैवाने ताराबाईंचे निधन झाले व अनुताई एकाकी पडल्या, पण त्या डगमगल्या नाहीत त्यांनी दुप्पट जोराने काम करायला सुरुवात केली.

कोसबाडला शिक्षक कॉलेज, प्रा. शाळा, छापखाना, उद्योगवर्ग निरनिराळे कोर्सेस (अंगणवाडी, बालसेविका) वगैरे आज दिसतात याच्यामागे अनुताईंचे अथक प्रयत्न आहेत.

या सगळ्यांची सर्वांना माहिती व्हावी, नवीन नवीन माहिती मिळावी म्हणून अनुताईंनी अनेक पुस्तके लिहिली. त्यातील "बालवाडी" कशी चालवावी, याची तर इतर भाषात भाषांतरे होऊन त्याला अद्यापही खूप मागणी आहे.

दोन मासिकांचे, "शिक्षण पत्रिका" व "सावित्री" यांचे संपादन त्यांनी अखेरपर्यंत केले. नुसते मुलांचे शिक्षण एवढेच ध्येय त्यांच्या पुढे नव्हते. दारूबंदी, बाल विवाह बंदी वगैरे अनेक सामाजिक प्रश्नांबद्दल जवळच्या पाड्यांवर जाऊन तेथील लोकांचे प्रबोधन करणे हेही काम येथील कार्यकर्ते विद्यार्थी व अनुताई हे करीतच असत.

फक्त कोसबाडच्या आदिवासी भागात काम करणे एवढेच काम अनुताईंना मान्य नव्हते. कांही मुकी मुले केविलवाणी हिंडतांना पाहिल्यावर त्यांचे हृदय गलबलले व कांही सहकारी व उदार नागरिकांच्या मदतीने अनुताईंनी डहाणू येथे एक मूक बधिर विद्यालय

सुरू केले. तेथे सध्या ७०-७२ मुले-मुली शिक्षण घेत आहेत. नुसते शिक्षण नव्हे, तर गरीब, आदिवासी मुलांची तेथे मोफत राहण्याची व जेवण्याचीही सोय केली जाते. त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे म्हणून छोट्या उद्योगधंद्याचे शिक्षणही दिले जाते. आता तर "मतिमंद" मुलांसाठीही एक छोटा विभाग सुरू केला आहे. हे काम करण्यासाठी अनुताईंनी एक स्त्रीशक्ती जागृत मंडळही बनविले आहे. त्यांच्याकडे याची सर्वव्यवस्था सोपविली आहे. म्हणजे शिक्षित कर्तबगार बायकांना समाज सेवेत ओढून घेण्याचे कामही केले आहे.

या काळापर्यंत राज्य व केंद्र सरकारने अनुताईंच्या कामाची दखल घेतली होती. पद्मश्री सारखा सरकारी सन्मान मिळालाच, पण फाय फौंडेशन, बजाज पारितोषिक, सावित्री पारितोषिक वगैरे अनेक पारितोषिके तिला मिळाली, अनेक ठिकाणी तिचे "सन्मान झाले व थैल्या" मिळाल्या. पण अनासक्त अनुताईंनी तो देवाचा पैसा असे समजून सर्व संस्थांना देऊन टाकला.

या कालापर्यंत तिचे वय ७०रीच्या वर होते. आता कोसबाडच्या संस्थांचा दैनंदिन कारभार सहकारी व्यवस्थित चालू ठेवत होते. तिचे लिखाण सुरूच होते. पण विश्रांतीचे नांव नाही. याच काळात तिने आणखी एक दुर्गम आदिवासी भागात विकास कार्य सुरू करण्याची जबाबदारी घेतली अन् ती म्हणजे "ग्राममंगल" कातकरी वगैरे सुधारलेल्या जगांपासून दूर पर्वताच्या कुशीत राहत होते, ज्यांच्या मुलांना शिक्षणाचा लाभ घ्यायला फार कष्ट पडत होते म्हणून दुर्लक्षिले जात होते, त्याच भागात जाऊन शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाचे कार्य तरुणाच्या उमेदीने अनुताईने अंगावर घेतले. सहकार्यांच्या मदतीने तेथे शिक्षण आरोग्य वगैरे सुविधा सुरू केल्या. या ठिकाणी तर तिने 'सहज शिक्षण' हा शिक्षण क्षेत्रातील एक नवाच प्रयोग केला. उपलब्ध असलेल्या वस्तूंवरून मुलांना सर्व विषय शिकवावयाचे. त्या करिता तिने काही धडेही लिहून तयार केले. त्याची वाखाणणी त्या वेळचे शिक्षण संचालक श्री. व्ही. व्ही. चिपळूणकर यांनीही केली. हे सगळे करीत असता प्रत्यक्ष तिचे घर म्हणजे आदिवासी मुले, मुली, तशीच काहीतरी आपत्तीत सापडून मदतीसाठी आलेल्या मुले, मुली, बायका, पुरुष आश्रय स्थानच होते. प्रत्येकाला ते घर आपले वाटत असे. इथून कोणालाही विन्मुख जावे लागत नसे.

अर्थातच ही सगळी कामे करावयाची म्हणजे अंगी तशीच मोठेपणाची तपस्विनीची वृत्ती पाहिजे. अनुताई तशीच तपस्विनी होती. सगळे करूनही ती हे "मी" केले असे म्हणत नसे. तिची "गणेशावर" भक्ती होती. पण ही भक्ती कोणात भेदाभेद करावयास लावत नसे. तिचा "गणपती" सर्वांचा होता हे सर्व काम देवाने माझ्याकडून करवून घेतले असेच ती म्हणत असे.

ती पुणे सोडून बोर्डी व नंतर कोसबाडला गेली. आयुष्यातील ४५ वर्षे तिने त्याच भागातील लोकांशी एकरुप होऊन त्यांच्या विकासासाठी वेचली. तेच तिचे घर होते. ती पुण्याला आली तरी तिला वेध "कोसबाडचे" लागत. शेवटीही तिने निक्षून सांगितले होते की, मला मरण कोसबाडलाच पाहिजे. मला पुण्याला नेऊ नका.

अनुताईंनी आपल्या आयुष्यात कुटुंब, माता-पिता, भाऊ-बहिणी यांचे ऋण फेडलेच पण आपले सर्वस्व देऊन समाज ऋण फेडण्याचा प्रयत्न केला. कदाचित् ही परमेश्वराचीच इच्छा असावी. तिने आदिवासी भागात काम करावे म्हणूनच त्याने तिला संसार बंधातून मुक्त केले.


रामदासांच्या उक्तीप्रमाणे अनुताई खरोखरच आपल्या "कीर्ती" रूपाने कायम जिवंतच राहिल्या. व पुढेही राहतील तिच्या स्मृतीला माझे शतश: प्रणाम !



02685 6

# आदिवासिनी अनुताई

-- शांता आठवले



ताईच्या आदिवासी मुली : ताया आणि सुंदर

१९४५ साली कै. पूजनीय ताराबाई मोडक यांच्या आवाहनाला साद देऊन अनुताई ज्या बोर्डीला गेल्या त्या तेथेच रमल्या. अगदी मरेपर्यंत. त्यांनी परत मागे वळून सुद्धा पाहिले नाही. गुरूभक्तीचा एक आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्यावर त्या परत संसारात अडकल्या नाहीत. संस्थेचा संसार आयुष्यभर केला. जवळ जवळ ४७ वर्षे झाली त्या पूर्णपणे आश्रमीय जीवन जगत होत्या. अर्थात त्या आपल्या नातलगाना विसरल्या नव्हत्या. पण त्यांचे जगच विस्तारले होते. त्यांच्या संस्थेतील प्रत्येक माणूस त्यांना नातेवाईकांइतकेच प्रसंगी अधिक जवळचे वाटत होते. प्रत्येकाला समजून घेऊन सांभाळून घेत होत्या. त्यांचं कोसबाडचं घर म्हणजे 'आव जाव घर तुम्हारा' अशी परिस्थिती होती. कोणालाही तेथे मज्जाव नव्हता. आदिवासी असो - ड्रायव्हर असो - कामाची मुलगी असो की वसतीगृहातली – सर्वांनाच तेथे पूर्ण मोकळीक होती. अगदी कुत्री मांजरी सुद्धा सुखेनैव त्यांच्या घरात बागडत असत. आमच्या सारख्या सामान्य माणसाला कधी स्वच्छतेच्या कधी आपलेपणाच्या दृष्टीकोनातून ते रुचत नसे. पण संत प्रवृतीच्या अनुताई त्यांच्यावर कधी नाराज नसत.

अतिशय साध्या राहणीचा त्यांच्या जीवनावर कायमचा ठसा होता. छानछोकी ना कपड्यात जपली ना खाण्यात दिसली. त्यांचे बोलणे त्यांचे लिहिणे सुद्धा तसेच साधे-सोपे-आणि सरळ असे. मात्र त्यात आशय भरलेला असे. आयुष्यभर एकच ध्येय. संस्थेचे हित. त्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी. त्या ताराताईंबरोबर आल्या तेव्हा कसलीच कल्पना त्यांना नव्हती. पण बोर्डीला आणि पुढे कोसबाडला येऊन राहिल्यावर हळुहळु अनुभवातून पुढे असलेल्या कठीण कामाची त्यांना कल्पना येऊ लागली. पण त्या डगमगल्या नाहीत. जसे प्रश्न उभे राहिले तशी त्यांची उत्तरे त्या शोधून काढू लागल्या.

त्यातूनच आदिवासींच्या अनेक समस्यांची उकल झाली. कै. ताराताईनी दृष्टी दिली आणि त्याबर हुकूम, त्या आपल्या मनाचा कौल घेऊन प्रश्न सोडवू लागल्या.

विकासवाडीचा प्रकल्प ही ताराताईंची कल्पना आहे पण ती प्रत्यक्षात उतरवली अनुताईनी. आदिवासी मुले शाळेत येत नाहीत म्हटल्यावर मुळापर्यंत जाऊन त्याची कारणे शोधून काढली व त्याप्रमाणे शिक्षणाचा ढाचा बदलला. आदिवासी मुलांना काम करावे लागते हे लक्षात घेऊन त्या मुलांना शिकता येईल अशा कुरण शाळा निघाल्या.

मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी पाळणाघरे काढली आणि शिकलेल्या मुलांच्या शिक्षणावर गंज चढू नये म्हणून छापखाना काढला. खरेतर छापखाना, खेळणी तयार करणे, किंवा कॅपसुल्स निवडणे, शेती करणे ही काही रूढार्थीने शैक्षणिक कामे नव्हेत. पण त्यातून आदिवासी मुलांना रोजगार मिळतो हे लक्षात घेऊन त्यांच्या पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी या उपक्रमांची व्यवस्था केली. ही सर्व अनुताईंची त्या आदिवासी माणसांचे प्रश्न समजून घेण्याची व त्यावर उपाय योजना करण्याची किमया आहे. फक्त शिक्षण एवढेच ध्येय न ठेवता आदिवासी मुलांना शिक्षण घेण्यामध्ये जे जे अडसर आहेत ते दूर करणे असे काम त्या करीत होत्या.

शिक्षण हे द्यायचे नसून घ्यायचे असते हे सूत्र मनाशी ठेवून अनुताई निरनिराळे प्रयोग करीत राहिल्या. स्वत: तर अनुभव घेतच होत्या. पण नुसते शिक्षण देण्याच्या शाळा उघडून उपयोग नाही ते शिक्षण आदिवासींच्या जीवनात कसे उतरेल याचा विचार सतत चालू असे. त्यामुळे शैक्षणिक साधने पण सभोवतालच्या परिसरातूनच त्यांनी उपलब्ध केली. बाल शिक्षणाकडे विशेष ओढा असल्यामुळे ताईंना विचारून त्यांनी प्रथम सर्व शिकून घेतले. त्याचा अभ्यास केला - अनुभव घेऊन पडताळून पाहिले आणि मगच त्या ठामपणे ते साधन-सूत्र किंवा तत्व इतराना दाखवत राहिल्या देत राहिल्या. त्यामुळे त्यांच्या शब्दांना वजन आले. अनुताईनी बरोबर आहे असे सांगितले म्हणजे ते डोळे मिटून स्वीकारायचे अशीच आमची भावना होती. कारण त्यांचा विचार हा नुसता विचार कधीच नसायचा त्याला अनुभवाची आणि कृतीची जोड असायची.

आदिवासी मुलांची शक्ती त्यांनी बरोबर जोखली होती. ती मुले अस्वच्छ होती, अज्ञानी होती परंतु ती बुद्धीने कमी मुळीच नव्हती. त्यांना योग्य संधी उपलब्ध झाली तर ती सामान्य मुलांइतकीच हुशार होतील. शहरीमुले व आदिवासी मुले यांच्यात तुलना करताना एक गोष्ट निश्चित जाणवते. शहरी मुलांना टेलिफोन-दूरदर्शन टेपरेकॉर्डर, आगगाडी, विमान हे सर्व माहीत असते पण ती अतिशय भित्री असतात. त्यांना झाडावर चढता येत नाही, रानाची भिती वाटते, साप, पशु, पक्षी यांची माहिती नसते. पण आदिवासी मुले ही रानपाखरेच असल्यामुळे त्यांना भिती नसते. त्यांना पोहायला, झाडावर चढायला येतच असते. त्यांनी केलेल्या संग्रहावरून त्यांना पशुपक्षांची चांगली माहिती असते व झाडांचीसुद्धा बारीक माहिती असते आणि अनुताईना त्याचा अभिमान असे. त्याना शहरी न करता फक्त शिक्षणाचा अनुभव द्यायला हवा असाच त्यांचा आग्रह होता ती निसर्गाची लेकरे आहेत. त्यांच्या या गुणांचा या संपत्तीचा उपयोग करूनच त्याना जरूर ते शिक्षण द्यायचे आहे असेच त्या मानीत. त्यामुळे प्राथमिक शाळेतील मुलांसाठी त्यांनी 'सहज शिक्षणाचे धडे लिहिले. अगदी साधे-सोपे त्यांच्या परिचयातील शब्दांचे. त्यांचा १ला धडा आहे दगड, म्हणजेच ज्या वस्तूंचा त्यांच्या जीवनात रोज संबंध येतो त्याच वस्तूंचा उपयोग

शिक्षणासाठी झाला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे.

अनुताईंच्या लक्षात त्यांचे अज्ञान व अस्वच्छता आलीच होती. स्वच्छतेमुळे आरोग्य चांगले राहते म्हणून खरूज, उवा अशा रोगांचा मुकाबला करण्यासाठी त्यांनी स्वत:च कष्ट घेतले. रोज अंघोळ करणे कसे आवश्यक आहे त्याचे प्रात्यक्षिक बालवाडीत होत असे. त्यामुळे त्यांच्या बालवाडीची सुरुवात स्वच्छतेपासूनच होते. शहरात राहून याची कल्पनाच येणार नाही. त्यांचा स्वच्छतेसाठी केलेला एक प्रयोग पूर्णपणे लक्षात आहे. लहान मुलांना शेंबूड सारखा यायचाच. हातरूमालाचा वापर आदिवासी मुलांना माहीतच नव्हता. कारण हातरूमाल आणायचा असतो हेच माहीत नव्हते. एक दिवस घरातल्या जुन्या कपड्याच्या लहान लहान चिंध्या केल्या. बालवाडीत दोन करवंट्या ठेवल्या होत्या. एकात त्या चिंध्या ठेवून दिल्या. नाक आले की मुलाला जवळ बोलवायचं त्यातली एक चिंधी उचलून नाक पुसायचे व दुसऱ्या करवंटीत ती चिंधी टाकायची. घरी जाताना बालवाडी ताईने त्या चिंध्या जाळून टाकायच्या. किती सोपे आणि स्वस्त स्वच्छतेचे साधन. या साधनाला ना पैसा ना कष्ट फक्त योजक हवा, तळमळ हवी, आच हवी, अनुताईना ती होती. सतत आदिवासांचाच विचार, त्यामुळे हे सहज उपक्रम त्यांना सूचत व ते अंमलातही येत. अनुताईंची सर्वच साधने-उपक्रम-व्यवसाय अशा सभोवतालच्या परिस्थितीतूनच जन्माला आलेली असतात. विटा पाडणे त्याच विटांचा ओटा बांधणे, शंखांच्या माळा करणे, त्या तयार ओट्यावर रंग काम करणे असे व्यवसाय बिनखर्चाचे पण मुलांचा विकास साधणारेच असतात.

आदिवासी माणसांची गरज लक्षात घेऊन त्यांनी अशा जोडप्यांची सामुदायिक लग्ने लावली, आणि त्या जोडप्यांसाठी आवश्यक असलेली बाशिंगे अनुताईनी ट्रेनिंगच्या मुलींकडून हस्तव्यवसायाचा भाग म्हणून करून घेतली. अशा तऱ्हेने मुलींचा हस्तव्यवसाय झाला व गरज भागली. प्रत्येकवेळी ही त्यांची योजकताच मनाला भुरळ घालीत असे. बालशिक्षणातील अमूक तत्वे, अमूक व्यवसाय आदिवासी मुलांच्यापर्यंत पोचत नाहीत असे कधीच होत नसे. त्यामुळे त्यांच्या नव्या नव्या कल्पना मूर्त स्वरूपात साकार होत. अशा किती साधनांचे वर्णन करावे. एकच गोष्ट त्यात प्रामुख्याने लक्षात येई की साधन हे अनुभवासाठी आहे. तो अनुभव मुलांना कसा देता येईल एवढाच विचार त्या करीत. त्यामुळे तांत्रिकतेत अडकून पडलेले बालशिक्षण मोकळे झाले आणि केवळ श्रीमंत मुलांची ही मिरासदारी आहे, हा बालशिक्षणावरील आक्षेप आपोआपच दूर झाला. कुठलेही तत्व वाईट नसते ते आदिवासी मुलांपर्यंत पोचवायचे कसे याचा विचार फक्त अनुताईच करू जाणे. कारण त्या त्यांच्यात मुरल्या होत्या. एकरूप झाल्या होत्या.

आदिवासी लोक आपल्या मुलांची बारशी करीत नाहीत असे त्यांच्या लक्षात आल्याबरोबर पाळणाघरात सामुदायिक बारशी करायला त्यांनी सुरवात केली. वाराप्रमाणे सोम्या-मंगली अशी नावे जाऊन मुलांना छान नावे मिळाली. हा समारंभही अगदी बिन खर्चाचा व साधा असे. पानानी झोळया सजवत.

कुणी देणगीदार गाठून बाळाना अंगडे टोपडे शिवून घेत. पालकांना बोलावत आणि बारशाचा कार्यक्रम होई. शक्य तेथे पालकांचा सहभाग त्या मिळवित असत त्यामुळे पालकांना एक प्रकारचा विश्वास वाटे व नकळत - त्यांचेही उद्‌बोधन होई. असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले सर्ववेळी पालकांचा सहभाग

(पान ५० वर)

# ताई आणि अनुताई!

— नीला कृष्ण जोशी



गुरू आणि शिष्या : ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ, सरलाताई देवधर

अनुताई! कोसबाडच्या टेकडीवर निसर्गाच्या सान्निध्यात अज्ञानी, निरक्षर, लेकरांसाठी वाहिलेले एक समर्पित जीवन!

लेकराचे हीत । वाहे माऊलीचे चित्त
ऐसी कळवळ्याची जाती
करी लाभावीण प्रिती ।

वरील उक्तीचा प्रत्यय त्यांच्या जीवनात येतो. म्हणूनच माऊली हे नाव त्यांनी सार्थ केले...

गुरू शिष्यांच्या अनेक जोड्या आपण ऐकत आलो आहोत. त्यामध्ये कै. ताराबाई व अनुताई ही बालशिक्षणाकरित पायाभूत काम करणारी, आदिवासींची मुले कशी शिकतील त्यांचे आरोग्य कसे सुधारेल, या चिंतेने व्यग्र असलेली अलौकिक जोडी आहे.

कै. ताराबाई मोडकांवर अनुताईंची फार निष्ठा होती. ताराबाईंचे ध्येय अनुताईंनी मनोमन जाणून घेतले होते. त्यांच्याबरोबर व त्यांच्यानंतर अनुताईंनी कार्यविस्तार खूप केला व बालशिक्षणाचे कार्य ग्रामीण भागात वाढीस लावले.

अनुताईंची व माझी ओळख जास्त होण्याचे कारण माझी मोठी बहीण सुशिलाबाई दाते, रत्नागिरी यांनी बालशिक्षणाचा प्रारंभ रत्नागिरीत केला. प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी त्या कै. ताराबाई असताना, काही दिवस बोर्डीला राहिल्या होत्या. त्यावेळी मलाही बोर्डीला जाण्याचा व राहण्याचा प्रसंग आला. त्या वेळच्या तेथील आश्रमीय वातावरणाचा अतिशय खोल असा परिणाम मनावर झाला. सामाजिक बांधिलकी ही किती महत्त्वाची गोष्ट आहे, याची जाण त्यावेळीच मनावर कोरली गेली. आज जे थोडेबहुत काम हातून घडत आहे ते त्यामुळेच, असे मनात आल्यावाचून रहात नाही. माझ्या बहिणीच्या हातून जे काम रत्नागिरीत झाले, बालवाड्या सुरू झाल्या त्याचे



02685

कारण अनुताईंचे प्रत्यक्ष जीवनदर्शन व ताराबाईंचे मार्गदर्शन हेच आहे.

***सामुदायिक प्रार्थना***

ताराबाई हयात असतानाची गोष्ट आहे. बोर्डीला दोन-तीन दिवस राहण्यासाठी गेलो होतो. तेव्हा बोर्डीला वीज आलेली नव्हती. कंदील, समया यावरच रात्रीची कामे चालावयाची. गांधीजींच्या आश्रमाप्रमाणे येथेही रात्रीची प्रार्थना होत असे. ताराबाई प्रार्थनेनंतर अनुताईंना थोडे बोलावयास सांगायच्या. तो प्रसंग आजही डोळयांपुढे उभा राहतो.

रात्रीची शांत वेळ, श्वेतवस्त्रांकित अशा ताराबाई आसनावर बसलेल्या असत. समईचा मंद प्रकाश असे. काही बालशिक्षण शिक्षिका ओळीने बसलेल्या असत. अनुताई उभ्याच असत. अतिशय विनम्रभाव त्यांच्या चेहेऱ्यावर असे. सामुदायिक प्रार्थना शांतपणे होत असे. ताराबाई अनुताईंना विशेष अनुभव विचारीत.

अनुताई सांगत, "पाड्यावरची अवस्था फार केविलवाणी. आई कामासाठी बाहेर पडलेली. वडिलही रोजगारावर, घरात १, २ वर्षाची मुलगी तापाने चेप पडलेली व तिच्याजवळ तिचे ५/६ वर्षाचे भावंड त्या आजारी मुलाजवळ बसलेले. दृश्य फारच करुण होते. घरात काहीही दिसत नव्हते. आम्ही त्या मुलाला मांडीवर घेऊन थोडावेळ बसलो. आमच्याच जवळचे रुमाल घेऊन गार पाण्याची पट्टी डोक्यावर ठेवली. त्यांना पेज करून पाजली. ताई, काही तरी औषधपाण्याची सोय करायला हवी. स्थिती पाहवत नाही." ताई फार खिन्न होऊन जायच्या, पण यातूनच काहीतरी योजना साकार व्हावयाची.

ताराबाईंना अनुताई 'ताई' म्हणत असत.

***काळजी किती करणार?***

रात्री झोपायच्या आधी अनुताई ताईंना म्हणावयाच्या, "आपण आज फार थकलात. स्वस्थ विश्रांतीची फार गरज आहे. मी थोडे तेल आपल्या डोक्याला लावते, म्हणजे आपल्याला बरे वाटेल. काळजी तरी किती करणार ?" हा सेवाभाव व गुरूतुल्य ताईंबद्दलचा जिव्हाळा मी स्वत: बघितल्यामुळे मन आदराने भरून येत असे.

अनुताई म्हणत, "या आदिवासींच्या चिंतेने ताईंना रात्र रात्र झोप येत नसे." यातूनच अंगणवाडी, कुरण शाळा वगैरे अनेक योजनांचा जन्म झाला.

ताई तशा शिस्तीला कडक. अनुताई एक आठवण सांगत होत्या.

"महत्त्वाचे एक पत्र त्या दिवशी जावयास पाहिजे होते. कामाच्या गडबडीत मला ते लिहिता आले नाही. ताईंना ते चालले नाही. ताई म्हणाल्या, 'हे असे कसे चालेल ? जे अग्रक्रमाने करावयास पाहिजे, ते झालेच पाहिजे. असे पुन्हा घडू देऊ नका. मनाला ही शिस्त लावून घ्या.' अनुताई म्हणाल्या, "ही ताईंची शिस्त मला जन्मभर उपयोगी पडली. पुन्हा कधीही असे घडले नाही."

***'दोन मिनिटे स्वस्थ बसा'***

अनुताई म्हणत, "ताईंचे माझ्यावर लक्ष असे. प्रेम असे." एकदा पुष्कळ उत्तम चिकू घरी आले होते. खूप गोड होते. अनुताई त्या दिवशी खूपच कामात होत्या. चिकू खाण्यास काय, त्याकडे बघण्याससुद्धा फुरसत नव्हती. पण ताईंचेही इतके प्रेम की सायंकाळी, 'अनुताई तुम्ही दोन मिनिटे येऊन जा,' असा निरोप पाठविला व ताईंनी स्वत: चिकूच्या फोडी करून बशीत घालून ठेवल्या. अनुताईंना म्हणाल्या,' आता दोन मिनिटे स्वस्थ बसा व या फोडी खा नि मगच उठा.' अनुताई हे सांगताना गहिवरून येत. म्हणत, "ताईंनी मला आईचे प्रेम दिले."

अनुताईंच्या भोवती सदैव मुलांचा गराडा असे. त्यात खरूज झालेली डोक्यात उवा असलेली, नाकाला शेंबूड येणारी कशीही मुले

असत. पण अनुताईंना आपपर भाव मुळीच नव्हता. त्यांना त्या प्रेमाने घेणार, गोंजारणार.

अनुताई नेहमी खादी वापरीत. रामकृष्ण परमहंसांची एक आठवण सांगतात की त्यांना पैशाचा स्पर्शही सोसत नसे. त्यांची परीक्षा पाहण्यासाठी त्यांच्या बसायच्या गादीखाली त्यांच्या नकळत काही पैसे ठेवले. रामकृष्ण त्यावर येऊन बसल्याबरोबर ताडकन् उठले.

अनुताईंच्या बाबतीत एकदा असाच अनुभव आला त्या केवळ खादीच वापरतात हे मला माहीत नव्हते. त्यांच्यासाठी एक पांढरी साडी आणली व त्यांना नेसावयास दिली. आमच्या सांगण्यावरून त्या नेसल्या. पण लगेच म्हणाल्या. ''ही साडी खादीची नाही. याचा मला स्पर्शही सहन होणार नाही. मी ती नेसू शकणार नाही.'' त्यांचे हे व्रती जीवन आत बाहेर किती मुरलेले होते याची कल्पना यावरून येते.

***ही ईश्वराची पूजा***

माझी आई त्यांच्यापेक्षा वयाने मोठी होती. अनुताई आमच्याकडे आल्या की प्रथम त्या आईजवळ बसायच्या. दोघींच्या गप्पा थोडावेळ रंगायच्या. आईला जुन्या ओव्या येत असत. ती त्यांना म्हणून दाखवी. त्या त्यांना फार आवडायच्या. माझी आई त्यांना म्हणे, ''अनुताई, किती काम करता लोकांसाठी. हीच ईश्वराची पूजा आहे. पण या कामाबद्दल तुमची दृष्टच काढावयास हवी.'' या प्रेमळ उद्‌गाराने अनुताई अक्षरश: गदगदून जात.

अनुताईंचा ७५ वा वाढदिवस थोड्या वेगळ्या तऱ्हेने साजरा करावा, अशी इच्छा होती. सुविद्या प्रसारक संघ बोरिवली, सुविद्यालय शाळेतील पूर्व प्राथमिक विभागातर्फे एक बालशिक्षण नगर भरविण्याचे ठरविले. ते वर्ष बालशिक्षणाचे उद्‌गाते गिजुभाई बधेका यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. त्यानिमित्त बालशिक्षण नगर व अनुताईंचा वाढदिवस असा दुहेरी कार्यक्रम ठेवला. अनुताईंनी १०० बालशिक्षण नगरांचा संकल्प सोडलेला होताच. महाराष्ट्रातील पहिले बालशिक्षणनगर प्रथम बोरिवलीत झाले. योगायोग असा की, ताराबाई व अनुताईंची प्रथम भेट झाली, ती बोरिवलीतच. एका शिबिराच्या निमित्ताने ! आज बालशिक्षणनगर भरवून त्यांचा ७५ वा वाढदिवस साजरा करण्याचे भाग्य सुविद्या प्रसारक संघाला लाभले होते.

***शिक्षण महोत्सवच***

शिबिर तीन दिवसांचे होते. अनुताई ५ दिवस राहिल्या. बालशिक्षण नगरासाठी मुंबई व उपनगरे यांतून जवळ जवळ सव्वाशे बालशिक्षणसेवक आले होते. मोठा मांडव घातला होता व सकाळी आठपासून शिबिराला सुरुवात होई. अनुताईंच्या तोंडचे अनुभव व एक शिक्षण तज्ज्ञ म्हणून बालशिक्षणाचे विचार ऐकून सारे शिक्षक आनंदित होत होते. शारदेच्या या प्रांगणात जणू काही शिक्षण महोत्सवच चालला होता. पालकांचाही सहभाग यात होताच. त्यावेळचे शिक्षण संचालक वि. वि. चिपळूणकर शेवटचा सबंध दिवस या नगरासाठी उपस्थित राहिले होते व त्यांनी प्रत्यक्ष चर्चेत भाग घेतला होता. त्यांनी अनुताईंना जो मान दिला, सन्मानित केले, ते नाते शिक्षणाधिकारी व शिक्षण तज्ज्ञ असे नव्हते तर सर्वांचा कळवळा असणारी माऊली व सुपुत्र असे जाणवत होते.

केवळ विद्वत्ता, सत्ता किंवा अधिकार, संपत्ती या सर्वांपेक्षा मनाला हवा हवासा वाटतो, तो समाजाबद्दल असलेला कळवळा व त्याकरिता जीवन समर्पण करण्याची वृत्ती! अनुताईंनी डोंगराएवढे काम केले ते असे करुणामय मन घेऊनच ! हा एक आदर्श होता.

***महत्त्वाच्या गोष्टी***

या बालशिक्षणनगरात अनेक महत्त्वाच्या गोष्टी पाल्यांच्या दृष्टीने त्यांनी सांगितल्या. उदा. परीक्षेचा धोशा बालवर्गापासून लावून मुलांचे बालपण खुरटवून टाकू नका. बालवर्गात परीक्षा

नसाव्यात, असे त्यांचे आग्रहाचे सांगणे होते. तसेच स्पर्धेच्या जगात त्यांना या वयात ओढू नका. त्यांना बालमंदिर कोंडवाडा वाटू देऊ नका. ती आनंदाने येथे कशी रमतील, याचा विचार करा. सुशोभन हा बाळांसाठी महत्त्वाचा विषय आहे. तो बाल मंदिरात मांडला गेलाच पाहिजे, हे त्यांचे विचार व बाल मंदिरात परीक्षा नको हे त्यांचे प्रतिपादन ठरावरूपाने आम्ही शिक्षण खात्याकडे पाठविले होते. शाळांतूनही पाठविले आहेत. हे विचार अतिशय मूलगामी आहेत.

***'देणगी नाकारू नये'***

अलीकडे घडलेली गोष्ट. बोरिवलीतील एका सद्गृहस्थांना आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ एकावन्न हजार रुपयांची देणगी द्यावयाची होती. पण त्यांची अट होती की बाल मंदिराला त्यांच्या पत्नीचे नाव द्यावयाचे. एवढ्या पैशात नाव द्यायला कोणतीही संस्था तयार नव्हती. त्यामुळे त्या देणगीदारांचे मन उदास झाले. आधीच आलेले वार्धक्य व त्यात देणगी सशर्त कोणी स्वीकारीना. मनासारखा देणगीचा उपयोग होत नव्हता. अचानक अनुताई आमच्याकडे आल्या होत्या. त्यांना ही गोष्ट सांगताच त्या म्हणाल्या, "द्या पैसे, मी देते आमच्या डहाणू स्टेशनजवळच्या बालवाडीला नाव. देणगी कधीही नाकारू नये." मोठा समारंभ केला. आम्हा सर्वांना बोलाविले. देणगीदारांनी नाव लागलेले पाहिले व मोठे समाधान त्यांना लाभले. अनुताईंनी मुक्या - बहिऱ्यांसाठी शाळा स्थापन केली होती. तिथे जाण्याचा प्रसंग मला आला होता. जेवणासाठीच तिकडे गेलो होतो. आमची गाडी त्या आवारात शिरत होती. अनुताई आलेल्या पाहताच ती सर्व मूक-बधिर मुले धावत येऊन त्यांच्याभोवती जमा झाली. त्यांना गराडा घातला. बिचाऱ्यांना बोलता येत नव्हते, पण अनुताईंचा मूकस्पर्श बोलका झाला.

सारी पाहुणे मंडळी जेवावयास बसली. अनुताई म्हणाल्या, "मी मागून बसेन." जेवणात श्रीखंड होते. अनुताईंनी बसण्यापूर्वी विचारले, "मुलांना थोडे वाढले होते का?" नाही कळल्यावर त्यांनी आणखी श्रीखंड आणवले व स्वत:च्या हातांनी मुलांच्या हातावर दिले व मग आपण थोडे घेतले. त्यांच्या चरित्रावरून समाजसेवेचे अनुकरण करण्यासारखे फार आहे.

अनुताईंचे जीवन असे संपन्न होते.

***'कामे होऊ लागली'***

त्यांना पद्मश्री मिळाली, तेव्हा सर्वांनाच फार आनंद झाला. अनुताई म्हणाल्या, "मला केवळ एवढ्यासाठीच बरे वाटले की, संस्थेची कामे आता भराभर होऊ लागली. बाकी कोणत्याही मानाने हुरळून जाण्याचे माझे वय नाही व सेवाव्रती माणसाला कोणत्याही लाभाची व नावाची अपेक्षा नसते." हे सर्व पाहून मन भारावून जाते.

अलीकडे एकदा त्यांनी रत्नागिरीचा दौरा काढला. माझी बहीण सुशिलाबाई दाते आज नाहीत. पण अनुताईंनी ताराबाईंच्या जन्मशताब्दीनिमित्त १०० पालकशिबिरांचा संकल्प सोडला होता. रत्नागिरीत ती शिबिरे आयोजित केली होती. त्यासाठी स्वत: गेल्या होत्या. सुशिलाबाईंचे काम पाहून त्यांना धन्य वाटले. तेथेही त्यांनी अनेक शिक्षकांना उपयुक्त सूचना दिल्या. कोवळे अंकूर कोमेजू देऊ नका, असा इशारा दिला. त्यावेळी त्यांच्याबरोबर एक छोटा, पण दांडगाई करणारा मुलगा होता. कोसबाडला त्यांच्याजवळ असे. त्याला घेऊन येताना वाटेतच रत्नागिरीचा भूगोल शिकविला. त्यांची दृष्टी शिक्षणतज्ज्ञाची असल्यामुळे इतक्या भरलेल्या कार्यक्रमात त्या, त्या मुलाला संधी मिळेल, तेथे शिकवीत होत्या. या अनेकविध गोष्टी करणाऱ्या आमच्या अनुताई कोसबाडच्या टेकडीवरून अनेकांना ज्ञानदृष्टी देत होत्या. असे हे दिव्य जीवन आज आपल्यातून नाहीसे झाले आहे.

*(सौजन्य : महाराष्ट्र टाइम्स, ४-१०-९२)*

# कोसबाडची कर्मयोगिनी

**— प्रा. ग. प्र. प्रधान**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अनुताई शिकल्या. त्यांनी ताराबाई मोडक यांच्या सहकार्याने अभिनव शैक्षणिक प्रयोग यशस्वी करण्यासाठी वर्षानुवर्षे निष्ठेने कार्य केले. अनुताई या प्रसिद्धिविन्मुख, आत्मविलोपी स्वभावाच्या, पण त्यांचे कार्यच इतके मोठे, की महाराष्ट्राला त्यांचे मोठेपण लक्षात आले.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात वारली या आदिवासी जमातीची फार मोठी संख्या आहे. हे लोक मुख्यत: डोंगरपट्टीत राहतात. या वारली समाजाच्या जीवनावर गेल्या पन्नास वर्षांत तीन स्त्रियांचा फार मोठा प्रभाव पडला. गोदूताई परुळेकर, ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ या त्या तीन थोर महिला कार्यकर्त्या.

गोदूताईंनी वारल्यांना स्वत:च्या हक्कांसाठी लढायला शिकविले, तर ताराबाईंनी आणि अनुताईंनी वारल्यांच्या घरातील लहान मुलामुलींना शिकविताना प्रौढ स्त्री-पुरुषांच्या मनावरही संस्कार केले. या तीन थोर कार्यकर्त्यांमुळे सावकारांचा, जमीनदारांचा गुलाम बनलेल्या वारली समाजाला स्वत्वाची जाण आली, त्यांच्यातील माणूस जागा झाला. केवळ संघर्षामुळे हे घडले नसते, केवळ शिक्षणामुळे आणि विधायक कार्यक्रमामुळे हे झाले नसते. संघर्ष आणि संस्कार या दोहोंचा एकत्रित परिणाम म्हणून या वनच्या राजांना आजच्या जगात स्वाभिमानाने कसे जगावे ते कळले.

***अंगण, कुरणातील शाळा***

गोदूताई परुळेकर या मार्क्सवादी कम्युनिस्ट नेत्या. ताराबाई मोडक या श्रीमंत कुटुंबात वाढलेल्या. व्यसनी जोडीदारामुळे संसार विसकटला जात असतानाही निर्भयपणे स्वतंत्र विचार करून खेड्यात, विशेषत: आदिवासी समाजाला शिक्षण द्यावयाचे या निर्धाराने डहाणू तालुक्यात कोसबाडला नवे शैक्षणिक प्रयोग करणाऱ्या ताराबाईंचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. अनुताईंनी ताराबाईंना १९४६ पासून साथ दिली, या दोघींनी मिळून शिक्षणाची मळलेली वाट सोडून आदिवासी मुलामुलींसाठी अंगणात आणि कुरणात शाळा नेली. अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या वारली समाजाच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाशकिरण आणला, अनेक आदिवासी स्त्रियांना आधार दिला. अनेक संसार सावरले आणि हे सारे आईच्या मायेने केले. गोदूताई रणरागिणी म्हणून गाजल्या. ताराबाईंना शिक्षणतज्ज्ञ म्हणून मान्यता मिळाली. शिक्षणाबद्दल अनुताईंचेही स्वतंत्र विचार होते; परंतु त्या कधी प्रसिद्धीच्या झोतात आल्या नाहीत. त्यांनी शिक्षणाबद्दल लेखन करण्यापेक्षा ताराबाईंच्या सहकार्याने अभिनव शैक्षणिक प्रयोग यशस्वी करण्यासाठी वर्षानुवर्षे निष्ठेने कार्य केले. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला त्यांच्या मनाचे आणि कार्याचे मोठेपण जाणवत असे. अनुताई या प्रसिद्धिविन्मुख, आत्मविलोपी स्वभावाच्या; परंतु त्यांचे कार्य इतके मोठे, की महाराष्ट्राला त्यांचे मोठेपण लक्षात आले आणि आम्ही अनेक जण त्यांच्यापुढे नतमस्तक झालो.

२७ सप्टेंबरला अनुताईंचे निधन झाले. तेव्हा आदिवासींचा मोठा आधार गेला हे

सर्वांना जाणवले आणि म्हणूनच सारा महाराष्ट्र हळहळला.

***अनुताईंची जीवनकथा***

अनुताई वाघ यांची जीवनकथा ही फारच थोड्यांना माहिती आहे. वाघ कुटुंब हे मूळचे बारामती तालुक्यातील मोरगावचे. त्यांचे वडील वनखात्यात नोकरीला होते. १७ मार्च १९१० रोजी अनुताईंचा जन्म त्यांच्या आजोळच्या घरी - चित्रावांकडे पुण्यात झाला. वडिलांच्या बदल्या होत, त्यामुळे शिक्षणाची आबाळ झाली, तरी त्या सहावीपर्यंत शिकल्या. त्या वेळच्या रीतीप्रमाणे १३ व्या वर्षी त्यांचे लग्न झाले आणि दुर्दैवाने सहा महिन्यांच्या आत नवऱ्याचे अपघाती निधन होऊन त्या विधवा झाल्या. या आघाताने खचलेल्या अनुताईंच्या आईला एका मैत्रिणीने - अकोल्याच्या दुर्गाताई नेने यांनी - धीर दिला आणि अनुताईंना वऱ्हाडात अकोल्याला नेऊन राष्ट्रीय शाळेत घातले. तेथे एक वर्ष शिक्षण घेताना अनुताईंनाही नवा आत्मविश्वास वाटू लागला.

त्या वडिलांच्या घरी परत आल्या आणि नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथील शाळेतून त्यांनी फायनलची परीक्षा दिली. परीक्षेत त्या नाशिक जिल्ह्यात पहिल्या आल्या. नंतर नाशिकच्या ट्रेनिंग कॉलेजमधून त्यांनी तीन परीक्षा दिल्या व त्या थर्ड इअर ट्रेंड झाल्या. त्या वेळी त्या मध्य विभागात पहिल्या आल्या. नाशिकला चार वर्षे नोकरी केल्यावर त्या पुण्याला आल्या आणि हुजूरपागेच्या प्राथकिम शाळेत त्यांना नोकरी मिळाली. त्या वेळी धाकट्या बहिणीच्या आणि भावाच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी घेतली. अनुताईंना त्या वेळी ३५ रुपये पगार होता. त्यात त्या संसार चालवून भावंडांना शिकवीत होत्या. नोकरी सांभाळून त्या पुन्हा सरस्वती मंदिर संस्थेच्या नाईट हायस्कूलमध्ये जाऊ लागल्या आणि १९३८ मध्ये धाकटी बहीण लीला हिच्याबरोबरच चांगले गुण मिळवून मॅट्रिकची परीक्षा पास झाल्या.

त्यांच्या धाकट्या भगिनी लीलाताई दंडवते (मॉडर्न हायस्कूलच्या (मुलींचे) माजी मुख्याध्यापिका) मला म्हणाल्या, "आमचे वडील फार हुशार होते आणि त्यांच्या बुद्धीचा वारसा आमच्या ताईकडे आला." खरे म्हणजे, ही तीनही भावंडे हुशार; पण अनुताई प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिकल्या. पुढे अनेक वर्षांनी कोसबाडला काम करीत असताना त्यांनी बाहेरून कॉलेजच्या परीक्षा दिल्या आणि प्रौढ वयात त्या बी.ए. झाल्या. बी.ए. च्या परीक्षेला त्या बसल्या तेव्हा त्यांना मोतिबिंदूचा विकार झाला होता. कोणीतरी त्यांना वाचून दाखवावे लागे. परीक्षेला जाताना त्या डोळ्यांत औषध घालून कसेबसे लिहीत आणि इतक्या अडचणी येऊनही त्यांनी परीक्षेत दुसरा वर्ग मिळविला.

परंतु अनुताई नुसत्या परीक्षा देत राहिल्या नाहीत. पुण्याला हुजूरपागेत नोकरी करताना त्या खूप वाचन करीत. १९४२ मध्ये जेव्हा 'चले जाव चळवळ' सुरू झाली, तेव्हा अनुताई आणि लीलाताई या दोघी बहिणींना चळवळीत भाग घेण्याची तीव्र इच्छा होती; परंतु धाकट्या भावाचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत अन्य काही करायचे नाही, या निर्धाराने, मनातील ऊर्मीला आवर घालून अनुताई नोकरी करीत राहिल्या आणि नुकत्याच बी.ए. झालेल्या लीलाताई चळवळीत भाग घेऊन तुरुंगात गेल्या.

१९४५ मध्ये भावाचा इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम पूर्ण झाला आणि अनुताई आपल्या भावंडांना म्हणाल्या, "आता माझी जाबाबदारी संपली. आता तुम्ही तुमच्या पायावर उभे राहा. मी आता नोकरी सोडणार आणि खेड्यात काम करायला जाणार." त्यांच्या या निर्णयाने सारेच जण चकित झाले. हुजूरपागेसारख्या मान्यवर

शाळेत एका तपाहून अधिक काळ शिकविल्यावर त्या नोकरीचा राजीनामा देण्याचा अनुताईंचा विचार अनेक आप्तेष्टांना, मैत्रिणींना वेडेपणाचा वाटला; पण अनुताई आपल्या निश्चयापासून ढळल्या नाहीत. त्यांनी तडकाफडकी नोकरीचा राजीनामा दिला आणि त्या कस्तुरबा ट्रस्टतर्फे बोरिवलीत भरलेल्या स्त्रियांच्या शिबिरात सहभागी झाल्या. तेथे ताराबाईंची आणि त्यांची भेट झाली. ताराबाईंनी 'मी डहाणू तालुक्यात बोर्डीला प्राथमिक शिक्षणाचे, आदिवासी मुलांना शिकविण्याचे काम करायला जाणार आहे. तुम्ही कोणी माझ्याबरोबर येणार का,' असे विचारले. तेव्हा अनुताईंनी तत्काळ 'हो, मी येईन,' असा उत्साहाने प्रतिसाद दिला. या दोन तपस्विनी बोर्डीला गेल्या आणि ताराबाईंच्या निधनापर्यंत त्यांनी एकमेकींना साथ देत आदिवासी मुला-मुलींना शिकविण्याचे, त्यांच्यावर संस्कार करण्याचे कार्य सतत निष्ठेने अनेक वर्षे केले. बोर्डीला आचार्य भिसे हे थोर गांधीवादी कार्यकर्ते काम करीत होते. त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये चित्रे गुरुजींसारखी ध्येयवादी माणसे होती. या ध्येयवादी परिवारात ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ मिसळून गेल्या आणि त्यांनी आपल्या कार्याला सुरवात केली.

***ताराबाई-अनुताईंची शाळा***

बोर्डीला पूर्वप्राथमिक शाळा काढायची, असे ताराबाई व अनुताईंनी ठरविले. त्या वेळी इतक्या लहान मुलांना काय शिकविणार असे पालकांना वाटे म्हणून या दोघी जणींनी घरोघरी जाऊन आयांना समजावून सांगून मुले गोळा केली. असे करताना त्या पांढरपेशांच्या घरी गेल्या, शेतकरी आणि मच्छीमारांच्या घरी गेल्या, आदिवासी वस्तीत गेल्या आणि हरिजन वस्तीतही गेल्या. 'हरिजन मुलांबरोबर आमची मुले शिकणार नाहीत,' असे काही पालक म्हणाले; परंतु ताराबाई व अनुताईंनी तडजोड करण्याचे स्पष्टपणे नाकारले. हळूहळू हा विरोधही मावळला.

बोर्डी त्या वेळी लहान गाव होते; परंतु तिथे सधन गुजराथी समाज आणि काही सधन शेतकरीही होते. आदिवासींची परिस्थिती पाहून त्यांच्यात जाऊन आपण राहिले पाहिजे, असे ताराबाई आणि अनुताई यांना वाटू लागले आणि म्हणून त्या दोघी जणी १९५७ मध्ये बोर्डीपासून चार-पाच मैल अंतरावरील कोसबाडला गेल्या. कोसबाडच्या उघड्या टेकडीवरील एका खडकावर दोघी जणी प्रथम बसल्या आणि एकमेकींना म्हणाल्या, "आता यापुढं इथंच आपलं घर." या दोघी जणी आदिवासी वस्तीत कशा राहणार अशी काळजी कोसबाडच्या कृषिसंस्थेचे प्रमुख हरिश्चंद्र पाटील यांना वाटली, पण अल्पावधीत त्या दोघी जणी भोवतालच्या साध्याभोळ्या वारल्यांना आपल्यातल्याच वाटू लागल्या. या दोघी जणी रहात त्या खोपटेवजा घराच्या अंगणातच शाळा भरे. पालघर, डहाणूकडे शेतकरी जी घराच्या मागे बागेच्या पद्धतीची शेती करतो, त्याला तो वाडी म्हणतो. अनुताई मला म्हणाल्या होत्या, "अंगणात आम्ही अशी वाडी, बाग करायला सुरवात केली." अंगणवाडी शब्दाला अशी काव्यात्म छटा आहे हे मला त्यापूर्वी माहीत नव्हते.

अंगणवाडीत सकाळी शाळा भरे. तेथे काही मुले येत, पण काही थोडी मोठी मुले गुरे घेऊन रानात जात. तेव्हा अनुताई कुरणात जाऊन बसत आणि मुले त्यांच्याभोवती गोळा होत. शाळे मुले आणण्याचे काम आपल्या समाजात पूर्वी काही जणांनी केले आहे, पण शाळाच मुलांच्या मागे नेणाऱ्या अनुताई-ताराबाई या केवळ असामान्य होत्या. तेथे शिकविण्याची साधने नसत, पण अनुताई हटल्या नाहीत.

मुलांना त्या थोडा वेळ चिंचा पाडायला सांगत आणि मग विचारीत, 'चिंचा कोणी जास्त पाडल्या?' मुलांना त्या मोजता येत नसत. अनुताई त्या मोजून दाखवीत आणि यातून आकड्यांची ओळख त्या भटकणाऱ्या - खेळणाऱ्या मुलांना सहजपणे होई. अनुताई परिसराशी एकरूप झाल्या होत्या. आदिवासी मुलांना त्यांनी जबरदस्तीने शाळेत ओढले नाही, पण निसर्गाच्या या बालकांना त्यांनी हसत-खेळत, गोष्टी सांगत ज्ञान दिले.

वारली कुटुंबातील मुली दिवसभर काम करीत. धाकट्या भावंडांना सांभाळत. काही जणी सकाळी भावंडांना घेऊन अंगणात येऊन शिकत, पण काही जणींना घरीच राहावे लागे. अनुताईंनी या मुलींना 'तुम्ही दिवेलागणीनंतर या,' असे सांगितले आणि काही मुली येऊ लागल्या. त्या गाणी म्हणायच्या, गोष्टी ऐकायच्या आणि लिहायला - वाचायलाही शिकायच्या. पाऊस फार असला, की शाळेला सुट्टी असे. अमावस्येच्या काळोखात मुली परत जायला भीत. मग त्या अनुताई - ताराबाईंच्या घरातच राहत. कोणी खायला आणले नसले, तरी अनुताई त्या मुलीला जेवू घालत. अशी आईची माया करीत. त्यांनी कोसबाडच्या टेकडीवर ज्ञानाचे रोपटे लावले.

ताराबाई मोडक शिक्षणाबद्दल सतत वाचीत, विचार करीत. अनुताईही वाचीत आणि नंतर दोघींची चर्चा चाले. आपल्या परिस्थितीला अनुकूल असेच शिक्षण द्यायचे, हा दोघींचा निर्धार पक्का होता. अनुताई एकदा म्हणाल्या, "टागोर फार मोठे. मी अगदी लहान; पण मला आदिवासी मुला-मुलींना कसं शिकवता येईल, हे अनुभवातून समजले. कोणाचे आंधळे अनुकरण आम्ही कधी केले नाही. सर्वांचे विचार वाचायचे, समजून घ्यायचे; परंतु आपला परिसर, आपली माणसे यांना विसरायचे नाही, असा निश्चय कायम ठेवून आम्ही काम केले आणि म्हणूनच आमचे काम कोसबाडपुरते मर्यादित न राहता आजूबाजूच्या भागातील आदिवासींच्यात पसरले. काम करताना परिस्थितीचे असे भान ठेवले पाहिजे, हे मी गांधीजींपासून शिकले."

आदिवासी माणसं त्यांच्याकडे येऊ लागली, पैसे मागण्यासाठी नव्हे, तर आपली सुखदु:खे सांगण्यासाठी. या दोघी जणी नवराबायकोची भांडणे सोडवीत. समजुतीच्या चार गोष्टी वडीलधाऱ्या करडेपणाने सुनावीत. दारू सोडायला सांगत. कधी भांडणे संपत, कधी चालू राहत; पण सगळ्यांना अनुताई, ताराबाईंचा आधार वाटे.

या दोन तपस्विनी बहिणीबहिणीसारख्या एकत्र राहिल्या. अनुताई गावाला गेल्या, की ताराबाई त्यांची परत येण्याची वेळ झाल्यावर वाट पाहत बसत. अनुताई अधिक भावनाप्रधान. ताराबाई गावाहून परत येण्यापूर्वीच त्यांच्या येरझारा सुरू होत; आणि काही वेळा त्या दारात येऊन उभ्या राहत. ताराबाईंचे निधन झाले तेव्हा अनुताईंना फार दु:ख झाले; पण त्यांनी अश्रू आवरले आणि आपले शिकविण्याचे, शिक्षणप्रसाराचे काम चालू ठेवले. अनुताईंचा आपल्या धाकट्या भावावर - मधूवर - फार जीव होता. त्यांनी त्याला वाढविले, इंजिनिअर केले, त्याला अधूनमधून भेटल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. तो बारा वर्षांपूर्वी गेला तेव्हा अनुताईंच्या मनावर फार मोठा आघात झाला. त्या मनाने काहीशा खचल्या.

गेली कांही वर्षे प्रकृती बरी नसे. वर्ष तर त्या खूप आजारी होत्या. म्हणत, "तू पुन्याला माझ्याकडे चल." अनुताई म्हणाल्या, "मी इथेच इथले आदिवासी हेच माझे कोसबाडलाच माझा शेवट होता. अखेर आपल्या कर्मभूमीतच.

*(सौजन्य : रविवार सकाळ - ४-१०-९२)*

# कोसबाडची टेकडी विराण झाली !

— आशा कर्दळे

अनुताई वाघ नुकत्याच निवर्तल्या. एक टेकडीच, पण पर्वतांनाही थिटं करणारी. कोसबाडच्या टेकडीवर केवढा मोठा समाजकार्याचा प्रपंम विस्तारला आहे त्यांचा! कार्याचा वसा पुढे चालू राहीलच, पण आज ही टेकडीच पोरकी झाल्यासारखी वाटते.

१९८५ साली अनुताईची पंचाहत्तरी होती. तेव्हा आम्ही दहा-बारा जणींचा ग्रुप कोसबाडला त्यांना भेटायला गेला होता. तेव्हाच त्यांना नीट चालता येत नव्हतं. पाय कमकुवत झाले होते. चालताना पाय एकमेकांमध्ये गुंतत होते. तेव्हाच वाटलं होतं, हे पाय थकणार नाहीत तर काय? आयुष्यभर केवढी अथक पायपीट केली आहे या पायांनी! दऱ्याखोऱ्यातून, जंगल रानातून.

गुरूशिष्यांच्या अनेक जोड्या विविध क्षेत्रांमध्ये गाजल्या आहेत. पण ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ ही गुरूशिष्येची जोडी केवळ अपूर्वच म्हणावी लागेल. ताराबाई पद्मभूषण, तर अनुताई पद्मश्री. ताराबाईंची जन्मशताब्दी नुकतीच साजरी झाली. ती कृतार्थतेनं बघून या शिष्येनंही वयाच्या ८२ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. कोसबाडच्या परिसरात वावरणाऱ्या अनुताईना ज्यांनी पाहिलं असेल, त्यांना जिवतीचीच आठवण येईल. ती बालसंरक्षक देवी आहे. अनुताईही यापेक्षा वेगळ्या नव्हत्या. त्यांच्या अभयछत्राखाली चार पाळणाघरांमधून नव्वद तान्ही मुलं जोजवली जात आहेत. बालवाड्यांमधून रंगीत खेळणी हाताळत शेकडो बालकं गाणी म्हणताहेत आणि प्राथमिक शाळांमधून साडेतीनशे आदिवासी मुलंमुली शिकत आहेत! याशिवाय कुरणशाळा, अंगणवाड्या, वसतिगृहं, प्रशिक्षण केंद्र, रात्रशाळा, प्रौढशाळा वेगळयाच! अनुताई म्हणत, शाळा म्हणजे मुलांच्या अंगणातलं झाड झालं पाहिजे. ते त्यांनी करून दाखवलं आणि त्यासाठी स्वत:च्या देहाचं झाड झिजवलं!

ताराबाई मोडक पतीपासून विभक्त झालेल्या, तर अनुताई बालविधवा. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचं लग्न झालं अन् लगेच वैधव्य आलं. ताराबाई त्यांना म्हणाल्या, "तुला विध करण्यात ईश्वराचाच काही हेतू असला पाहिजे. नाहीतर चार पोरांचं लटांबर घेऊन सामान्य स्त्रीसारखी संसार करत बसली असतीस. एवढं समाजकार्य कसं झालं असतं तुझ्या हातून?"

ताराबाईवर अनुताईची अपार श्रद्धा. ताराबाईनी आंबा खाणं सोडलं म्हणून त्यांनीही सोडलं. ताराबाई त्यांना 'सरदारीण' म्हणायच्या. 'कर्ता पुरुष' म्हणायच्या. ताराबाईनी देह ठेवला तेव्हा अनुताईनीच अग्नी दिला व त्यांचं कार्य पुढे चालवलं. एकदा ताराबाई आणि अनुताई एकाच खोलीत रात्री झोपल्या होत्या. अनुताईना नुकताच सर्पदंश झाला होता. त्याच्या अपार वेदना होत होत्या. विव्हळलं तर ताराबाईची झोप मोडेल या विचारानं त्या रात्री अकरा वाजता बाहेर झाडाखाली जाऊन बसल्या व एकटीनं वेदना सोसत रात्र काढली. आयुष्यात खूप दु:खं त्यांनी पचवली. हे सापाचं दुखणं तर

त्यांना सहा महिने पुरलं. वयाच्या ५१व्या वर्षी त्या बी.ए.च्या परीक्षेला बसल्या. त्या वेळी डोळ्यांत मोतीबिंदू वाढत होते. अगदी कमी दिसायचं. पण तशातच परीक्षा दिली. नंतर डोळ्यांवर शस्त्रक्रिया झाली. पण त्यात एक डोळा गेला. नंतर पायांचं अधूपण भोगत होत्या.

त्या बालविधवा होत्या तरीही समवयस्क तरुणांमध्ये मिसळत. पण त्या काळातही (१९२९) त्यांना समाजाच्या कुत्सित नजरा सहन कराव्या लागल्या नाहीत हे विशेष! त्यांना स्त्री-पुरुष मैत्री प्रस्थापित करून दाखवायचीच होती व ती त्यांनी करून दाखवली. त्या पुरुषाची ओळख सरळ 'हा माझा मित्र' अशीच करून देत. खोट्या नात्यांचा मुलामा त्यांनी कधी चढवला नाही.

पुण्याच्या हुजूरपागेत तेरा वर्ष त्या शिक्षिका होत्या. पण चांगली मानाची नोकरी सोडून त्या समाजकार्याकडे वळल्या आणि याला कारण बोरिवली इथं १९४५ साली ग्रामीण भागातल्या कार्याची पूर्वतयारी म्हणून जे शिबीर भरलं होतं, त्या शिबिरात झालेली ताराबाईची भेट. कस्तुरबा गांधींच्या निधनानंतर जो निधी जमा झाला होता, त्याच्या विनियोगासंदर्भात महात्मा गांधी म्हणाले होते, "माझी पत्नी खेडेगावातील महिलांची प्रतिनिधी होती. म्हणून खेड्यातील मुलाचं आणि महिलांचं कल्याण होईल अशीच कामं सुरू करा." म्हणून त्याच वर्षी बोर्डीला ग्रामबालशिक्षा केंद्राचं उद्घाटन झालं आणि अनुताईच्या जीवनाची दिशा निश्चित झाली.

१९५७ साली त्या एकट्याच एका मदतनीस भगिनीसह कोसबाडला आल्या. तेव्हा तर कोरी पाटी होती. शुन्यातून सगळं उभं करायचं होतं. बोर्डीचा बारा वर्षांचा अनुभव होता, पण त्याचा उपयोग इथं कसा करायचा माहीत नव्हतं. समस्या पुढ्यात येत गेल्या आणि उपाय सूचत गेले. त्यातून योजनांचा जन्म होत गेला.

हरिजन वाड्यांमधून मुलं गोळा करून आणणं सोपं नव्हतं. आदिवासी मुलांसाठी बालवाडी ही कल्पनाच नवलाईची होती. मुलं रानावनात गुरांपाठी भटकायची. मुलं कमालिची अस्वच्छ असत. खरजेनं भरलेली, डोक्यांमध्ये उवा-लिखांचा बुजबुजाट. अनुताई मुलांना स्वच्छ करायच्या. गरम पाणी साबणानं आंघोळी घालायच्या. त्यांच्या उवा-लिखा फणीनं साफ करायच्या. त्यांना वर्षाला एक कपड्याचा नवा जोड द्यायच्या. त्यांचे कपडे धुवायच्या... अनुताई शेकडो मुलांच्या आईच झाल्या होत्या. त्या स्वत:ची तुलना गांधारीशी करत. खूप मुलांचं मातृत्व आणि पट्टी बांधून नव्हे तर खरं खुरं अंधत्वही!

ताराबाईचं एक सूत्र होतं- शहरातून काही आणायचं नाही. रेतीकागद तयार करायचा होता. अनुताईनी रेती बारीक चाळली. शिरस शिजवून त्यात रेती कालवून त्याचा थर जाड कागदावर दिला. झाला रेतीकागद तयार! तसंच झाडांना पाणी घालण्याचं. मोठी विहीर होती. पण मुलांना ते पाणी काढणं जमत नसे म्हणून अनुताईनी मोठा पिंप विहिरीशेजारी भरून ठेवला. ही लहान विहीर. त्याला छोटी कप्पी बसविली. मुलं डबड्यानं पाणी उपसत व झाडांना घालत. त्यांनी मुलांना मातीकाम, रंगकाम शिकवलं. चिंचोके मोजून अंक शिकवले. कोळश्यानं पांढऱ्या भिंतीवर लिहून अक्षरं शिकवली, मुली शाळेत न येता तान्ह्याला सांभाळायला घरीच राहात म्हणून पाळणा घरं सुरू केली. मुलींना शिकता यावं म्हणून तान्ह्या भावंडांसह त्यांची जबाबदारी

घेतली. काही मुलं गुरं चारायला जायची म्हणून त्यांच्यामागे तिथं जाऊन कुरणशाळा सुरू केल्या. तिथंच खुंट्या ठोकून झाडांच्या सावल्या मोजणं, गायी-बकऱ्यांची संख्या मोजणं, बकऱ्यांच्या बाळांची बारशी करणं अशी खेळ व ज्ञानाची सांगड घातली. त्यातून वर्ष, महिने, दिवस ही कालगणना शिकवली. जोडीला सृष्टीनिरीक्षण होतंच. बडबडगीतं, अभिनयगीतं तिथंच मोकळ्या वातावरणात शिकवली.

मुलांना कामं, मजुरी मिळवून दिली. तीन आणे रोज मजुरी आणि वर जेवण. काही दिवसांनी मुलं येईनाशी झाली. कारण कळेना मग पालक म्हणाले, घरातली इतर मुलं उपाशी असताना एकानंच जेवायचं हे कसं? म्हणून मुलांचं जेवण बंद करून फक्त नाश्ता सुरू ठेवला. स्त्रियांसाठी 'शबरी उद्योगालय' सुरू केलं. ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या लोणची, मसाले, पापड या पदार्थांच्या विक्रीतून मिळणारा पैसा त्यांच्याच विकासासाठी खर्च केला. शिक्षण झोपडी-झोपडीच्या दारात नेऊन ठेवलं.

अनुताई वाघांसारख्या व्रतस्थ व्यक्तींचा जीवनपट पाहिला म्हणजे वाटतं, जन्माच्या वेळीच अशा व्यक्तींच्या कर्मभूमीचं बीज विधात्यानं टाकून ठेवलं असावं. जन्मानंतर ती मातीच त्यांना बोलावते. तसं नसतं तर समृद्ध युरोपमधलं वास्तव्य सोडून डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर आफ्रिकेतल्या घनदाट जंगलातल्या लॅम्बरीनला आदिवासी वस्तीत कशाला गेले असते? अनुताई वाघांची जीवन प्रेरणाही यापेक्षा वेगळी नव्हती.

*(सौजन्य : 'इंडियन एक्स्प्रेस' - ३-१०-९२)*

---

*(पान १० वरून)*

आली. अगदी १५ दिवसांच्या बालकापासून तीन वर्षे वयाच्या ११५ मुलांची या स्पर्धेसाठी वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. मेळाव्याच्या समारंभास दोनशेवर आदिवासी महिला आपल्या बालकांसह उपस्थित होत्या.

खेडेगावात असे ठिकठिकाणी नुसते दवाखाने उघडून चालणार नाही तर, स्थानिक मंडळींना आरोग्यशिक्षणही दिले पाहिजे. दुखणी होऊच नयेत यासाठी योग्य ती स्वच्छता, आहार, वगैरेची काळजी घ्यावयाला हवी. वेळीच उपाय करायला हवेत, या गोष्टीची जाणीव ग्रामीण जनतेला. विशेषत: आदिवासी मंडळींना करून द्यायला हवी. हे आरोग्यशिक्षण ग्रामस्थ मंडळींना कसे देता येईल याचे उद्‌बोधनवर्ग डॉ. जैन यांनी घेतले. प्रदर्शन, रंजन- कार्यक्रम, बाहुलीनाट्य, प्रात्यक्षिके, सहली आदी माध्यमांतून हे शिक्षण द्यावयाचे आहे. आता जून १९८१ पासून होणाऱ्या नव्या सत्रामध्ये आरोग्यप्रकल्पाद्वारे दवाखाने चालविणे व आरोग्यदृष्ट्या लोकशिक्षण करणे अशी दोन कामे सुरू होतील.

प्रकल्पाधिकारी डॉ. जैन अतिशय काळजीपूर्वक प्रयोग चालवीत आहेत. डोंगराळभागात आदिवासींच्या वस्तीत झोपडीतून चालणारे दवाखाने व नर्सिंगहोम सुरू करावे अशी त्यांची पुढची भरारी आहे.

या प्रकल्पात काम करणाऱ्या बालवाडी-शिक्षिका व त्यांच्या मदतनीस अतिशय हौसेने काम करीत आहेत. शिक्षिकांपैकी तिघी स्वत: आदिवासी आहेत. या सर्वांना प्रकल्पातून नाममात्र मानधन मिळते.

विकासवाडीची ही नवी पाकळी अशी तजेलदार होत आहे.

# तपस्विनी अनुताई

**-- शांता आठवले**

माझा मुलगा म्हणत होता, "आहे काय त्या कोसबाडला एवढं? तू जीव टाकत्येय जाण्यासाठी? खरंच आता काय उरलंय तिथे. देवळातला देव हरवल्यासारखी परिस्थिती आहे. ताराबाई गेल्या तरी अनुताई होत्या. आपल्या जीवनाची समिधा या आदिवासींच्या उत्थानासाठी अर्पण करणाऱ्या अनुताई होत्या आणि तेच आकर्षण मोठं होतं. फक्त एकदाच त्या आजारी म्हणून पुण्याला असताना आम्हाला कोसबाडला राहण्याचा प्रसंग आला; तेव्हा कुठेतरी काहीतरी चुकलंय- आपण चुकीच्या ठिकाणी आलो आहोत असं सारखं वाटत होतं. मग आता तर त्या कायमच्या निघून गेल्या आहेत!

कोसबाडला गेलं की इतर कामं असायचीच, पण मला त्यांच्या नव्या प्रयोगाचं फार अप्रुप होतं. दरवेळी मी दाभोण-ऐन्याला जाऊन 'ग्राममंगल'च्या प्रयोगाची प्रगति पाहायची. अनुताईंचं भरभरून बोलणं ऐकायची नी भारावून जायची. वयाच्या ७५ व्या वर्षी त्या उत्साहाने ओथंबून नवे काम अंगावर घेत होत्या. मी त्यांच्या त्या उत्साहानेच भांबावून गेले होते. नवे-पुस्तक - नवा पाठ - नवा तक्ता त्या मला दाखवायच्या; मी आश्चर्यचकित होऊन ते सर्व मनात साठवून घ्यायची.

एकदा मला त्यांनी दाभोणचा नवा प्रकल्प 'ग्रामराज्य' समजावून सांगताना म्हटलं होतं, 'हा माझा प्रयोग यशस्वी झाला पाहिजे, म्हणजे बरेचसे प्रश्न सोपे होतील. कोसबाडला आलेल्या अनुभवांचा खूप उपयोग होतो आहे, पण एवढी वर्ष झाली तरी दाभोणचा आदिवासी अजून होता तिथेच आहे.' कोसबाडला प्रश्न निर्माण झाला की उत्तर शोधायचे असे. इथे प्रश्न माहीतच होते व त्यावरची उत्तरेही माहीत होती. म्हणूनच कोसबाडसारखे सुरुवातीपासून शिक्षणावरच लक्ष केंद्रित करून चालणार नव्हतं. सर्व बाजुंनी गावाचं मंगल करायचं होतं. विकास साधायचा होता. काम अवघड तर खरंच, पण अनुताईंची या वयातील जिद्द, चिकाटी व निष्ठा दांडगी होती. त्यांचं शरीर त्यांना साथ देत नव्हतं, पण मनाची उभारी विलक्षण होती. सारं चित्र त्यांच्या मनःचक्षुसमोर स्पष्ट असे. त्यामुळे अगदी बारीकसारीक सूचनासुद्धा त्या लिहून काढीत आणि बसल्या जागेवरूनच काम करून घेत. प्रत्यक्ष जाता आलं नाही, तरी कल्पनेनं त्या केव्हाच जाग्यावर पोहोचत असत.

विकासवाडीचा प्रयोग कोसबाडला यशस्वी झाला होता, त्याला केंद्रसरकारची मान्यता मिळाली होती; तरीसुद्धा परत दाभोणला प्रयोग करताना त्यांनी कुरणशाळा वगैरे चालविल्या नाहीत. मात्र शाळांची वेळ बदलली. शाळेच्या वयाची मुले ज्या वेळेला रिकामी असत त्यावेळी शाळा भरवायला सुरुवात केली. शिवाय शाळा जवळ असली म्हणजे मुले सहज येऊ शकत, म्हणून एकदम ४ ठिकाणी शाळा सुरू केली. अर्थात प्राथमिक शाळेबरोबर बालवाडी व पाळणाघर हवेच; म्हणजे मुली व मुले बिनधास्त शाळेत येतात हा अनुभव गाठीला होताच. शिवाय शिक्षक शहरातून आलेला असला तर त्याला मुलांबद्दल प्रेम वाटत नाही, व मुलानांही तो जवळचा वाटत नाही, म्हणून आदिवासी शिकलेली मुले त्यांनी शिक्षक म्हणून नेमून घेतली. तो कमी शिकलेला असला, तरी

त्याचे परत परत उद्‌बोधन करता येईल, पण तो त्या परिस्थितीत रमून जाई.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट अनुताईंनी केली, ती म्हणजे शासनाची क्रमिक पुस्तके त्यांनी तिसरीपर्यंत वर्गासाठी लावली नाहीत; कारण त्या पुस्तकांतील धडे निराळे. उदाहरणच द्यायचं तर अगदी 'बालभारती' पुस्तकाचं देता येईल. त्यातला पहिला धडा आहे 'घर'! या आदिवासी मुलांनी झोपडी पाहिलेली. घर - कौलारू - पाहिलेलंच नाही, तेव्हा त्यांना या धड्याबद्दल कशी आत्मीयता वाटणार? अनुताईंनी या मुलांसाठी पुस्तकच लिहिले, 'वनभारती.' या पुस्तकातला पहिला धडा आहे 'दगड.' तो मुलांनी पाहिलेला, त्यामुळे त्यांना तो चटकन समजला होता. गणित शिकविण्यासाठी पाने, शंख, बिया यांचा उपयोग तर केलाच, पण प्रत्येक विषयासाठी अगदी मुलांच्या रोजच्या गरजा किंवा रोजच्या गप्पांचाच उपयोग करून घेतला. याचे उदाहरण द्यायचे तर 'गोविंददादाचा बैल आजारी पडला' या धड्याचेच घेता येईल. या एका घटनेवरून गुरांच्या दवाखान्याची आवश्यकता, माणसांच्या दवाखान्याची आवश्यकता, निरोगीपणा, स्वच्छता, आहार, विज्ञान, कितीतरी गोष्टी मुलांपर्यंत पोहोचविता आल्या. हा अभ्यासक्रम शिक्षकांना पचवता यावा म्हणून त्यांचे वर्ग घेतले. सहजशिक्षण सोपे, समवाय - वनभारती वगैरे पुस्तके लिहिली आणि हे सर्व एका जागी बसून. त्या म्हणत प्रत्येक मूल हे एक नवे पुस्तक आहे. ते जसे जसे वाचेल तसे तसे मूल कळू लागेल. प्रत्येक मुलाचे प्रेम निराळे, बुद्धी निराळी, परिस्थिती निराळी आणि हे त्यांच्या ग्रामीण मुलांबाबतच नव्हे, तर शहरी मुलांबाबतही तितकेच खरे आहे. अनुताईंनी या आदिवासी मुलांना समजून घेतलं होतं, म्हणूनच त्यांच्याशी कोणत्या पद्धतीने वागले पाहिजे याची खूणगाठ त्यांनी मनाशी पक्की बांधली होती. या नव्या प्रयोगात त्याचा प्रत्यय ठायी ठायी येत होता; म्हणूनच या शैक्षणिक प्रकल्पाचे नाव होते 'मुक्तशाळा' ही प्राथमिक शाळा संपूर्ण हसतखेळत सहजशिक्षणाच्या धोरणाने चालू आहे. तेथे तासाचे वेळापत्रक नाही, घंटा वाजत नाही, तिमाही, सहामाही, वार्षिक परीक्षा नाहीत, सहज चाचण्या घेतल्या जातात; पण त्यांचा गाजावाजा नसतो. वर्ग-फलक नाहीत. शाळा झाडाखाली भरते. पाऊस आला तर एकाद्या झोपडीत. साचेबंद शासकीय अभ्यासक्रम नाही. क्रमिक पुस्तके नाहीत. सारे कसे मोकळे मोकळे. सभोवतालच्या निसर्गाशी नाते सांगणारे. त्यामुळे शाळेत काही वेगळे असे वाटतच नाही; तरीही मुले चौथीच्या परीक्षेला बसवली जातात व उत्तम तऱ्हेने पास होता.

हे या मुक्त शाळेचं यश पाहून अनौपचारिक शिक्षणाचा फायदा किती होऊ शकतो, त्याचे प्रत्यंतर येते; परंतु त्यासाठी अनुताईसारखी खडतर तपश्चर्या करावी लागते. शासनाकडून पहिल्या इयत्तांना मान्यता घ्यावी लागते. अखंड कष्ट करणारे, समरसून जीव ओतून काम करणारे कार्यकर्ते असावे लागतात आणि चिपळूणकरांसारखे सहृदय समिक्षक मिळवावे लागतात. हे सर्व आनुताईंनी मिळवले आहे आपल्या मृदु भाषणाने, लोभस स्वभावाने आणि दुसऱ्याच्या पोटात शिरून आपल्या मनासारखे साध्य करून घेण्याच्या त्यांच्या उपजत कलेने. पैसा उभा राहातो, 'सत्य संकल्पनांचा दाता भगवान' असतो, अशी अनुताईंची श्रद्धा होती. त्यांना साथ देणारी माणसे मिळाली, पैसाही मिळाला; त्यामुळे यश लांब राहिले नाही. अनुताईजवळ कल्पकता होती. असेल त्या परिस्थितीचा उपयोग करून घेण्याची एक विलक्षण हातोटी त्यांना लाभली होती. इंदिरा गांधी यांची निर्घृण हत्या झाली तो दिवस. त्या दिवशी त्या दाभोणला होत्या. काहीतरी समारंभ होता. आता हा समारंभ स्थगित झाला, पण का? याचे उत्तर त्या आदिवासी मुलांना, नागरिकांना कसे समजून

सांगणार? त्यांना दाभोण, ऐने, बाणगाव या गावापलिकडे गाव माहीत नाही; त्यांना पंतप्रधान, दिल्ली वगैरे कसे समजणार? अनुताईंनी त्या संधीचा उपयोग करून घेतला. भारताचा नकाशा दाखवला, थोडा भूगोल, थोडा इतिहास, थोडे नागरिकशास्त्र मुलांपर्यंत पोहोचवले. असा प्रत्येक घटनेचा उपयोग करून घेणारे कितीसे शिक्षक असतात? हाच त्यांच्यातला फरक, हेच अनुताईंचे मोठेपण.

आदिवासींच्या बरोबर काम करायचे म्हणजे फक्त शिक्षणाकडे लक्ष देऊन भागत नाही, हे कोसबाडच्या अनुभवाने अनुताईंना शिकवले होते. शिक्षणापेक्षा त्यांची पोटाची भूक अधिक असते आणि आलेले तुटपुंजे भात संपले की ही माणसे जगायला जातात. मुलाबाळांना घेऊन. तेव्हा त्यांना राहत्या गावातच कामधंदा उपलब्ध करून दिला पाहिजे, हे लक्षात घेऊन तसा प्रयत्न सुरू केला आहे. या आंतरभागात जेथे रहदारीचे काहीच साधन नाही, तेथे आरोग्य-औषधे, डॉक्टर, दवाखाना यांच्याहि सुविधा उपलब्ध नाहीत; तेव्हा त्यासाठीच अनुताईंनी व त्यांच्या सहकार्यांनी प्रयत्न चालविले आहेतच. अशी 'ग्राममंगल'ची अनुताईंची कल्पना; कारण अनुताईंची निष्ठा त्यांच्यापाठीमागे आहे, त्यांचे आशीर्वाद तर आहेतच.


आपल्या आयुष्यातली ४७ वर्षे त्यांनी आदिवासींसाठी दिली आहेत. आपले घरदार, नात्याची माणसं, सगळं सोडून त्या या जंगलात जाऊन राहिल्या. गुरुची झोप मोडू नये, म्हणून भुंग्याने मांडी पोखरली तरी हूं की चूं न करणाऱ्या शिष्याची ही प्रत्यक्ष चालू काळातली प्रतिमा. हाताला 'मण्यार'सारखा विषारी साप चावल्यावर ताराताईंची - आपल्या गुरूची - झोप मोडेल म्हणून न विव्हळणारी शिष्या! त्यांच्यावरील ती अपार निष्ठाच त्यांना यश देत राहिली. सर्व मानसन्मान भोगूनही निर्लेप राहिलेली ही व्रती! दुसऱ्याला देताना हात भरभरून द्यावं. गोरगरिबांना, अडल्यानडलेल्यांना जवळ घ्यावं, कुत्री माजरंच काय, पण पावसाळयातयेणाऱ्या बेडकावरहि प्रेम करावं आणि आयुष्याच्या संध्याकाळीही सतत स्फूर्तिदायी अशा नव्या कल्पना. कराव्यात, त्या प्रत्यक्षात येण्यासाठी नवी संस्था काढावी; त्यांची मनाची शक्ति अफाट होती. हात-पाय चालत नसले तरी त्यांची कल्पना चालत होती आणि मुरवलेल्या मोरावळयाप्रमाणे आदिवासी प्रश्नांची उकल त्या सहज, आंतरिक तळमळीने आणि हृदयस्थ गोडव्याने करीत होत्या.

आज अनुताई गेल्या असल्या, तरी त्यांची अंगणवाडी आता मराठी आदिवासी राहिली नसून ती इंग्लिश, हिंदी आणि अखिल भारतीय झाली आहे. कोसबाडला उगम पावलेली ही अंगणवाडी आता शासकीय झाली आहे. कै. ताराबाई व कै. अनुताईंच्या तपश्चर्येचे फळ म्हणून, बालशिक्षणाची आवश्यकता आणि महत्त्व सर्व शिक्षणतज्ज्ञांना पटलं आहे. कोसबाडची अंगणवाडी व शासनाची अंगणवाडी यात फरक असला, तरी बालकांबद्दलची आस्था दोन्हीकडे सारखीच आहे. परिसरातील वस्तुंचा साधनेसाठी उपयोग करण्याची कल्पना अनुताईंचीच आहे. तीच कल्पना शासनाने उचलून घेतली आहे; हे एक प्रकारचे यशच आहे. अनौपचारिक शिक्षण- प्रौढ शिक्षण वगैरे शिक्षणाच्या अनेक विभागांत अनुताईंच्या सहजशिक्षणाच्या कल्पना घेतल्या आहेत. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, अनुताई गेल्या तरी त्यांनी केलेले कार्य अजरामर आहे. त्याचा उपयोग आदिवासींच्याच काय, सगळ्या भारतातील मुलांच्या शिक्षणाला होणार आहे. आज जी निरक्षर मुलांची संख्या भेडसावीत आहे, ती कमी करण्यासाठी या अनुताईंच्या कल्पनांचा उपयोग झाला, तरी त्यांचे श्रम सार्थकी लागतील, हे त्यांचे स्वप्न सत्यात आणणे हीच त्यांना अर्पण केलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

*(सौजन्य : केसरी - ४-१०-९२)*

# अनुताईंमधील संशोधक-शिक्षक

-- रमेश पानसे



विकासवाडी शबरी उद्योगालय, कोसबाड : उपसंचालक अप्पा कोसके यांना अनुताईंचे मार्गदर्शन

१९४५ सालच्या एप्रिल-मे मध्ये बोरिवलीला झालेल्या बालशिक्षणविषयक शिबिरात अनुताई सामील झाल्या आणि तेव्हा एकाच वेळी त्या ताराबाई मोडक आणि पूर्वप्राथमिक किंवा बालशिक्षण यांच्या संपर्कात आल्या. पुढे नोव्हेंबर १९४५ ला बोर्डीला ताराबाईंची 'खेड्यातील बालवाडी' सुरू झाली. ही बालवाडी सुरू होण्याच्या आधी कित्येक वर्षे ताराबाईंची, खेड्यातील बालवाडीची वैचारिक तयारी चालू होती. एक प्रयोगही मुंबईत घडून गेलेला होता. त्यामुळे बोर्डीतील प्रयोगांचा ढांचा, प्रयोगाच्या आधीच नेमकेपणाने तयार होता. परंतु, प्रयोगाची, प्रत्यक्ष हिंडून-फिरून आणि पालकांच्यात मिसळून करावयाची धावपळ करण्याचे ताराबाईंचे वय राहिले नव्हते. बोर्डीला गेल्या तेव्हा ताराबाई त्रेपन्न वर्षांच्या होत्या. त्यामुळे त्यांच्या मनातला नि कागदांवर आखलेला प्रयोग करण्यासाठी त्यांना मिळालेली अनुताईंची जोड, ही या खेड्यातील बालशिक्षणाच्या बाबतीतील महत्त्वाची घटना होती. ताराबाईंच्या तुलनेने अनुताई खूपच तरूण, म्हणजे पस्तीस वर्षांच्या होत्या.

त्यापूर्वी बारावर्षे पुण्याच्या हुजुरपागेत शिकवताना अनुताई 'शिक्षक' म्हणून नावाजलेल्या व उत्तम दर्जाच्या होत्याच. परंतु बोर्डीला त्यांना 'वेगळया प्रकारचा शिक्षक' म्हणून स्वत:ला घडवावे लागले. प्राथमिक शिक्षणाकडून त्यांना पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे वळावे लागले. शहरातील शिक्षणाकडून खेड्यातील शिक्षणाकडे त्यांना वळावे लागले. ज्यांच्या पूर्वीच्या काही पिढ्या शिकलेल्या होत्या-घरांत शिक्षणाचे संस्कार झालेले होते अशा विद्यार्थ्यांकडून, ज्यांना पूर्वसंस्कारांनी शिक्षणाचे बाळकडूच मिळालेले नव्हते अशा विद्यार्थ्यांकडे

वळावे लागले होते. एवढेच नव्हे तर "केवळ शिकवणाऱ्या" शिक्षकाऐवजी, अनुताईंना, "मुलांना आपणहून शिकण्यास शिकविण्याचा प्रयोग करणाऱ्या" संशोधक शिक्षकात आपले रूपांतर करावे लागले. आणि हे रूपांतर त्यांनी फार प्रभावी रीतीने केले यात अनुताईंचे खरे मोठेपण सामावलेले आहे.

अनुताईंना, बालशिक्षणाच्या त्यांच्या जवळ-जवळ अर्धशतकाच्या कारकीर्दीत, गरजेनुसार अनेक कार्यांचे ओझे अंगावर घ्यावे लागले. त्यांना संस्थेच्या व्यवस्थापकाचे काम करावे लागले, निधी संकलनासाठी पायपीट करावी लागली, शिक्षणपत्रिकेचे संपादन करावे लागले, त्यासाठी सातत्याने लेखनही करावे लागले. सरकारी वा बिनसरकारी समित्यांवर काम करावे लागले, व्याख्याने देत हिंडावे लागले. आणि अनेक अनाथांना सांभाळण्याचेही काम करावे लागले. पण तरीही त्यांच्या आयुष्याचे अवलोकन करणारा कुणीही एक गोष्ट मान्य करील की अनुताई, या प्रथमपासून अखेरपर्यंत स्वेच्छेने नि आनंदाने शिक्षकच राहिल्या. त्या शिक्षक म्हणूनच जन्माला आल्या होत्या; आणि आयुष्याच्या अगदी अखेरच्या वर्षातही थकलेल्या गात्रांमध्ये अंतर्गत उर्मीने उसने बळ आणून आणि संधी शोधून, बालवाडी-अंगणवाडी सेविकांसमोर शिकवण्याचा अट्टाहास करीत. शिकवीत त्या दिवशी त्या मनाने प्रसन्न असत आणि मग शरीरानेही प्रसन्न राहत.

बोर्डीला आल्यानंतर अनुताईंच्यातील शिक्षिकेला संशोधिकेचे नवे परिमाण प्राप्त झाले. खेड्यांतून, आजुबाजूच्या परिसरातून, निसर्गातून आढळणारी जवळजवळ प्रत्येक वस्तू त्यांना शैक्षणिक साधनाच्या रूपांतच दिसत असे. आणि हे साधनांचा शोध घेण्याचे, दिसेल त्यांचे रूपांतर शैक्षणिक साधनांत करण्याचे त्यांचे वेडही त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत चालूच होते. या क्षेत्रात फार पूर्वी गांधीजींनी एक मूलमंत्र ताराबाईंच्या कानात सांगितला होता; तो म्हणजे "शिक्षकांनी स्वतःच आजुबाजूच्या परिसरातून साधने निर्माण करावीत." ताराबाईंच्या कानात सांगितलेला हा मंत्र अनुताईंच्या मनात रुजला आणि आयुष्यभर अनुताईंनी या कार्याचा ध्यास घेतला होता.

अनुताईंमधील संशोधक-शिक्षकाचे खरे कर्तृत्त्व दिसून येते ते मात्र त्यांच्या प्रत्यक्ष बालवाडी चालविण्याच्या कार्यात. प्रत्यक्ष अनुभव घेणे, बालकांचे अवलोकन करणे, या दोन्हीतून शैक्षणिक निष्कर्ष काढणे आणि ते इतरांच्या प्रबोधनासाठी व उपयोगासाठी लिहून प्रसिद्ध करणे या दिशेने त्यांचे हे संशोधन कार्य चालले होते. ताराबाई मोडकांनीच एके ठिकाणी लिहिले आहे की "बालशिक्षक म्हणजे एक वैज्ञानिक असावयास हवा. वैज्ञानिकामध्ये दोन गुण असावे लागतात. प्रयोग करून पाहण्याची धडाडी व प्रयोग करण्यातील व त्याचे परिणाम ताडून पाहण्यातील प्रामाणिकपणा. अनुताईंकडे हे दोन गुण पुरेपुर भरलेले होते असेच त्यांचे कार्य पाहता आढळून येते.

ताराबाईंनी अंमलात आणलेल्या बोर्डीच्या बालवाडीला त्यांच्या दृष्टीने तर महत्त्व होतेच कारण त्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीतील तो अखेरचा प्रयोग असणार होता. परंतु इतर अनेकांचेही या प्रयोगाकडे लक्ष होते. 'खेड्यांतील बालवाडी' हा ताराबाईंच्या बालशिक्षण क्षेत्रातल्या कार्यातील अखेरचा टप्पा होता. बालशिक्षण खेड्यात नेणे ही एक फार महत्त्वाची संकल्पना होती. त्यातून, बालशिक्षण, सर्वदूर लाखो खेड्यातून पसरलेल्या बालकांपर्यंत पोचण्याचा मार्ग मोकळा होणार होता. 'श्रीमंतांची चैन' म्हणून तोवर मानले जात असलेले बालशिक्षण 'गरीबांची गरज' भागविणारे शिक्षण ठरणार होते. युगानुयुगे घट्ट झालेल्या अज्ञानांधःकाराकडून ज्ञानाच्या ज्योतीकडे जाण्याची प्रक्रिया खेड्यांतील

वंचिताच्या संदर्भात सुरू होण्याची ती नांदी असणार होती. एकूण देशाच्या शिक्षणाची दिशा बदलणारी आणि त्याकरवी देशाची दशा बदलणारी ती घटना असणार होती. आणि या एवढ्या मोठ्या गोष्टीचे यश त्या बोर्डीच्या छोट्याशा एका बालवाडी चालविण्यावर आणि ती चालविण्याचे काम 'खरा शिक्षक' होऊन करण्यावर अवलंबून असणार होते. आणि योगायोग असा होता की ही जबाबदारी अनुताईंवर पडली होती. अनुताईंनी आपल्यातील 'शिक्षका'ला 'संशोधक' बनवण्यावरच ही सारी किमया अवलंबून असणार होती. अनुताईंनी मात्र आपल्या आयुष्यातील ही सर्वात मोठी सर्वात कठीण अशी परीक्षा फार यशस्वीपणे पार पाडली.

अनुताईंनी बालवाडीतील प्रत्येक दिवसावर लक्ष केंद्रित केले आणि तिथे घडणाऱ्या लहान-मोठ्या घटनांवर घरी येऊन रवंथ केले असे दिसून येते. 'कोसबाडच्या टेकडीवरून' या आपल्या आत्मचरित्रात अनुताईंनी या काळातील काही घटनांचा उल्लेख केला आहे. पण त्या घटना वाचताना त्यामागील अनुताईंचे अवलोकन आणि अनुभवांचे झालेले विश्लेषण लक्षात येत नाही. परंतु या प्रक्रियेचे नेमके प्रतिबिंब पडले आहे ते मात्र त्यांनी 'शिक्षणपत्रिके'तून केलेल्या त्यांच्या पहिल्या-वहिल्या लेखनामध्ये. त्यांची रोजची बालवाडी कशी चालत असे, बालकांचा प्रतिसाद कसकसा असे, पुढे पुढे हा प्रतिसाद कसकसा बदलत गेला, अवलोकनांतून कोणकोणती शैक्षणिक तत्त्वे हाती लागली, अशा अनेक गोष्टी, अनुताईंच्या सुरवातीच्या काळातील लेखनांतून आपल्याला आढळून येतात.

१९४५ सालच्या नोव्हेंबर महिन्यात बोर्डीला बालवाडी सुरू करण्यात आली. ही पहिली बालवाडी, मुद्दामच हरिजन पाड्यावर सुरू करण्यात आली होती. पहिले चार-पाच महिने बालवाडीचा अनुभव घेतल्यानंतर बालवाडीत मुले आणण्याच्या अनुभवावर एक विश्लेषणात्मक लेख अनुताईंनी, शिक्षणपत्रिकेच्या एप्रिल-मे १९४६ च्या जोडअंकात लिहिला आहे. बालशिक्षणाच्या कार्यात उतरल्यानंतरचा हा त्यांचा पहिला लेख. हरिजनांची मुले, गावातील इतर मुले आणि आदिवासी मुले या सर्वांच्या बाबतीत एकच अनुभव आला की, "लहान मुले आपल्या घराचे अंगण सोडून फार दूर जावयास तयार नसतात, खाऊ, खेळ, गाणी यांचा त्यांच्यावर फारसा परिणाम होत नाही. त्यांना कोणत्याही एका ठराविक वेळीच आणि सर्वांना एकदम बालवाडीत यायला आवडत नाही. थोडक्यात सर्व मुलांना एकच वेळ सोयीची वाटत नाही.

मुलांना बोलवायला जायचा अनुभवही अनुताईंनी सविस्तर मांडला आहे. प्रत्येक मुलाच्या घरासमोर, मूल तयार होईपर्यंत थांबावे लागते; तोवर बरोबर जमलेली मुले चालून, उभी राहून थकतात किंवा कंटाळतात. मुलांना इतरांसाठी फारच रखडावे लागले तर दुसऱ्या दिवशी ती यायला कंटाळतात. यावर अनुताई उपाय सुचवितात की, त्याच विभागातील कुणीतरी जवळ जवळची चार-पाच मुले एकत्र बालवाडीत आणून सोडावीत म्हणजे ही रखडपट्टी वाचेल.

परंतु पालकांविषयीचे अनुभव वेगळेच आहेत. आदिवासींची मुले एकटीच वाढत असतात. आई-बाप दिवसभर कामावर जातात आणि मुले शाळेत गेली काय वा न गेली काय, याबाबत ते उदासीन असतात. या उलट हरिजनवाड्यातील मुले फारच लाडकी असतात. त्यामुळे "ती येत नाहीत तर आम्ही काय करावे." अशी पालकांची वृत्ती. त्यांनाही शाळेबद्दल काहीच वाटत नाही; उलट मुलांना बाटवतील, तुरुंगात घालतील वगैरे प्रकारची भीतीच त्यांच्या मनात असते. त्यामुळे त्यांचा

विश्वास संपादन करणे कठीण जाते. इतर पालकांच्या मनातही या नवीन पद्धतीच्या शाळेविषयी शंका असल्याचे, अनुताई, लिहितात. शिवाय सर्व तऱ्हेच्या मुलांमध्ये मिसळून आपली मुले बिघडतील असेही त्यांना वाटत असायचे. चांगल्या सुशिक्षित पालकांनाही, "आतापर्यंत बालमंदिर नव्हतं, तेव्हा कुठे आमचं अडलं? होतील जरा मोठी मुले नि जातील शाळेत. आत्तापासून कशाला त्यांना रडवायचं" ही विचारसरणी. अनुताई लिहितात की, "बालमंदिराचं महत्त्व पटवण्याकरता असंच काम करीत राहिलं पाहिजे. वर्षा-दोन वर्षांनी उलट अनुभव येईल असे वाटते." अशाप्रकारे अनुभवांचं संकलन, विश्लेषण व मग सामान्यीकरण, अनुताई, पुढेही करीत राहिल्या.

ताराबाई मोडकांनी 'अंगण-बालवाडी'चा प्रयोग सुरू केला तोही अनुताईंच्या हातूनच. ग्रामबाल शिक्षा केंद्रात काढलेल्या बालवाडीत काही भागातली मुले येत नसत. त्यांच्यासाठी त्यांच्या अंगणातच मुलांना गोळा करून, १९४५ च्या डिसेंबरमध्ये एक बालवाडी सुरू केली; हीच 'अंगण-बालवाडी.' आत्ताची अंगणवाडी. पहिली अशी अंगणवाडी बोर्डीच्या खाऱ्या तलावाच्या एका कोपऱ्यात वसलेल्या आदिवासींच्या वस्तीत सुरू झाली. अनुताईच ती चालवत होत्या. त्यांनी त्या वस्तीस 'हलपती निवास' आणि बालवाडीस 'कमल बालवाडी' किंवा 'कमल वाडी' असे नाव दिले. कारण ही बालवाडी कमळाने फुललेल्या तलावाच्या काठी, आदिवासींच्या अंगणात, चिंचेच्या झाडाखाली चालविली होती.

अनुताईंनी या कमलवाडीचे अनुभव फारच वेगळ्या तऱ्हेने आपल्यापुढे मांडले आहेत. त्यांना वाङ्मयरूप देऊन कथानक-प्रधान कवितेच्या रूपाने हे अनुभव प्रकट होतात. एप्रिल १९४७, जानेवारी १९४८, फेब्रुवारी १९४८ अशा शिक्षणपत्रिकेच्या अंकांतून त्यांच्या कमलवाडीवरील कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. पहिल्या कवितेत, ते कमळांचे तळे, तेथील झोपड्या, तेथील 'दुबळा' जमातीचे लोक, त्यांचे रोज कामावर जाणे, आणि 'बिचाऱ्या लहान मुलांचे घरी एकटे खेळणे' यांचे वर्णन केले आहे. पुढे या मुलांचे दैनंदिन जीवन सांगून तेथे सुरू केलेल्या बालवाडीचेही दैनंदिन जीवन सांगितले आहे.

"............... त्यांना कोणी दात घासायला शिकवीत नाही

त्यांना कोणी केस विंचरायला शिकवीत नाही.

त्यांना कोणी आंघोळ करायला शिकवीत नाही.

त्यांच्या अंगावर कपडा पण
फारच थोडा असतो,
तोही मळका अन् फाटका.

त्यांच्या आईबापांना पैसा फारच थोडा मिळतो.

म्हणून त्या मुलांना पुरेसे खायला मिळत नाही.

म्हणून त्या मुलांना दूध मिळत नाही.
म्हणून त्या मुलांना कपडे मिळत नाहीत.
अशी ही लहान मुले.
दिवसभर धुळीत रमतात.
कमळकाकडी खातात.
रानातील झाडावरची कच्ची फळे खातात.
पक्षांना मारतात.
मासे पकडतात.
जनावरांच्या पाठीमागे धावतात.
असा दिवसभर काहीना काही
उद्योग चालतो.

असे मुलांच्या परिस्थितीचे व दिनक्रमाचे सविस्तर व सरळ वर्णन झाल्यानंतर अनुताई, तेथे काढलेल्या अंगण-बालवाडीचे वर्णन करतात:

आम्ही एक दिवस तेथे गेलो.
आम्हाला आवडली ती मुलं.
आम्ही तेथेच बालवाडी काढली.
तिचे नाव कमलवाडी.

एका लहानशा अंगणात आम्ही बसतो.
अंगण अगदी स्वच्छ असते.
मुलेच झाडतात.
मुलेच सारवतात.
मुलेच पाणी आणतात.
सारं काही मुलेच करतात.

मग मुले केस विंचरतात.
हातपाय धुतात.
कधी कधी आंघोळपण करतात.
कशी स्वच्छ स्वच्छ होतात.

मग सगळे मिळून छान छान गाणी म्हणतो.
छान छान गोष्टी सांगतो.
मजेचे खेळ खेळतो.
सुंदर रांगोळ्या काढतो.
मातीची चित्रे बनवतो.
खूप मजा करतो.
मग थोडा फराळ करतो.
'जय जय' करून घरी येतो.

............

कमलवाडीचे दैनंदिन कार्यक्रम सांगताना, स्वच्छतेच्या कार्यक्रमाचे, अशा प्रकारच्या बालवाडीत असणारे महत्त्व, अनुताईंनी आवर्जून सांगितले आहे. पुढे पुढे तर या खेड्यातल्या बालवाडीत आंघोळ हाच एक सुरुवातीचा अतिशय महत्त्वाचा कार्यक्रम होऊन बसला. अनुताईंच्या कमलवाडीवरील दुसऱ्या कवितेत, आंघोळीचे महत्त्व आणि बालवाडीतील आंघोळीच्या कार्यक्रमाचे स्वरूप सांगितले आहे.

चला आमच्या कमलवाडीत.
आम्ही येथे रोज येतो.
आंघोळीच्या गोष्टी सांगतो.
आंघोळीची गाणी म्हणतो.
छान छान आंघोळ करा,
स्वच्छ स्वच्छ व्हा,
असे रोज सांगतो.

पण मुलांना भीती वाटते.
म्हणतात, "मी नाही आंघोळ करणार."

एकदा आम्ही फिरायला गेलो.
नदीच्या काठाकाठाने गेलो.
सगळी मुले बरोबर होती.

नदीत एक बगळा उभा होता.
पांढरा पांढरा शुभ्र.
मी म्हटले, 'बगळा किती स्वच्छ !
रोज आंघोळ करतो.'
नदीत एक बदक पोहत होते.
मी म्हटले, 'बदक किती स्वच्छ !
रोज आंघोळ करतो.'
बगळा नि बदक स्वच्छ असतो.
त्यांना खरूज होत नाही.
सोमली एकदम म्हणाली,
'आज तर मी आंघोळ करणार'
नि शिरली पाण्यात.
डाही पाण्यात गेली.
'मी पण आंघोळ करणार.'
काळू पाण्यात गेला.
'मी पण आंघोळ करणार.'
सर्वांनी पाण्यात उड्या मारल्या.

हात घासले, पाय घासले.
पाठ घासली, पोट घासले.
चोळून चोळून केस धुतले.
नाक, डोळे, कान स्वच्छ केले.
सगळेजण स्वच्छ झाले.
सगळेजण सुंदर दिसू लागले.

'आता मी रोज आंघोळ करणार'
एकजण म्हणाला.
'आता मी रोज आंघोळ करणार'
दुसरा म्हणाला.
'आता आम्ही रोज आंघोळ करणार'
सगळे म्हणाले.
फराळ करून घरी आलो.
कशी मजा झाली !

कविता सरळ आहे. पण मनात ठसते ती आंघोळीचे महत्त्व मुलांना पटविण्याची अनुताईंची हातोटी. रोज सांगूनही, गोष्टी-गाणी घेऊनही मुलांच्या मनावर ठसत नव्हते ते, आंघोळीचे महत्त्व बगळा आणि बदक यांची आंघोळ पाहून, स्वच्छ शुभ्रता पाहून मुलांच्या मनावर ठसले. त्यातही, बगळा-बदकाला खरूज होत नाही, ही गोष्ट चटकन् मनाला भिडणारी. कारण, आमच्या आदिवासी मुलांची खरूज ही जन्मापासूनची साथी. त्याच्या वेदना सोसतच मुले वाढत असतात. त्यामुळे आंघोळ केल्याने खरूज होणार नाही, ही रामबाण गोष्ट. आता प्रत्येकजण रोज आंघोळ करायला तयार होतो.

तिसऱ्या कवितेत अनुताईंनी, रानातली सहल वर्णन केली आहे. मनसोक्त भटकणे, बोरे खाणे, गुंजा गोळा करणे ही सगळी आवडीची कामे. मग मुलांना जे करायला आवडते तेच त्यांच्याबरोबर जाऊन करणे ही शिकविण्याची पद्धत अनुताईंनी अवलंबलेली. या कवितेत या सहलीचे वर्णन करून, 'आवडत्या उद्योगांत शिक्षण' कसे करायचे, याचा फार चांगला पाठ अनुताईंनी अखेरीस दिला आहे.

................
आले एकदाचे बोरीचे झाड.
भराभर सगळी झाडावर चढली.
बोरे खिशात भरू लागली.
बोरे खाली टाकू लागली.
खूप बोरं गोळा केली.
तेथेही नदी होतीच.
नदीवर गेलो.
हातपाय धुतले.
पाने आणली.
स्वच्छ पुसली.
सर्वांना बोरे दिली
...............
...............
गाणी म्हटली गोष्टी सांगितल्या
रमतगमत घरी आलो
आहे की नाही गम्मत ?

बालवाडीतील कार्यक्रमांची, त्यांच्या शैक्षणिक महत्त्वाची नकळत माहिती पुरवणारी कविता, पुढेही अनुताईंनी लिहीली आहे. परंतु या सुरुवातीच्या प्रयोगांच्या काळात, अनुताई विविध अंगांनी आपल्या अनुभवांकडे पाहत होत्या. प्रत्यक्ष काम करण्याचे क्षेत्र संशोधनाचे होते. याची त्यांना प्रथमपासून जाणीव होती. आपले काम बालवाडीचा उत्तम नमुना निर्माण करण्याचे आहे; पथदर्शी आहे, त्यामुळे प्रत्येक अनुभवाचे, अडचणीचे विश्लेषण करीत आपल्याला पुढे जायचे आहे याची पुरेपुर जाणीव ठेवून त्या रोजच्या कामाची सविस्तर दैनंदिनी लिहीत असत. त्यातील मोजके अनुभव त्यांना शिक्षणपत्रिकेतून वेळोवेळी प्रसिद्ध केले आहेत. अशी एक रोजनिशी अनुताईंनी लिहिली आहे. ती 'बुनियादी तालीम शाळे'ची.

महात्मा गांधींच्या १९३७ सालच्या वर्धा योजनेनुसार, बुनियादी तालीमचा प्रयोग, ग्रामबाल शिक्षा केंद्राने काही काळ चालविला होता. त्यावेळच्या लोकलबोर्डाकडून 'हरिजन शाळा' या नावाची एक स्वतंत्र शाळा बोर्डीमध्ये चालविली जात होती. ती शाळा प्रयोगासाठी श्रीमती ताराबाई मोडक यांनी एक फेब्रुवारी १९४७ पासून ताब्यात घेतली होती. त्या शाळेचे दैनंदिन काम अनुताईंकडे सोपविण्यात आले होते. तेथील अनुभवांची सविस्तर नोंद अनुताई रोजनिशीत करीत असत.

शिक्षणपत्रिकेत, रोजनिशीची काही पाने तीन लेखांतून प्रसिद्ध केलेली आहेत. पहिल्या लेखात शाळेच्या अवलोकनाचा पहिला दिवस आणि पुढे दर आठवड्याची तपशीलवार नोंद आली आहे. एक महिना झाल्यानंतरचे 'सिंहावलोकन' दुसऱ्या लेखात तर वर्षानंतरचे मूल्यमापन तिसऱ्या लेखात आले आहे. या वर्षभराच्या काळात, मुले समजावून घेण्यासाठी, त्यांना बदलण्यासाठी, त्यांना नवशिक्षणाच्या सहाय्याने संस्कारीत करण्यासाठी आणि बुनियादी तालीमचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी, अनुताईंनी केलेल्या खटपटीचा, अवलोकनाचा, विचारांचा, उपायांचा आलेख आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

ज्या दिवशी शाळा त्यांच्या ताब्यात यावयाची होती. त्या दिवसापर्यंत म्हणजे १ फेब्रुवारी १९४७ च्या सकाळपर्यंत, अनुताई या शाळेविषयीची अनेक 'दिवास्वप्ने' पाहत राहिल्या होत्या. तिथे काय काय, व कसकसे करायचे ते ठरवत होत्या. अखेरीस तो दिवस उजाडला. अनुताई लिहितात,

"बरोबर अकरा वाजता मी शाळेत गेले. दहाबारा मुले ओळीने आसने अंथरून त्यावर चूपचाप बसली होती. त्यांचे कपडे फाटके तुटके व भलतेच मळलेले होते, पण चेहऱ्यावर एक प्रकारची टवटवी होती. मी वर्गात शिरताच एक प्रकारचे औत्सुक्य, आदर, आश्चर्य यांनी त्यांचे डोळे चमकू लागले. मलाही कसलातरी अननुभूत आनंद होत होता..."

पुढे अशा शाळांतून जे नित्य घडत आले होते तेच घडले. मास्तरांनी पाढे लिहावयास सांगितले. येत नाही त्याला दरडावून लिहावयास सांगितले. तो मुलगा थरथरू लागला. शिक्षेच्या भीतीने "त्याने आपली केविलवाणी नजर मास्तरकडे लावली." अनुताईंनी म्हटले आहे, "त्या नजरेत ओथंबणारी करुणा आत्ताही माझ्या समोर जशीच्या तशी उभी आहे."

अनुताईंनी मुलांना, पुढे कोणीही, कधीही त्यांना मारणार नाही, याचे आश्वासन, पहिल्याच दिवशी दिले. आणि आठवड्याभरातच, अनुताईंना, या आश्वासनाच्या परिणामाचा अनपेक्षित प्रत्यय आला. "नव्या राज्यात आपणास छडीचा प्रसाद मिळणार नाही. हे मुलांनी तेव्हाच ओळखले; आणि आत्तापर्यंत शिक्षेच्या जेरबंदांनी आवळून ठेवलेली त्यांची मने बेताल उधळली. या आठवड्यात त्यांच्या मस्तीला जणू ऊत आला आहे. वाटेल तसे गाणे, उड्या मारणे, उलटून उत्तरे देणे, घरी पळून जाणे पण शाळेच्या बाहेरही परत येऊन सतावणे वगैरे नाना प्रकार चालले होते. आणि ते सर्व पाहून मती गुंग होण्याची वेळ आली."

मग अर्थातच् अनुताईंना यावर उपाय शोधावा लागला. अनुताईंनी, मुलांची मने श्रमकामांत गुंतवण्याचे ठरवले. शाळेशेजारी दोन ओटे मुलांच्या मदतीने बांधावयास काढले. मुले त्यात थोडीशी रमलीसे दिसले. अनुताईंनीही मनात अशा कामांची यादी करून ठेवली. पण आयांकडून तक्रारी येऊ लागल्या, "हे काय् ! आमची मुले गवंडी आहेत की मजूर?" अनुताईंनी दुर्लक्ष केले.

आठवड्याच्या मेहनती कामानंतर अवलोकन केले. त्याचे सार त्यांनी स्पष्ट शब्दात लिहिले आहे; "असे आढळून आले की, ही मुले अतिशय बेजबाबदार आहेत. कसलेही वळण त्यांना नाही; दुसऱ्याविषयीचा विचार त्यांच्या मनात कधीच येत नाही; प्रेम, आदर, दया या मृदू भावना कोण जाणे यांच्या हृदयाच्या कोणत्या कप्प्यात दडून बसल्या आहेत! शिवीगाळ करणे व एकमेकांस मारणे हा यांच्या हातचा मळ (केवळ) विध्वंस ! काय कारण असेल या सर्वांच्या मुळाशी?......" अनुताईंमधील 'शिक्षिके'ने, याचा दोष मुलांना देऊन किंवा तो त्यांच्या पालकांच्या माथ्यावर

लादून स्वस्थ बसणे स्वीकारले नाही. त्यांच्यातील संशोधकास त्यांनी जागे केले. त्यास शोध घ्यायला लावले. समोर उभा राहिलेला प्रश्न तसाच सोडून द्यायचा नाही ; त्याचा मुळापासून शोध घ्यायचा. आपल्याजवळच्या ज्ञान-साधनांच्या सहाय्याने त्यावरील उपाययोजना करावयाची हे संशोधक-शिक्षकाचे खरे कार्य. अनुताईंची या दिशेनेच विचाराला गती मिळाली. "पूर्वी मी बुनियादी तालीम (व) मॉंटेसोरीपद्धती, या दोहोंचा समन्वय करून कसे शिकविता येईल वगैरेंचा विचार करण्यात व नव्या नव्या योजना मनात ठरविण्यात वेळ घालवीत असे, पण आता असे सारखे वाटते की, या मुलांचे संस्कार प्रथम बदलले पाहिजेत." अशा प्रकारे उत्तराच्या शोधांतून एक नवाच प्रश्न, नवाच पेच अनुताईंनी स्वत: समोर उभा केला. मुलांना "प्रथम सुसंस्कृत करावयाचे की सुशिक्षित करावयाचे ?" आणि जर दोन्हीही बरोबरच करायचे असेल तरीही मग त्यात भर कशावर द्यावा, प्राधान्य कशाला द्यावे याविषयीचा विचार अनुताई करू लागल्या. आणि मुलांच्या वर्तणुकीचे मूळ शोधण्यासाठी त्यांनी मुलांच्या घरच्या परिस्थितीचे अवलोकन करायचे ठरवले.

या सर्व शैक्षणिक प्रक्रियेत अनुताईंचा प्रमुख भर होता तो काळजीपूर्वक केलेल्या अवलोकनावर. बालवाडीत, मुलाच्या अंत:प्रवृत्ती शोधण्यासाठी व्यक्तिगत अवलोकन करावे लागते. परंतु मागासलेल्या समाजाच्या प्राथमिक शाळेत दिसून येणाऱ्या सांघिक वर्तणुकीचा वेध घेण्यासाठी शाळेतील व्यक्तिगत वा सांघिक अवलोकन पुरेसे नसते. या मुलांच्या घरची परिस्थिती, घरचे संबंध, सामाजिक वृत्ती आणि स्थिती यांचे अवलोकन बारकाईने करावे लागते हाच धडा आपल्याला अनुताईंच्या अनुभवांतून मिळतो.

घर आणि शाळा अशा दोन्ही ठिकाणी मुलांचा अभ्यास करून अत्यंत अभिनव अशी उपाययोजना शोधून काढली. मुलांच्या उद्यमशीलतेला एकीकडे वाव देऊन दुसरीकडे सृजनशील सृष्टीबद्दलच्या मुलांच्या नाजूक भावनांना आवाहन करण्याचा प्रयोग त्यांनी सुरू केला. मुलांना समुद्रावर नेऊन काही मासे पकडून आणले व जलघरात ठेऊन त्यांची काळजी घेण्याचा व्यवसाय मुलांना दिला. मडक्यांतून बी पेरून त्याला रोज पाणी घालण्याचे काम मुलांना देण्यात आले. "मुले हौसेने त्याला पाणी घालतात, त्यांचे निरीक्षण करतात व चित्रेही काढतात. अशातऱ्हेने यांच्या लुप्त मृदुभावना बाहेर काढण्याचा प्रयत्न चालू आहे व तो यशस्वी आहे, असे म्हणावयास हरकत नाही." असा अनुताईंचा निष्कर्ष आहे.

अशाच आणखी एक-दोन गोष्टी, मुलांच्या स्वभावात बदल घडवून आणण्यासाठी करण्यात आल्या. दर शनिवारी झेंडावंदन करून मग कुठेतरी सहलीस जाण्याची पद्धत अनुताईंनी हेतूपूर्वक सुरू केली. याचा मुलांवर होत असलेला परिणाम अनुताईंनी नोंदवून ठेवला आहे. "दर शनिवारी आम्ही झेंडावंदन करतो. शाळेचे आवार हे आपले आहे, ते स्वच्छ ठेवले पाहिजे ही भावना यामुळे मुलांच्यात थोडी थोडी निर्माण झाली. थोडावेळ शांतपणे शिस्तीत उभे राहण्याइतका संयमही त्यामुळे त्यांना शिकावा लागला." विटांचा कारखाना पाहायला नेणे, त्याविषयी गप्पा मारत मुक्तपणे भटकणे या साऱ्यांतून, अनुताईंच्या म्हणण्याप्रमाणे, "एक प्रकारचा अपूर्व आनंद व काहीतरी नवे मिळाल्याच्या विजयाची भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होती. पूर्वीची शिव्यागाळीची व मारामारीची खुमखुमी बरीच जिरल्यासारखी दिसते. व्यवस्थितपणा व स्वातंत्र्य यांचा अनुभव आज त्यांनी चाखला होता व तो त्यांना मधुर वाटला."

या विविध विचारांचा व प्रयोगांचा परिणाम

काय होत होता ? अनुताईंनी एक महिन्यानंतर सिंहावलोकन केले आहे. अनुताई लिहितात की, "आज पुरा महिना झाला शाळा माझ्या ताब्यात आली आहे. सिंहावलोकन झालेच पाहिजे. इतक्या दिवसांत शाळेत अभ्यास काय घेतला ? शून्य ! लेखन ? शून्य ! वाचन ? शून्य ! गणित ? शून्य ! शून्यच आहात झालं ! थांबा, एकदम शेरा पसार करू नका. या महिन्यात कापूस पिंजून पेळू बनवण्याचा कारखानाच जणू शाळेत चालू होता. सकाळी डोळे चोळीत चोळीतच मुले येत, "अनुताई, चावी आणे' कापूस तोलून घ्यावा, पिंजावा, पेळू करावे व टकळीवर सूत काढावे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकच ध्यास ! आंघोळीला, चहाप्यायला, जेवायला बळेच घरी पाठवावे, तेव्हा जात. बाकी सारा वेळ शाळेत अगर अनुताईंच्या खोलीत मुक्काम ! या महिन्यात अर्धा शेर सूत टकळीवर कातून झाले. ज्यांना कसेबसे दहापर्यंतच अंक येतात, तीही एक दहा, दोन दहा, या रीतीने आपले किती वार झाले ते मोजीत असतात. कापूस असा सुरेख पिंजतात, की बघतच राहावे. मला तरी वाटते की, माझ्या मुलांनी पुष्कळच काम केले आहे. परीक्षक, निरीक्षकांनी वाटेल तो शेरा द्यावा."

यानंतर याच लेखात, अनुताईंनी वैयक्तिक विद्यार्थ्यांची काही उदाहरणे देऊन, त्यांच्या गुंड, मस्तीखोर स्वभावात, अल्पप्रमाणात का होईना पण कसे परिवर्तन झाले आहे ते दाखवून दिले आहे, व त्यावरून निष्कर्षही असा काढला आहे की, "बुद्धीस अपुरे खाद्य हेच मस्तीचे कारण."

यानंतरचा रोजनिशीतील लेख आहे तो वर्षानंतरच्या मूल्यमापनाचा. ते अतिशय स्वच्छ आहे. अनुताईंच्या शब्दातच ते देणे इष्ट ठरेल. "म्हणता म्हणता वर्ष झाले, पाठीमागची हरिजनांची म्हटली जाणारी शाळा पूज्य ताईंच्या देखरेखीखाली आली. त्यात काही प्रगती झाली काय ? मागे वळून पाहिले पाहिजे. अगदी पहिल्या दिवसाचे ते शाळेचे चित्र ! अतिशय घाणेरडी, गैरशिस्त, क्रूर असेच त्या मुलांचे मी वर्णन केले होते ना ! त्या मानाने पाहता हल्ली ती कितीतरी स्वच्छ दिसतात. खरूज वगैरे पुष्कळच कमी आहे. आंघोळी बहुतेक रोज करतात. निदान हातपाय तोंड पुसून येतात. नीट एका जागी बसून ऐकणे, बोलणे काही करणे याचीही संवय झाली आहे. आणि पुष्कळ सामाजिक भावना निर्माण झाली आहे." आणि "थोडावेळ सुद्धा शांत न बसणारी, वाचता मुळीच न येणारी ही मुले दर शनिवारी लहान लहान संभाषणे करतात, कविता म्हणतात आणि तास दीडतासाचा कार्यक्रम करू शकतात. ही प्रगतीच म्हणायची ! मुली तर नाव घेतलं की मागे पळत असत. त्याऐवजी आता गर्बा व अभिनय गीत गाऊ लागल्या आहेत. मधमाशांचे कौतुकाने निरीक्षण करणे, झाडांची जोपासना करणे वगैरे आवडीने चाललेले असते. ५/६ जण चरख्यावर सूत काढतात. टकळीवर तर सर्वच काढतात......"

शिक्षकाने विद्यार्थीभिमुख असणे म्हणजे काय ते अनुताईंच्या या बोर्डीच्या शैक्षणिक प्रयोगांच्या रोजनिशीवरून नीटपणे ध्यानात येते. शिकवण्याची पठडीबद्ध पद्धत स्वीकारणारा शिक्षक विद्यार्थ्याला सुशिक्षित बनवू शकेल पण सुसंस्कृत बनवू शकत नाही हाच अनुताईंच्या प्रयोगातून नि अवलोकनांतून सहजपणे निघणारा निष्कर्ष आहे. समाजाच्या आजच्या स्थितीकडे पाहिले असता, माणसाच्या मुलाला सुसंस्कृत बनविण्याचे महत्त्व किती अनिवार आहे हे कुणासही मान्य होईल.

ताराबाई मोडकांच्या मार्गदर्शनाखाली अनुताईंनी संशोधक-शिक्षिका म्हणून केलेले हे कार्य शिक्षण शास्त्राला त्यातील शिक्षणपद्धतीत महत्त्वाची भर घालणारे आहे हे निर्विवाद !

# "साधी राहणी उच्च विचारसरणी"

— डॉ. शीला रसिक शाह

सभ्यतेचे महानतेचे लक्षण आहे साधी राहणी. जगातील महान व्यक्तींचा आदर्श 'साधी राहणी उच्च विचारसरणी' हाच होता अन् आहे. आपल्या कर्तव्य पथावर चालत असता माझ्या अनुआईनं हाच मार्ग अवलंबिला होता. खरं म्हणजे साधेपणा अवलंबण्याचा हाच मूळ उद्देश असतो की कार्यक्षमता वाढवून जास्तीत जास्त कार्यरत राहणे. जास्त काम करणे केव्हा शक्य होईल? जेव्हा श्रम-समय आणि मनोबल या सारख्या अमोल संपत्तीचे रक्षण होईल. अर्थात याचा अर्थ हा नव्हे की प्राचीन मागासलेले जीवन जगावे. तसे केले तर वैज्ञानिक प्रगतीला काही अर्थच राहणार नाही. साधी राहणी वस्तुच्या उपयोगाचे महत्त्व कमी करीत नाही तर दृष्टीकोनात बदल घडवून आणते. साधन-सामग्रीचा उपयोग केव्हा कसा करायचा हे ठरविते.

अनुआईला टी.व्ही. पाहण्यात रस नव्हता. पण आपल्या विद्यार्थ्यांना योग्य ते कार्यक्रम दाखवण्याची दक्षता घेत, पाहण्याची परवानगी त्या देत. पांढरी साधी साडी, ब्लाऊज हा त्यांचा पोशाख. कोणत्याही प्रकारचे आभुषण त्यांच्या अंगावर नव्हते. घड्याळ ही अत्यंत आवश्यक वस्तू म्हणून तेवढेच मनगटावर होते, तेही साधेच. कोणत्याच सौंदर्य साधनाची लालसा त्यांना नव्हती.

वस्तुत: साधी माणसंच सामाजिक विकासात योगदान देऊ शकतात. मग म. गांधी वा विनोबा, सरदार पटेल वा जयप्रकाश नारायण असोत, अनुआईंनी अशाप्रकारचेच योगदान दिलं होतं. दिवस-रात्र त्यांना ग्राम-बाल शिक्षणाचाच ध्यास होता. आदिवासींच्या कामा शिवाय, त्यांच्या हिता शिवाय त्यांना दुसरे काम रुचलेच नाही. पचलेही नाही. मग त्यांचे शिक्षण असो, सामुहिक विवाह सोहळा असो, त्यांचे कायदेशीर हक्क असो वा पोटा-पाण्याचा प्रश्न असो. आणि म्हणूनच महत्वपूर्ण आणि अमोल-अविस्मरणीय असे शिक्षण क्षेत्रातील काम त्या करू शकल्या.

ग्रामबाल शिक्षण केंद्राने मूर्त स्वरूप धारण केल्यावर त्यांनी सावित्री, स्त्रीशक्ती जागृती आणि डहाणूची 'मूक बधीर मुलांची संस्था' स्थापन केली. आणि त्या नंतर एकदम झेप घेतली सत्तरीच्या पुढील या तरुण म्हातारीनं ती 'दाभोणच्या ग्राममंगल' प्रकल्पाकडे. या मनानं तरुण असलेल्या असामान्य स्त्रीची अजून किती तरी उमेद होती, जिद्द होती, योजना होत्या, कांही कागदावर तर काही मनातच राहिल्या. मला म्हणायच्या "शीला थोडा धीर धर तुला गुंतविणार आहे एका कामात." शेवटपर्यंत मला मात्र ते काम कळलेच नाही. मला वाटतं 'वृद्धाश्रमाची' त्यांची योजना असावी. पण नियतीच्या मनात कांही वेगळेच होते. अहो माणूस योजतो एक आणि नियती...?

देहाचे चोचले पुरविण्याची प्यास-भूक त्यांना नव्हतीच. अशा गोष्टी महामानवच करू जाणे. रोजच्या व्यावहारिक जीवनात त्या मीतृव्ययी आणि अल्पभोक्ता होत्या. जेवणाला नांवं कधी त्यांनी ठेवलंच नाही. गेली कितीतरी वर्ष त्या मिरचीला स्पर्शही करत नव्हत्या. 'अन्न हे परब्रह्म' असं त्या म्हणत. दोन घास भुकी तो सुखी असही त्या सांगत. गरजा वाढविल्या की त्या वाढतच जातात. हाव सुटत जाते. संतोष-समाधान मिळतच नाही. अन् मग व्यक्तीगत जीवनाला झळ तर लागतेच. पण सामाजिक जीवनाचाही नाश होतो. गरजांच्या पूर्ततेसाठी साधनांचा पसारा वाढवितो आणि मग मूळ कामाकडे मात्र दुर्लक्ष होते. प्रगती त्यात होतच नाही. गरजांवर अंकुश नसेल तर मुख्य काम मुंगीच्या वाटचालीनेच होते.

जीवन घडविण्याला सात्विक आहार महत्वाचा आहेच! अमूक एक षोक त्यांना होता हे हि नाही सांगता येणार. नाटक-सिनेमाचे वेडनसले तरी चांगले नाटक संस्थांच्या मदतीच्या मिषानं त्या पहात. एरव्ही त्यांना चांगले नाटक पहाण्यास कामापुढे वेळ नव्हता.

एकमात्र खरं की रात्री आम्हा सर्वांच्या मनोरंजनासाठी एखादा तास पत्याचा डाव मांडण्याचा मात्र आग्रह करीत. संस्थांच्या कामासाठी प्रवासही करावा लागला पण तो शानशौक म्हणून नव्हे.

नजरेसाठी चष्मा हवाना मग त्याची गोल्डन फ्रेम कशाला? काचेतून पहाणार की फ्रेम मधून? पेनची रीफील-नीब बरी आहेना मग 'पारकरचं' पेन वा सुंदर पेन कशाला? अक्षर बरं आलं म्हणजे झालं. प्रत्येक वस्तुच्या बाबतीत असं होतं. स्वत:साठी त्यांनी कोणाला दुखवलं नाही की त्रास दिला नाही. मांजरीलाही साधी थप्पड दिली नाही. असे मुलायम अंत:करण होते त्यांचे.

*(पान ५१ वर)*

*(पान २५ वरून)*

असेच. कारण प्रत्येक उपक्रमाचा बालकांबरोबर त्यांच्या पालकांवरही प्रभाव पडला पाहिजे, तरच त्यांचे मुलांच्या विकासाकडे लक्ष लागेल अशीच त्यांची धारणा होती. अशा या आमच्या अनुताई त्यांच्या जवळ मोठमोठ्या पदव्या नव्हत्या, की भारून टाकणारे व्यक्तिमत्व किंवा वक्तृत्व नव्हते पण आयुष्यभर केलेल्या कामाची मिळविलेल्या अनुभवाची शिदोरी होती, त्यामुळेच त्यांना लोकमान्यता मिळाली. शासनालाही 'पद्मश्री' साठी त्यांचा विचार करावा लागला. जादुगार जसा आपल्या पोतडीतून निरनिराळया जादू दाखवून लोकांना भारून टाकतो तसेच अनुताईंचा एकेक शब्दसुद्धा कायमचा लक्षात ठेवावा असा असे. परत कसलेही छूमंतर न करता, अनुताई गेल्या. आदिवासींची आईच गेली. बालशिक्षणाच्या क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली. आता नविन काही सुचले तर कुणाला सांगायचे? हा प्रश्न सतत डोळ्यांसमोर पिंगा घालतो. या सर्वापेक्षा एक जवळचे आपले माणूस गेले ही भावना अधिक महत्वाची. घरातली सर्व कुटुंबाची नस ओळखून वागणारी आई गेली तर ते घर कसे भकास होते. कळाहीन होते. तशीच अवस्था बालशिक्षणाच्या क्षेत्राची झाली आहे.

(पान ५० वरून)

सतत कामात मग्न रहाणे, वाचणे वा वाचून घेणे, लिखाण करणे, पत्रोत्तरे देणे अन् संस्थेच्या भविष्यकालीन योजनांचे आराखडे तयार करणे यात त्या मशगुल असत. पहाटे चार वाजता त्यांचा दिवस सुरू होई.

एखादा तास इशचिंतन झाले की संस्थेचे काम सुरू ते अकरा- साडे आकरा पर्यंत. नंतर स्नान-पूजा-भोजन किंचीत् वामकुक्षी की पुन्हा काम सुरू. बालसेविका वर्ग, डी. एड. इ. वर तासिकाही घेत.

साधी राहणी व्यक्तीच्या जीवनात उपयोगी असतेच पण सामाजिक सुरक्षिततेसाठी अत्यंत जरूरी आहे असंच त्या म्हणायच्या.

लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण ....! असं त्यांच नव्हतं. आधी आचरिले मग सांगितले. साधी राहणी उच्च-विचारसरणी हवी असंच त्या म्हणायच्या. अशा माझ्या महान अनुआईला तिच्या पोरक्या झालेल्या मानसकन्येचे शीलाचे शतश : प्रणाम!

● ●

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. गं. का. सरदार**

**कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | जनार्दन पोहऱ्या वळवी |
| **उपाध्यक्ष** | : | शरद कुलकर्णी |
| **सचिव** | : | रा. के. मुटाटकर |
| **सहसचिव** | : | सुधीर जोग |
| **खजिनदार** | : | वि. श्री. कुलकर्णी |
| **सदस्य** | : | श्रीमती मीराबाई तडवी |
| | : | श. गो. देवगावकर |
| | : | विजय साठे |
| | : | मिलिंद बोकील |
| | : | जॉन गायकवाड |
| | : | पदमाकर वळवी |

# प्रेरणा

– सुनिल रामचंद्र पवार

अनुताईंच्या मृत्यूची बातमी ऐकली अन् आपल्या आयुष्यात मिळालेले प्रेरणास्थान हरवल्याची हुरहुर मनात धडकू लागली खरं पाहता ज्यांना मी माझे प्रेरणास्थान म्हणतो त्यांना अगोदर मी कधी पाहिलं नव्हते किंवा त्यांचे नाव ही ऐकल नव्हते एवढ्या मोठ्या व्यक्तीचे नाव माहीत नसणे हे माझे दुर्भाग्य.

मी फावल्या वेळात लहान मुलांसाठी कविता लिहितो हा माझा नवका छंद. खरा पेशा चित्रकारीचा. कामाच्या व्यापामुळे वाचनही खूप कमी, शाळेत चित्रकला विषय शिकवत असल्याने लहान मुलांची जवळीक त्यांचं गोड निरागस वागणं, त्यांच्या सवयी, त्यांना लावायचे संस्कार अशा प्रकारचे विषय घेऊन खूप कविता वहीत लिहून ठेवल्या होत्या. मी माझ्या कविता इतर कोणालाही दाखवत नव्हतो. त्यात काय उणिवा आहेत की काय असं मला वाटत होतं.

मागील वर्षाची घटना आहे मी त्या कविता स्वत: हस्तलिखित करून त्यांना अनुसरून चित्रे काढून २० कवितांचे एक पुस्तक तयार केले. शाळेत ऑफ तासाला ते मी चाळत होतो. समोर एक मॅडम बसल्या होत्या. त्या म्हणाल्या "काय हो सर काय वाचता ?"

"लहान मुलांच्या कविता वाचतोय !"

"पाहू जरा ? तुम्ही लिहिल्या आहेत काय ?"

"हो मी लिहिल्या आहेत."

पुस्तक त्यांच्या हातावर ठेवित मी म्हणालो.

"तुम्हालाच पहिल्यांदा दाखवित आहे बरं. मी लिहितो ते बरोबर आहे की; चुकीचे ते मलाच समजत नाही."

"सर मी एक सुचवू का ?"

"सांगा ना."

"तुम्ही हे पुस्तक अनुताई वाघ यांना पाठवा. त्यांचा अभिप्राय आल्यावर कळेल तुम्हाला."

"कोण आहेत ह्या अनुताई वाघ? मला नाही माहीत."

"अहो मी डी.एड्. त्यांच्या येथे कोसबाडला केले." लहान मुलांसाठी त्यांनी खूप लिखाण केले आहे. आदिवासी भागातल्या चांगल्या समाजसेविका म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्या तुम्हाला योग्य सल्ला पण देतील."

त्यांच बोलणं संपताच मी अनुताईंना पुस्तक पाठविण्याचा निर्णय घेतला आणि लगेच एक पत्र लिहिण्यास घेतले. पत्रात त्यांना स्पष्ट लिहिले, मी कविता लिहिण्यास ५-६ महिन्यापूर्वी सुरुवात केली आहे. यातील मला खूप कमी अनुभव आहे. यात काही चुका असल्यास मला कळवा मी त्याचे स्वागत करीन व तशी सुधारणा करीन. एवढ्या मोठ्या व्यक्तीस कविता पाठविल्यामुळे मी त्यांचा अभिप्राय येईपर्यंत एक ही कविता लिहिली नाही. त्यांच्या पत्राची मी आतुरतेने वाट पहात होतो. एक दिवस मी त्या मॅडमला म्हणालो,

"काय हो अजून उत्तर आलं नाही अनुताईंचे ?"

"सर पत्राचं उत्तर येणार म्हणजे येणारंच. कारण अनुताईंची काम करण्याची पद्धत नियोजन बद्ध असते. त्याची मला खात्री आहे."

दोन दिवसांनीच मी शाळेतून घरी आलो बाबांनी कपाटावर ठेवलेले पत्र माझ्या हातावर ठेवले आणि म्हणाले "हे तुझं पत्र आलय्र बघ." ते पत्र कोसबाड वरून आल्याची खात्री झाली पण मनाची धडकन वाढत होती. पत्र उघडून वाचायला सुरुवात केली. मी पाठविलेल्या २० कविता अनुताईंनी काटेकोरपणे वाचल्या होत्या. प्रत्येक कवितेतील गमती जमतीचे वर्णन त्यांनी पत्रात केले होते. एका कवितेतील चुकलेला एक शब्द शोधून त्यांनी त्याचा उल्लेख पण केला होता. पत्राच्या शेवटी त्यांनी लिहले होते, श्री पवार आपण केलेला हा पहिला प्रयत्न १००% यशस्वी आहे. कवितेचे सर्व विषय मुलांचे आवडते असून नविन आहेत. हे पुस्तक बालवाडी व प्राथमिक वर्गाच्या शिक्षकांना पण उपयुक्त आहे. असा अभिप्राय वाचून माझा छंद अति उत्सावला. त्यांच्या प्रेरणेने आजपर्यंत खूप कविता लिहिल्या.

मे महिन्याच्या सुट्टीत ठरवलं आपण दिवाळीच्या सुट्टीत अनुताईना भेटण्यास जायचं. अजून खूप लिखाण करायचं आणि त्यांना दाखवायचं आणि तशी तयारी सुद्धा केली. पण त्यांना भेटण्याचे स्वप्न काळाला पहावलं नाही. भेटण्याची इच्छा अपूर्ण राहिल्या मुळे त्यांच्या मृत आत्म्यास श्रद्धांजली वाहतांना ते स्वप्न काळजाला चिमटे घेत होते. माझ्या प्रेरणास्थान (अनुताईस) कोटी कोटी प्रमाण.

---

*(पान ७ वरून)*

बांधणी करणे वगैरे सगळी कामे ही मंडळी करतात तेव्हा हा 'छापखाना' म्हणजे कमळाच्या कळयातील एक पाकळी' आहे. आणि आता नुकतीच एक उमललेली एक पाकळी म्हणजे 'डोंगरीपाडा' येथील विकासवाडी. ही अगदी आदिवासी वस्तीत आहे. कुडाच्या झोपडीत पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळेची १ली व २री इयत्ता आहे. ही झोपडी बांधण्यासाठी जमीन आदिवासी ग्रामस्थांनी दिली आहे व स्वत: देखरेख करून झोपडी बांधून घेतली आहे. झोपडीचे बरेचसे सामान जिल्हा परिषदेने दिलेले आहे.

या विकासवाडीची प्रमुख शिक्षिका आदिवासीच आहे ती कोसबाडच्या आमच्या बालवाडीत, नंतर रात्रीच्या शाळेत व नंतर बालसेविका प्रशिक्षण वर्गात शिकून तयार झाली आहे. अशा आणखी तिघी तयार झाल्या असून त्या स्वतंत्रपणे बालवाड्या चालवित आहेत.

एक समस्या सुटत असताना दुसरी उभी राहते. एक काम वाढते. पुन्हा नवी समस्या उभी. ती आणखी एका समस्येस उभी करून सुटते. अशा रीतीने विकासवाडीचे काम वाढत आहे. आज कोसबाडला आमच्या संस्थेच्या ११ बालवाड्या, तीन पाळणाघरे, एक पूर्वप्राथमिक शाळा, ट्रेनिंग कॉलेज, बालसेविका प्रशिक्षण वर्ग, तीन किसान शाळा, एक बाल उद्योगालय, कार्यानुभव प्रकल्प आदी शिक्षणविभाग चालू आहेत.

विकासवाडीचे हे कमळ फुलविण्यात कै. पूज्य ताराबाईंचे प्रेरक विचार, चिंतन, जिद्द व खंबीर प्रयत्न कारण आहेत. त्याबरोबरच त्यांच्या सुदैवाने त्यांचे विचार समजून घेऊन निष्ठेने काम करणारे तज्ज्ञ कार्यकर्ते त्यांना लाभले आहेत.

# बालगीते लेखनाला स्फूर्ती देणाऱ्या पद्मश्री अनुताई वाघ

**-- श्री बाळकृष्ण मु. बाचल**

१९७७ची गोष्ट मी आमच्या गावी पाडळी निनाम ता. जि. सातारा येथे होतो. त्यावेळी कोसबाड येथे डी.एड्.ला असणारा माझा मित्र आनंदराव ढाने याने मला कोसबाड येथून प्रसिद्ध होणाऱ्या शिक्षण पत्रिकेत प्रसिद्धी करिता बालगीते मागितली. मी त्यावेळी नुकताच डी.एड्. होऊन घरी बसलो होतो. अजून नोकरी नव्हती. आणि लिखाणाचा छंदही नव्हता. अशावेळी त्याने ही मागणी केली. २/३ बालगीतं मी त्याला लिहून दिली. प्रसिद्ध होतील किंवा आवडतील कां? आपल्याला हे काम जमणार कां? या संभ्रमात असतानाच शिक्षण पत्रिकेचा ऑगस्ट १९७७चा अंक आला. आणि पहिले बालगीत प्रसिद्ध झाले. आनंद गगनात मावेना! त्या दिवसापासून आजतागायत ताईंनी ३०/४० बालगीतं प्रसिद्ध केली. ताईंच्या स्फूर्तीमुळे आज माझ्या अनेक कविता, कथा, बालगीतं प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणी पुणे केंद्रावर कवितावाचन, बालगीत वाचन झाले. आज अध्यापनाचे कार्य करताना बालगीतांचे महत्व पटले. त्याचा अध्यापनात वापर होऊ लागला.

ताईंना एखादे पत्र पाठविले; तर त्याचे उत्तरही लगेच मिळत. एखादी चांगली गोष्ट, घटना कळविली तर त्या अभिनंदन करीत. आपल्या मासिकातही अभिनंदन प्रसिद्ध करीत. त्यामुळे माझ्या सारख्या शिक्षकाला आणखीनच स्फूर्ती मिळत राही.

माझ्यां प्रमाणे माझा पुतण्या नंदकुमार बाचल हाही लेखन करू लागला, त्याच्याही कविता, बालगीतं शिक्षण पत्रिकेत प्रसिद्ध झालेली आहेत.

अर्थात हे केवळ ताईंनी दिलेल्या स्फूर्तीमूळे!

त्यांची ही स्फूर्तीच आम्हाला सदैव स्मरणात राहील.

## श्रद्धांजली

एका सामान्य महिलेने--
अध्यापनास वाहिले जीवन
कोसबाडची 'ओसाड' टेकडी--
बनून राहिली हिरवळ पावन
साक्षरता दीप - प्रकाश--
पसरविला वाडी वाडीत
बालवाड्यात शिकवणारी बाई--
खडुफळा घेऊन गेली आंगणवाडीत
वाट झाली 'वहिवाटीची'--
आदिवासी समाज सुधारला
बघता बघता झाली अंतर्धान--
'कीर्ती-भूषण-आदर्श गौरव' साकारला
असे व्रत - असे कर्तृत्व--
शतकातून एकदाच घडते
जीवनाचे सोने होते--
जनकल्याणा कारणी पडते

***-- बी. जे. शेख ( साहित्य प्राज्ञ )***

## कविता

### अनेकांची आई- अनुताई

हृदयाचा मेघ ओला, बरसती भूतदया
वाटा कामाचा वाघाचा, नाही कोणाची असूया

ज्ञानापासून वंचित. खडकाळ खेडीपाडी
दुर्लक्षित वनवासी कोसबाडची टेकडी

भाऊ राहती शेजारी, परी नव्हती ओळख
एका भूमीची लेकरं, एकामेका ना ठाऊक

त्यांना घेतले पोटाशी, नाते जोडले धर्माचे
दाखविले प्रात्यक्षिक, स्वच्छतेचे आरोग्याचे

आंजारून, गोंजारून, झोपलेल्या उठवलं
शिक्षणाचं बी पेरलं, कुठंकुठं उगवलं

केला अर्पण नैवेद्य, जीवनाचा समाजाला
दीपज्योतीचा उजेड, पळविले अंधाराला

मदतीचे हात, रथ जगन्नाथाचा ओढती
अनेकांची माय, जैशी, गांधारी महाभारती

प्रयत्नांची पराकाष्ठा, ताराबाई अनुताई
रगडीले वाळूकण, तेल थेंबांची कमाई

***— सौ. मालती ग. जोशी***

### माऊली

कोसबाडच्या टेकडीवर
ज्ञानमंदिर तू बांधिले
ताडामाडांच्या मनोमनी
ज्ञानबीज तू पेरले

तुझ्या दिव्यदृष्टीतून;
पाहिला वनवासी बालकांनी
कधीही न दिसणारा
उष:काल

करुणामयी... तू तपस्विनी....
प्रेम-शिस्त-आदर्श;
समर्पित जीवनाचा तू ठेवा
ईश्वरालाही वाटे तुझा हेवा

हे ज्ञानसरिता!
शारदेच्या प्रांगणात;
बालमंदिरी तू माऊली
वनवासियांची तू सावली.

***— राम अहिवळे***

---

*(पान १४ वरून)*

समाजामध्ये असा एक वर्ग पाहिजे की आम्ही स्वत: खेड्यापाड्यात डोंगरदरीत काम करू शकणार नाही पण असे काम करीत असलेल्या व्यक्तीला अगर संस्थेला हस्ते-परहस्ते देता येईल तेवढी पैशाची रूपाने अगर वस्तूच्या रूपाने मदत पोहोचवू. अशा मदतीमुळे संस्थेचे अडलेले काम तर पुढे सरकतेच पण कार्यकर्त्यांना मानसिक आधार मिळून त्यांचा उत्साह वाढतो.

आर्थिक मदत पोहोचवितांना राजकारण, जात धर्म वगैरे गोष्टींचा विचार बाजूला ठेवून समाज कल्याणाचे खरेखुरे काम चालले असेल तिकडे मदत जावो अशी दृष्टी असावयाला हवी यासाठी सर्वसाधारण समाजाचे शिक्षण हे आवश्यक आहे. अनेक तऱ्हेंनी परिसंवाद, संमेलन, अभ्यासवर्ग, व्याख्यानमाला, बोधपट, नाटके आदीच्या द्वारे हे समाजशिक्षण होऊ शकेल.

एकूण देशापुढे अनेक प्रकारच्या अनेक समस्या आहेत. पैकी आदिवासी विकासाच्या समस्यांचा येथे विचार केला आहे. आणि त्यासाठी स्वयंसेवी संस्थांचा अधिक विचार केला आहे. स्वयंसेवी संस्था पुढे येण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांचा संच हवा. त्यांचे प्रशिक्षण हवे व या संस्थांना आर्थिक व मानसिक पाठिंबा देणाऱ्या समाजाचे प्रशिक्षण हवे. वरील गोष्टी विचारात घेऊन या परिसंवादाने योजना आखाव्यात. अशी माझी विनंती आहे.

"सरदार सरोवर प्रकल्प" हा देशातील अतिशय चर्चेचा विषय बनला आहे. या प्रकल्पांतर्गत शेकडो एकर जमीन पाण्याखाली जाणार आहे व हजारो लोकांचे विस्थापन होणार असल्याने पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे एवढा मोठा प्रकल्प भारतासारख्या विकसनशील देशाला फायदेशीर आहे की नाही यासंबंधी उलटसुलट मते ऐकावयास मिळतात. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या "हाकारा" त्रैमासिकाचा यावेळचा विशेषांक "सरदार सरोवर विस्थापन आणि पुनर्वसन" या विषयावर निघणार आहे. इच्छुकांनी या प्रकल्पाविषयीची माहिती, आपले विचार, व्यवहार्य सूचना किंवा पर्याय, लेख, तज्ञांच्या मुलाखती इत्यादी स्वरूपात आपले साहित्य खालील पत्त्यावर शक्य तितक्या लवकर पाठवावे.

संपादक, **"हाकारा" त्रैमासिक, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**,
६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७
फोन : ३३७२१९

**(ग. शां. पंडित)**
कार्यकारी संपादक,
"हाकारा" त्रैमासिक

# सूची


अंक पहिला : जानेवारी-मार्च ....................................१९८० - जबरन जोत जंगल जमीन
अंक दुसरा : एप्रिल-जून ....................................१९८० - आदिवासी व शिक्षण
अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर ....................................१९८० - आदिवासी व वनसंवर्धन
अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................................१९८१ - आदिवासी साहित्य व कला
अंक पाचवा : जानेवारी-मार्च ....................................१९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती
अंक सहावा : एप्रिल-जून ....................................१९८१ - आदिवासी व आरोग्य
अंक सातवा : जुलै-सप्टेंबर ....................................१९८१ - वनशेती व संवर्धन
अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................................१९८१ - रोजगार हमी योजना
अंक नववा : जानेवारी-मार्च ....................................१९८२ - उत्तरा खंड अभ्यास मोहीम
अंक दहावा : एप्रिल-जून ....................................१९८२ - धरणे व विकास
अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर ....................................१९८२ - जंगल व्यवस्थापन
अंक तेरावा : जानेवारी-मार्च ....................................१९८३ - आदिवासी व दारू
अंक चौदावा : एप्रिल-जून ....................................१९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर ....................................१९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य
अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................................१९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून ....................................१९८४ - आदिवासीमधील स्वयंसेवी कार्य
अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर ....................................१९८४ - आदिवासी स्त्री
अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................................१९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण
अंक एकविसावा : जानेवारी-मार्च ....................................१९८५ - आदिवासी संघटन
अंक बाविसावा : एप्रिल-जून ....................................१९८५ - जमीन हस्तांतर
अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर ....................................१९८५ - आदिवासी महिला
अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................................१९८५ - आदिवासी व सरकार
अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च ....................................१९८६ - जंगल व धरण
अंक सव्विसावा : एप्रिल-जून ....................................१९८६ - आदिवासी कला
अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर ....................................१९८६ - आदिवासी व वेठबिगारी
अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ....................................१९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च ....................................१९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
अंक तिसावा : एप्रिल-जून ....................................१९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर ....................................१९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
अंक तेहतीस : जानेवारी-मार्च ....................................१९८८ - सवलती अपहरणाची समस्या
अंक चौतीस : एप्रिल-जून ....................................१९८८ - आदिवासी साहित्य
अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर ....................................१९८८ - आदिवासी समाज व संस्कृती
अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून ....................................१९८९ - डॉ. वेरीर एलवीन विशेषांक
अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर ....................................१९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून ....................................१९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर ....................................१९९० - जागतिक आदिवासी
अंक चव्वेचाळीस : आक्टोबर-डिसेंबर ....................................१९९० - गं.बा. सरदार स्मृति विशेषांक
अंक पंचेचाळीस-सेहचाळीस : जानेवारी-जून ....................................१९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्याबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन,

या उद्देशांने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद २५० रुपये

परिषद वार्षिक सभासद २५ रुपये

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करतांना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :–**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.